म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १७६६

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय शाखा.

| अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक ६८९।२ |
| --- | --- | --- |

पुस्तकाचें नांव मोड आणि रखु

लेखक कोल्हटकर प्र. मो.

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0005979

स॰ त्रि॰ ६६९

# मोड आणि खुर्दा

लेखक

प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर

सोल एजंटस्

**मॉडर्न बुकडेपो**

बुकसेलर्स व पब्लिशर्स

आनंदाश्रमासमोर, पुणें २

REFBK-0005979

किंमत दीड रुपया ] [ ऑक्टोबर १९४०

संजीवनी, धनुर्धारी आणि नवयुग या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या स्फुटांपैकीं निवडक स्फुटें या पुस्तकांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

Cover design by:—
W. N. Bhat, Photo-artist,
Laxmi Road, Poona 2.
Cover printed at
Ramkrishna Press, Bombay 4.

मुद्रक—स. रा. सरदेसाई, नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत छापखाना', ४१ बुधवार, पुणें २

प्रकाशक—प्र. श्री. कोल्हटकर, 'चित्रमंदिर', परेल टँक रोड, मुंबई

माझे चुलते ती. दिगंबर कृष्ण कोल्हटकर
यांस अत्यंत आदरानें आणि
प्रेमानें अर्पण—

सं. नि. ६६०

# प्रस्तावना

प्रस्तुत संग्रहास प्रस्तावनेची जरूर आहे काय?---मला वाटतें, नाहीं. एक तर, त्याचे कर्ते रा. प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर हे साक्षर महाराष्ट्रास चांगले परिचित आहेतः 'स्मृतिचित्रें' ग्रंथासारख्या कांहीं उत्कृष्ट ग्रंथांचे प्रकाशक, माजी 'संजीवनी'चे संपादक आणि 'मानसपूजा' व 'आकाशवाणी' या पुस्तकांचे लेखक---अशा तिहेरी नात्यांनीं त्यांनीं शिक्षितवर्गांत उत्तम लौकिक संपादन केलेला आहे. अर्थात् अशा गृहस्थाच्या कृतीस प्रस्तावनेच्या पाठराखणीची काय आवश्यकता आहे? दुसरें असें कीं, इतर कुणीं प्रस्तावनेंत वाचकांची अनुकूल मनोभूमिका तयार करावी, अशा तऱ्हेचा कोणताहि अभिनव---व म्हणून वाचकांस निदान आरंभीं तरी विचित्र वाटणारा---वाङ्मयप्रकार या ग्रंथांत आलेला नाहीं. तेव्हां त्याहि दृष्टीनें प्रस्तावनेचें विशेष प्रयोजन दिसत नाहीं.

असें जर आहे, तर मग मी ही प्रस्तावना लिहिण्यास कां उद्युक्त झालों, असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. कुणाला वाटेल कीं, मी कोल्हटकरांच्या भिडेस बळी पडलों! किंवा, कुणी तर्क करतील कीं, 'प्र. प्र.' (=प्रसिद्ध प्रस्तावनाकार) बनण्याच्या भरीस पडून मीं ही भूमिका स्वीकारली! पण खरें पाहतां, या दोन्ही कल्पना 'कल्पना'च ठरणार आहेत. कोल्हटकरांचे कांहीं लेखनगुण मला प्रिय आहेत, आणि एखाद्या लेखकांत स्तुति करण्याजोगे लेखनगुण आढळल्यास तसें उघड बोलून न दाखविण्याचा कद्रूपणा

करण्याचें मला कांहींच कारण नाहीं. यामुळें या प्रस्तावनेच्या रूपानें कोल्हटकरांच्या मला प्रिय असणाऱ्या लेखनगुणांविषयीं जाहीर गौरवोद्गार—अर्थात् तारतम्यानें—काढण्याचा सुयोग प्राप्त झाला आहे, असें मला वाटलें, व म्हणूनच मी पुढील चार शब्द लिहीत आहें, एवढें माझ्या वर्तीनें म्हटलें, म्हणजे पुरें आहे.

( २ )

कोल्हटकर हे ' श्रीपाद कृष्णां 'चे चिरंजीव असल्यानें त्यांची साहित्यसेवा आनुवंशिक आहे, असें विधान करण्यास हरकत नाहीं. ' आनुवंशिक ' शब्द मीं येथें वापरला असला, तथापि कोल्हटकर पितापुत्रांविषयीं मला कसलीहि ' शास्त्रीय चिकित्सा ' करावयाची नाहीं ! मला सुचवावयाचें आहे, तें हें कीं, थोरल्या कोल्हटकरांचा साहित्यसेवेचा गुण धाकट्या कोल्हटकरांत उतरला आहे, एवढेंच नव्हे, तर वडिलांची लेखनशैली देखील चिरंजिवांनीं बव्हंशानें आत्मसात् केलेली आहे. निराळ्या शब्दांत सांगावयाचें, तर धाकटे कोल्हटकर हे ' कोल्हटकर संप्रदायां 'त समाविष्ट होऊं शकणारे साहित्यिक आहेत, असेंहि म्हणतां येईल.

कोल्हटकरांचे आरंभीं उल्लेखिलेले ' मानसपूजा ' व ' आकाशवाणी ' हे पूर्वीचे दोन ग्रंथ घेतले, तरी सुद्धां वरील विधान सार्थ असल्याची साक्ष पटेल. समाजकारणादि बाबतींतलें उदारमतवादित्व हा ' कोल्हटकर संप्रदाया 'चा महनीय विशेष असून तो या दोन्ही ग्रंथांत व्यक्त झालेला आहे. ' मानसपूजा ' या कथासंग्रहांतील सर्वच कथा सामाजिक विषयांवर लिहिलेल्या आहेतः त्यांतील ' मानसपूजा ' या पहिल्या दीर्घकथेंत श्रीमंती-गरिबी वगैरे द्वंद्वांमुळें तरुण-तरुणींची कशी कुचंबणा होते, याचें हृदयस्पर्शी

वर्णन केलेलें आहे. 'निष्प्रेम आयुष्य', 'कैद्याची मुलें', 'गरिबांची दुनिया' व 'समाजसेवा'–या उर्वरित चार कथांचे विषय त्या त्या मथळ्यावरूनच स्पष्ट होतात. 'आकाशवाणीं'त लेखनविषयाचें क्षेत्र यापेक्षांहि जास्त व्यापक झालेलें आहे. तींत धूम्रपानापासून तों बेकारीपर्यंत सर्व थिल्लर-गंभीर विषय आलेले आहेत! परंतु त्यांत देखील कोल्हटकरांनीं आपल्या संप्रदायाचें उदारमतवादित्व हें बिरुद सर्वसाधारणपणें अभंग राखलें आहे.

'कोल्हटकर संप्रदाया'चा दुसरा विशेष विनोदी व कोटिबाज लेखनशैली हा होय. हा विशेषहि उपरोक्त ग्रंथद्वयांत आढळांत येतो. विपुल उपमा-दृष्टांत, विरोधात्मक ( Antithetical ) वर्णनें व शब्दांवरील कोट्या हे थोरल्या कोल्हटकरांप्रमाणेंच धाकट्या कोल्हटकरांच्याहि लेखनशैलीचे आत्मीय गुण आहेत. लघुकथेसारख्या तंत्रप्रधान वाङ्मयप्रकारांत वरील सर्वच गुण 'गुण'रूप ठरतात, असें नव्हे. पण प्रसंगीं रसभंग पत्करूनहि ते 'मानसपूजें'त आणण्याचा कोल्हटकरांनीं खटाटोप केलेला आहे! 'आकाशवाणीं'त मात्र तंत्राचा सासुरवास नसल्यानें त्यांना सदर गुण मोकळेपणानें व अधिक यशस्वितेनें प्रगट करण्यास वाव मिळाला आहे. किंबहुना, 'आकाशवाणीं'तच कोल्हटकरांच्या लेखनशैलीस निश्चित आकार आलेला आहे. 'आकाशवाणी'नंतरचें त्यांचें लेखन 'आकाशवाणीं'तील लेखनाशीं इतकें सारखवट आहे कीं, त्यांनीं कुठें टोपणनांवी मजकूर लिहिला, तरी तो त्यांचाच असल्याचें त्यांच्या वाचकांस उमगल्याखेरीज सहसा राहत नाहीं.

याप्रमाणें कोल्हटकरांची लेखनशैली 'कोल्हटकर संप्रदायां'-तील कांहीं गुणविशेषांनीं विनटलेली असली, तथापि तींत त्यांनीं थोडासा निराळेपणाहि आणलेला आहे: 'कोल्हटकर संप्रदाया'चे

प्रवर्तक ' श्रीपाद कृष्ण ' व त्यांचे कांहीं शिष्य यांची भाषा ' अतीव ' बोजड असते ! गुरुशिष्यांपैकीं कुणाची भाषा अभिजात पांडित्यामुळें बोजड झाली, आणि कुणीं केवळ बोजड भाषेनेंच असलेल्यापेक्षां ' जादा ' पांडित्याचा आभास उत्पन्न केला, याची चिकित्सा करण्याचें प्रयोजन नाहीं. एवढें मात्र खरें कीं, धाकट्या कोल्हटकरांनीं आपल्या लिखाणांत बोजडपणाला पूर्णपणें मज्जाव केला असून सर्वत्र साध्यासुबोध भाषेचाच अंगीकार केलेला आहे. या बाबतींत त्यांचें संप्रदायांतील या मंडळीपेक्षांहि प्र. के. अत्रे यांच्याशीं जास्त गोत्र जुळतें. अत्रे हे गडकऱ्यांचे शिष्य व गडकरी झाले तरी तेहि कोल्हटकरांचेच शिष्य, तेव्हां अत्रे देखील परंपरेनें ' कोल्हटकर संप्रदायां 'तच जमा होतात, असा युक्तिवाद एखादा सांप्रदायिक लढवील; परंतु त्याच्याशीं आपणांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. भाषापद्धतीपुरते तरी अत्रे हे ' श्रीपाद कृष्णा '-दिकांपेक्षां वेगळे उमटून दिसतात, आणि धाकट्या कोल्हटकरांचें भाषेबाबत कुणाशीं साम्य असेल, तर तें अत्र्यांशींच होय, असें माझें मत बनलें आहे. ' संजीवनी 'मध्यें ' आकाशवाणी ' या मथळ्याखालीं प्रथम अत्रे व नंतर कोल्हटकर लिहीत असतां माहितगारांखेरीज इतरांस या वस्तुस्थितीचा छडा–पत्ताहि लागला नव्हता, ही एकच गोष्ट माझ्या वरील विधानाची सत्यता पटविण्यास पुरेशी आहे.

( ३ )

' मानसपूजा ' व ' आकाशवाणी ' यांचें–विशेषतः उत्तरोक्त पुस्तकाचें–भावंड शोभेल, असाच प्रस्तुत ' मोड आणि खुर्दा ' हा संग्रह आहे. ' आकाशवाणी 'चा तर तो पुरवणी–ग्रंथच समजतां येईल !

कसें तें ओघानें पाहूं.

१९३९ पूर्ण व १९४० अर्धें—या दीड वर्षांत ‘संजीवनी’ व ‘नवयुग’ या नियतकालिकांत (नियमानें अनियमित निघणाऱ्या माजी ‘संजीवनी’स मी ‘नियत’कालिकच म्हणतों, याची कोल्हटकर मला क्षमा करतीलच!) कोल्हटकरांनीं वेळोवेळीं प्रासंगिक विषयांवर जीं स्फुटें लिहिलीं, तीं या संग्रहांत संगृहीत केलीं आहेत. ‘धनुर्धारी’त प्रसिद्ध झालेला ‘गेलें वर्ष’ हा विस्तृत प्रबंधहि त्यांत समाविष्ट केलेला आहे. प्रत्येकीं एक-दोन पानें भरणाऱ्या स्फुटांच्या पंक्तींत तब्वल एकूणतीस पानें भरणारा प्रबंध बसविणें हा कोल्हटकरांसारख्या विनोदी लेखकाचा एक प्रकारचा विनोदच म्हटला पाहिजे!

या संग्रहांतील विषयांची नांवनिशी कुठवर द्यावी? मला वाटतें, एखाद्याची खोडकी मोडावयाची असल्यास त्याला या पुस्तकाची विषयवार सूची तयार करण्यास खुशाल सांगावें! सबंध संग्रहाचें एकवेळ असो, पण तदंतर्गत ‘गेलें वर्ष’ या एकाच प्रबंधांतहि किती तरी विषय आलेले आहेत! मात्र अशा विषयवैचित्र्यामुळेंच ग्रंथाची मनोरंजकता तितक्या प्रमाणांत वाढली आहे, हेंहि कांहीं खोटें नाहीं.

हे सर्व विषय हाताळतांना कोल्हटकरांनीं आपल्या संप्रदायास अनुसरून उदारमतवादाचें धोरण नजरेसमोर ठेवलेलें आहे. विषय सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन—कोणताहि असो, कोल्हटकरांचीं त्यावरील मतें सामान्यतः प्रगतिपर अशींच असतात. आणि, तीं मतें प्रदर्शित करतांना ते त्या त्या व्यक्तीचे अथवा संस्थेचे गुण-दोषहि बहुधा निःपक्षपातबुद्धीनें पुढें मांडतात. हेंच पहा ना: ‘श्रीपाद कृष्णां’चे गडकऱ्यांनंतरचे आवडते पट्टशिष्य

म्हटले म्हणजे वि. स. खांडेकर हे होत. ते कोल्हटकरांना अर्थात्च अतिशय जवळचे. परंतु असें असूनहि त्यांच्या अलीकडील स्वतःला न रुचलेल्या लेखनाला त्यांनीं संग्रहांत तडाखा ठेवून दिला आहे! (पा. ३४) कोल्हटकरांचे दुसरे निकटचे सुहृद् अत्रे हे होत; पण प्रसंगोपात्त त्यांना सुद्धां चार-दोन बाता सुनावून देण्यास ते मागें-पुढें पाहत नाहींत! (पा. ३७) तात्पर्य, कोल्हटकरांची या संग्रहांतील भूमिका 'जीविताच्या टीकाकारा'-ची असून त्यांच्या टीकेंत प्रगतिपरता व निःपक्षपातपणा हे गुण बऱ्याच प्रमाणांत वास करीत असलेले दृष्टोत्पत्तीस येतात.

या संग्रहांतील कोल्हटकरांची लेखनशैली देखील त्यांच्या संप्रदायाप्रमाणें विनोदी व कोटिबाज अशी आहे. खेरीज, तिला त्यांनीं सुगम व तजेलदार भाषेचीहि जोड दिलेली आहे. ते प्रतिकूल टीका करतांना विनोदाची कांस धरीत असले, तथापि त्यांचा विनोद मर्मभेदक क्वचित्च असतो. खुद्द टीकाविषयीभूत व्यक्तीला सुद्धां तो विनोद सहसा बोंचणार नाहीं! तेंच अत्र्यांच्या विनोदाचें पहाः ते टीकाविषयीभूत व्यक्तीला एका हातानें गुदगुल्या तर करतीलच, पण दुसऱ्या हातानें जबरदस्त गुद्देहि चढवितील! यामुळें त्या बिचाऱ्या व्यक्तीच्या तोंडावर गुदगुल्यांमुळें हसू फुटतें न फुटतें, तोंच तें रट्टयांमुळें येणाऱ्या हुदक्यांत लगेच विरूनहि जात असेल! बाकी, नाठाळ असामी वठणीवर आणण्याच्या दृष्टीनें कोल्हटकरांपेक्षां अत्र्यांचाच विनोद जास्त कामास यावयाचा!

संग्रहांत कोल्हटकरांच्या लेखनशैलीचे उत्तम नमुने पुष्कळच आढळतातः एकच उदाहरण द्यावयाचें, तर पृष्ठ ९२ वर सरदार रास्त्यांच्या मृत मोरासंबंधीं (कै. हाय!) जें उपरोधिक वर्णन आलेलें आहे, त्याजकडे अंगुलिनिर्देश करतां येईल. नव्हे, ज्यांत

हें वर्णन आलें आहे, तो ‘ गेलें वर्ष ’ हा सबंध प्रबंधच फक्कड उतरला आहे. इतर स्फुटांतहि कैक सुंदर स्थळें सांपडतात. तसेंच, “ पुढाऱ्यांची जयंति म्हणजे भक्तांच्या स्वतंत्र बुद्धीची मर्यंति होय ! ” ( पा. ८६ )—या विनोदगर्भ सुभाषितवजा वाक्यांसारखीं कांहीं वाक्येंहि अधूनमधून झळकतात.

मराठींतील वर्तमानपत्री लिखाणांत ज्यांनीं विनोदाचा अवलंब यशस्वी रीतीनें केला आहे, अशा थोड्या लेखकांत कोल्हटकरांची गणना होते. कोल्हटकर हे संस्थेप्रमाणेंच व्यक्तीवरहि विनोदपूर्ण प्रतिकूल टीका करतात; परंतु त्यांच्या टीकेंत सभ्यतेच्या मर्यादेचें उल्लंघन कधींच केलेलें नसतें. वृत्तपत्रांत वैयक्तिक स्वरूपाची असभ्य टीका करणें हें अतिशय गैरशिस्त आहे. याबाबत प्रो. ना. सी. फडके यांनीं गेल्या साहित्यसंमेलनांत अध्यक्षस्थानावरून प्रगट केलेले विचार निदान मला तरी पूर्णपणें यथार्थ वाटतात. ‘ मोड आणि खुर्दा ’ संग्रहांतून अशी वैयक्तिक स्वरूपाची असभ्य टीका काढून दाखविणें कुणासहि जडच जाईल, असा माझा होरा वाहतो.

प्रस्तुत संग्रहाचा मुख्य दोष हा आहे कीं, त्यांतील बहुतेक विषय प्रासंगिक आहेत. कोणत्याहि वाङ्मयकृतीस चिरंतनत्व प्राप्त होण्यास तिचा विषय कायम महत्त्वाचा असावयास पाहिजे, हें उघड आहे. तसेंच, संग्रहांत विनोद, कोट्या—वगैरेंची पुनरुक्ति अनेकदां झाली आहे, ती रसहानिकारक वाटते. उदाहरणार्थ, पृष्ठ ५० वर जीनासावरकरादि पुढाऱ्यांस झोन तिकिटाच्या मोसमांत आगगाडीच्या एकाच डब्यांत कोंबल्यास त्यांची चट्दिशी एकी होईल, असा विनोद केलेला आहे. परंतु पृष्ठ १३४ वर आगगाडीच्या डब्या-ऐवजीं खाणावळ आणून तसाच विनोद पुनः केलेला आहे ! वर्तमानपत्री लिखाणांत हे दोष अपरिहार्य असले, तथापि सदर

लिखाण ग्रंथनिविष्ट करतांना तें पाखडून-निवडूनच वाचकांसमोर ठेवावयास पाहिजे.

'आकाशवाणी'च्या वाचकांस 'मोड आणि खुर्दा' संग्रह—त्यांतील 'गेलें वर्ष' प्रबंध सोडल्यास—फारसा नवीन वाटणार नाहीं. या दोन्ही संग्रहांत विलक्षण सादृश्य तर आहेच, पण त्यांतहि पूर्वोक्त संग्रहानें सरसतेंत उत्तरोक्त संग्रहावर मात देखील केलेली आहे! प्रस्तुत संग्रह हा 'आकाशवाणी'चा पुरवणी-ग्रंथच मानावा लागेल, असें जें मीं मागें म्हटलें आहे, त्याचें मर्म आतां वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

( ४ )

कोल्हटकरांना विनोदाचें देणें भरपूर प्रमाणांत लाभलें असून त्यांची भाषापद्धति वाखाणण्याजोगी आहे. आतांपर्यंत त्यांची वाङ्मयतपस्याहि पुष्कळ झालेली आहे. अर्थात् त्यांच्या वाचकांची त्यांच्या आगामी साहित्यसेवेबाबत बरीच मोठी अपेक्षा असल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें? 'मोड आणि खुर्दा' संग्रह स्वतंत्रपणें पाहिल्यास निःसंशय चांगल्यांत 'मजरा' होतो. फक्त 'आकाशवाणी'च्या पाठोपाठ तो प्रसिद्ध होणें म्हणजे कांहींसें त्याच त्या धर्तीच्या लेखनास 'वन्स् मोअर्' देण्यासारखें होतें,' एवढेंच. तथापि कोल्हटकर हे यापुढेंहि असेच ठराविकांत घोंटाळत राहणार आहेत, असें समजण्याचें कारण नाहीं. अलीकडे त्यांनीं प्र. के. अत्रे, शिल्पकार करमरकर, पु. य. व सौ. विमलाबाई देशपांडे--प्रभृतींचीं चटकदार स्वभावचित्रें लिहिलेलीं असून त्यांचाहि निराळा संग्रह लौकरच बाहेर पडणार आहे. तेव्हां त्यावरून कोल्हटकरांच्या लेखनकलेस वेगवेगळे पैलू पडत असल्याचा कयास बांधल्यास

तो खचित अन्यथा ठरणार नाहीं. ‘श्रीपाद कृष्णां’च्या चिरंजिवांकडून पित्यासारखीच भरदार व विविध स्वरूपाची साहित्य-सेवा घडावी, यापलीकडे माझ्यासारख्या ‘श्रीपाद कृष्णां’च्या नम्र चाहत्याची दुसरी कोणती इच्छा असणार ?

यवतमाळ ( वऱ्हाड ),<br>ता. २५-९-१९४०

वामन नारायण देशपांडे

## तुम्हांला रोज एक आणा वांचवितां येईल काय ?

★ नाणें टाकलें तरच चालणारें घडयाळ आम्ही आमचे विमेदारांस मोफत देतों.

★ रोज एक आणा वांचवून तुम्हांस ५५० पेक्षां अधिक रकमेची पॉलिसी घेतां येईल.

★ आमची रद्द झालेली पॉलिसी थकलेले हप्ते अगर व्याज भरावें न लागतां सुद्धां चालू करतां येते.

★ कंपनीनें मागील मूल्यमापनांत विमेदारांस दर हजारीं ३० व ३६ असा त्रैवार्षिक बोनस जाहीर केला.


# दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲश्युरन्स कं. लि.

## लक्ष्मी रोड, पुणें २

अध्यक्षः-श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज पंडित

शाखाः-मुंबई, नागपूर, ग्वाल्हेर, इंदूर, सोलापूर, सातारा, बेळगांव, कोल्हापूर वगैरे

''होतकरू स्त्री-पुरुषांस सढळ अटींवर एजन्सीज् देणें आहेत.''



उत्कृष्ट न्यहारी

एक कप **गोल्डन कोको**

बरोबर **साठे बंधू** यांचीं

दोन तीन **माल्टेक्स** अगर

श्रुसबरी बिस्किटें घेतल्यानें द्‌बद्‌बीत वाटते

नांव लक्षांत ठेवा

**साठे बिस्किटें गोल्डन कोको**

महिंद्रकर ब्रदर्स, पुणें २, मुंबई

बेकारी दूर करावयाची आहे ना?

तर मग तुम्ही

अप-टु-डेट पोषाख वापरा

व

याकरितां

दोन तपांच्यावर अनुभव असलेलें

सुप्रसिद्ध तयार कपड्यांचे व्यापारी

# महिंद्रकर ब्रदर्स

बुधवार, पुणें २ व मुंबई

यांचे दुकानास भेट द्या.

यांचे तयार कपडे वापरून हजारों लोक

यशस्वी झाले आहेत.

ऑर्डरप्रमाणें तयार कपडे करून मिळतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. ...९...
५८९
मुंबई राज्य (...)

# मोड आणि खुर्दा

## न्हाव्यांची हजामत :

गेल्या ऑक्टोबर महिन्यांत कलकत्ता येथें सहाशें न्हाव्यांची परिषद भरून त्या वर्गानें आपलीं अनेक गाऱ्हाणीं वेशीवर टांगलीं. वस्तऱ्याप्रमाणें आपल्या जिभा तीक्ष्ण करून सेफ्टी रेझर वापरणाऱ्यांना त्यांनीं चां S S गळें धारेवर धरून त्यांची चांगली हजामत केली. दाढी करण्याच्या निमित्तानें, वस्तरा परजून गिऱ्हाइकांचे हात रोज सकाळीं तोंडावर फिरत राहिले तर हातातोंडाशीं आलेला हा धंदा हातोहात जाऊन या वर्गाला माध्याह्नीची पंचाईत पडेल, अशी साधारण भीति त्यांना वाटते आहे. बेकारीमुळें तरुणांना तरी हा एकच 'धंदा' असल्यानें त्यांचा या कार्यांत सत्कारणीं लागणारा वेळ वांचला तर 'सकाळीं तरी काय करावें' ही विवंचना तरुणांना सतावून सोडील. नशीब बिचाऱ्या विधवांचें, कीं वपनाची चाल सरकारनें पुन्हां त्यांच्या माथीं मारावी असा एखादा ठराव उपरोक्त

परिषदेंत पसार झाला नाहीं. पण एका अर्थी या कलावंतांची तक्रारसुद्धां अगदीं रास्त आहे. हे सर्व हस्तकलाविशारद ( वाचकहो, बिचकूं नका. ही कोणत्याहि राष्ट्रीय विश्वविद्यालयाची पदवी नव्हे !) उपाशीं मरायला लागले तर त्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांच्या तोंडाकडे पाहावयाचें नाहीं तर करायचें तरी काय ! समाजांतील निदान निम्म्या लोकांच्या डोक्यावर या वर्गाचा वरदहस्त अनादिकालापासून असल्यानें वहिवाटीचा हक्क कोणता शहाणा माणूस सुखासुखी गमावून बसेल ? तेव्हां या कलावंतांच्या तक्रारीचा समाज सहानुभूतिपूर्वक विचार करील अशी मला आशा आहे. भिंतीला तुमड्या लावणारा रिकामा न्हावी म्हणजे कांहीं हलकीसलकी चीज नव्हे. 'बाबारे, आमची दाढी कर-पण रिकामा बसूं नकोस' असें बोलण्याची वेळ येण्यापूर्वीच समाजानें न्हाव्यांचा प्रश्न हातीं घ्यावा.

अपमृत्यु

आपल्या ओळखीचा एखादा मनुष्य अकालीं खतम झाला म्हणजे आपल्याला धक्का बसून वाईटहि वाटतें. परंतु आपण आपल्या अंतरंगाचा जरा प्रामाणिकपणानें कानोसा घेतला तर धक्का बसणें, वाईट वाटणें वगैरे गोष्टी वास्तविक मृतासाठीं नसतात असें आपल्याला कळून येईल. मृत्यूनें आज त्याच्यावर झडप घातली, उद्यां कदाचित् आपली पाळी नसेल कशावरून ? असा विचार क्षणभर चमकून जातो. आपल्या जगण्याचा बादरायण संबंध दुसऱ्याच्या अकालीं निधनाशीं असतो तो असा. अकालीं निधनाबद्दलहि प्रत्येकाची कांहींतरी स्वतंत्र कल्पना असते. चित्रमयजगत्चा अंक चाळला तर साठीच्या जवळपास असलेला एखादा तरी आदमी ' अकालीं ' कालवश झालेला सांपडतोच. एक डझन

मुलांबाळांची आई ' अकालीं ' परलोकीं गेलेली असल्यास तिच्या प्रेमळ आत्म्यास शांति मिळावी म्हणून देवबाप्पापाशीं रदबदली करणारा तिचा पति, त्याच पत्रांतील ' वर पाहिजे ' ची जाहिरात अस्वस्थ चित्तानें व चोरट्या नजरेनें न्याहाळीत असतो. मला तर असें वाटायला लागलें आहे, कीं ही ' गृह्यसंस्कारा'चीं वर्तमानपत्रें जगांत नसतीं तर कितीतरी ' अकालीं ' मृत्यु टाळतां आले असते. पराकोटीला गेलेला स्वार्थ हा ' अकालीं ' निधनाच्या मुळाशीं नसता तर एखादा अप्रिय माणूस खलास झाल्याचें वृत्त कळल्या-बरोबर त्याच्या सुटकेबरोबर आपलीहि सुटका झाली म्हणून समा-धानाचा सुस्कारा आपण न कळत सोडलाच नसता. अर्थात् ही गोष्ट चार चौघांत प्रामाणिकपणानें कबूल करण्याची आपल्याला लाज वाटत असली तरी; उपरोक्त गोष्ट अगदीं शंभर टक्के सत्य आहे असेंच प्रत्येक वाचक, आजूबाजूला कुणी नाहीं असें पाहून, स्वतःशीं तरी कबूल करील.

## मृत्यूचे उपकार

जगांत मृत्यु नसता तर माणसाला सुखानें जगतांहि आलें नसतें. स्वदेशप्रेमाची जास्त अफू चारून त्या बेभान गुंगींत कोट्यवधि निरपराधी जीवांना तोफेच्या तोंडीं देण्याची राजरोस सोय राजका-रणी मुत्सद्द्यांना नाहींशी झाली असती. उभ्या हयातींत दुसऱ्याशीं फटकून वागून आयुष्याचा प्रवास सुखानें करणारा उन्मत्त श्रीमंत मूजोर, एकदां कां होईना, चार लोकांच्या खांद्यांवरून मुकाट्यानें सोनापुरांत गेला नसता. खाल्ल्या घरचे वासे मोजणारा बेइमान माणूस, दोन बांबूंवर आपल्या बेइमानीचा जाब देण्यास परमेश्वरा-समोर न जातां, इहलोकींच मजेंत नांदला असता. जगांत मृत्यु नसता तर खून, फांशी, अपघात यांचीं ' चटकदार ' वर्णनें

वाचायला चटावलेल्या वाचकांची गैरसोय झाली असती. जगांत मृत्यु नसता तर कारोनरच्या कोर्टांत 'Gentlemen of the Jury' म्हणवून घेऊन अनेकांना आयुष्यांत एकदां तरी 'जंटलमन्' होण्याचा मोका हुकला असता. परलोकांत मृत्यूचा दरबार खोलला गेला नसता तर इहलोकींचा इतिहास कितीतरी सोपा झाला असता. जगांत मृत्यु नसता तर थोर लोकांना मृत्युपत्र लिहितां येत नाहीं असा आरोप त्यांच्यावर कुणीं केला नसता. अनेक डॉक्टरांना आपली केस 'थेट' पर्यंत पोंचविण्याचें समाधान मिळालें नसतें. प्रेमळ मातेला आपल्या लाडक्या लेकरास 'मेल्या' म्हणून शिवी देतां आली नसती. जगांत मृत्यु नसता तर अत्यंत प्रिय व्यक्तीच्या दिव्य स्मृतीची मानसपूजा करून तिला अंतःकरणांतून निघालेल्या पवित्र अश्रूंची माला अर्पण करतां आली नसती. आणि वाचकहो, जगांत मृत्यु नसता तर चित्रमयजगत्‌चीं दोन जादा पानें तरी 'लंघन-चिकित्सा व बस्ती' या लेखासाठीं देतां आलीं असतीं.

## नानांचें गद्यवैभव

रविकिरण-मंडळाचे एक सदस्य व माझे स्नेही प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे यांची माफक कवि म्हणून महाराष्ट्राला ओळख असली तरी त्यांच्या गद्यलेखनाचा फारसा बोभाटा असेल असें मला वाटत नाहीं. तरी पण आपली ताकद न ओळखतां गुप्ते नांवाच्या एका लेखकाच्या 'छाया आणि पडछाया' या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचें जें धाडस नानांनीं केलें त्याबद्दल मला त्यांची कींव येते. आपल्याला सूक्ष्म विनोदबुद्धि आहे अशी हास्यास्पद समजूत ज्या कांहीं साहित्यिकांची झालेली आहे, त्यांत नानांचा नंबर बराच वर लागत असल्यानें त्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत जी कांहीं गंमत झाली आहे ती मात्र और आहे. कथासंग्रहांत तेरा गोष्टी असूनहि

नानांना मात्र सात विनोदी व आठ शोकरसाच्या दिसल्या हें कोडें गणितांत अशक्त असलेल्या माझ्यासारख्या माणसाला सुटणें शक्य नाहीं. गुते या नांवावर ' कोट्या ' करूनच न थांबतां, झरणींतील शाई संपल्याची शाळेंतल्या पोरालाहि न शोभणारी कोटी या प्राध्यापकानें केलेली आहे. प्रस्तावनेचीं शेवटचीं दोन-अडीच पानें एका दमांत वाचून बेदम झालेल्या एखाद्या वाचकानें त्याचा अर्थ मला सांगितला तर मी त्याला धन्यवाद देईन. ' छाया आणि पडछाया ' या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा सुदैवानें योग आला तर नानांच्या प्रस्तावनेचें गद्यवैभव, त्यांचींच कांहीं शालोपयोगी पुस्तकें वाचून ' तैयार ' झालेल्या एखाद्या विद्यार्थ्या-कडून सुबोध मराठींत भाषांतर करून छापावें. यापुढें तरी होतकरू लेखकांनीं केवळ वहिवाटीच्या हक्कदारीमुळें प्रथितयश, नामवंत, थोर वगैरे म्हणतात ना—अशा लेखकांच्या वाटेस प्रस्तावनेचें ऋण मागायला जाऊं नये हें उत्तम. त्यामुळें दोघांचीहि शोभा होण्याचें टळेल.

## चित्रपटांची रौप्य जुबिली

हिंदी चित्रपटांची रौप्य जुबिली कांहीं .महिन्यांपूर्वी झाली. बाल्यावस्था थोडीशी उशीरां संपून आमच्या चित्रपटांना दहा वर्षांपूर्वी वाचा फुटली व सुंदर आणि अबोल स्त्री पडद्यावर पाहण्याचें सुखसुद्धां आम्हांला अंतरलें. एकंदर गोष्टी लक्षांत घेतां आमची या कलेंतील प्रगति आश्चर्यकारक असून अभिनंदनास पात्र आहे. तरी पण बाल्यावस्थेंत कांहीं गोष्टी या कलेला शोभून गेल्या असल्या तरी वयोमानानें तिच्या हातून गद्धेपंचविशीला साजेशा गोष्टी होणार नाहींत अशी मला आशा आहे. कांहीं मोठ्या कंपन्यांना लागलेलीं कुलपें पाहून, या ' ताळे'बंद

कारभारावरून आमच्या कलेचें कुठं तरी कांहीं तरी चुकतें आहे असा ठोकताळा बसविण्यास हरकत नाहीं. ' प्रभात ' व ' हंस ' या दोन कंपन्या महाराष्ट्राच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत असें मी तरी समजतों. त्यांच्या तपःश्चर्येकडे पाहिलें तर या कलेचें भवितव्य खासच उज्ज्वल आहे असें त्यांच्या निंदकांसही कबूल करावें लागेल. तरीपण कथालेखकाचें योग्य स्थान त्यांना अजूनहि मिळालेलें नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. तसेंच प्रामाणिक टीकाकारांना प्रत्यहीं होत असलेला अन्यायहि यापुढें दूर होईल, अशी मला उमेद आहे. टीकाकाराच्या तोंडांत जाहिरातींचा मलिदा कोंबून त्यांना जरी गप्प करणें शक्य असलें तरी चालकांच्या हातून कलेचा खून झाला असल्यास त्याला वाचा फुटल्याशिवाय राहणार नाहीं हें चालकांनीं समजून असावें. या बाबतींत 'हंस'च्या चालकांचें धोरण विशेष उदार असतें हें त्यांना भूषणावह आहे. प्रामाणिक टीकाकार हे या कलेचे मारेकरी नव्हेत हें सिनेमासृष्टींतील 'हायकमांड'ला पटलें तर कलेच्या प्रगतीला मदत होईल. ' प्रभात ' व ' हंस ' महाराष्ट्राची अपेक्षा पूर्ण करतील याची मला खात्री आहे.

## पब्लिक–'शिट्टी'

वरील शब्द वर्तमानपत्रसृष्टींतील एका ' इद्वान ' संपादकानें केव्हांतरी वापरल्यापासून जाहिरातीसाठीं म्हणून या शब्दाचा उपयोग अनेक वेळां झालेला आहे. तरी पण कांहीं दिवसांपूर्वी 'ब्रह्मचारी' बोलपटांतील एकदोन गाणीं उत्तम शिट्टी वाजवून दाखविणाऱ्या कांहीं लोकांना जीं बक्षिसें देण्यांत आलीं त्यामुळें पब्लिक ' शिट्टी ' या शब्दाचें सार्थक झालें असें मला वाटतें. सवंग प्रसिद्धीच्या मोहानें 'हंस'च्या अस्सल कलावंतांना कांहीतरी अघटित करण्याचा जो मोह आज-काल होत आहे तो त्यांनीं वेळेवारी आवरला नाहीं

तर चेष्टेचा एक नवीन विषय लोकांना पुरविण्याचें श्रेय त्यांच्या पदरांत पडणार आहे. साधारणतः नटाला उत्तम अभिनय करून विद्वानाचें सोंग कांहीं काल आणतां आलें तरी त्याला नेहमीं पाठ केलेलें भाषण बोलण्याची संवय असल्यानें स्वतंत्रपणें भाषण करतांना काय प्रमाद घडणें शक्य असतें हें बालगंधर्वांनीं मागें सिद्ध केलेंच आहे. मास्टर विनायक असेच सार्वजनिक भाषण करण्याचे प्रसंग स्वतःवर ओढवून घेत आहेत. त्यांनींसुद्धां या प्रांतांत जरा जपून पाऊल टाकलें नाहीं तर, वृद्ध गंधर्वांप्रमाणें कोणाला तरी साष्टांग नमस्कार करण्याची पाळी त्यांच्यावर आल्यास मला नवल वाटणार नाहीं. सिनेमाच्या चालकांभोंवतीं नेहमीं तोंडपुजे लोकांचा गराडा असल्यानें वरील कटु सत्य त्यांना कुणींतरी सुनावणें शक्य नाहीं. तेव्हां हें अप्रिय कर्तव्य, 'हंस'चा एक चहाता व अभीष्टचिंतक या नात्यानें, मी आज करीत आहें त्याबद्दल हंसच्या चालकांनीं गैरसमज करून घेऊं नये. तसेंच मुलाखती देण्याचा मोहसुद्धां कलावंतांनीं शक्य तों आंवरावा. सिनेमासृष्टींत नवीन पदार्पण केलेल्यांनीं हा सोन्याचा नियम पाळला तर त्यांच्या तोंडांतून क्वचित् येणाऱ्या शब्दांना सुवर्णाचें मोल येईल. चर्चा, शिटी वाजविणें, मुलाखत देणें या गोष्टींची निदान ब्रह्मचारीला तर खरोखरीच जरूर नाहीं. अशानें हंसचे चालक स्वतःच्या कर्तबगारीचा आणि कलेचा अपमान करीत आहेत. इतका उत्कृष्ट बोलपट काढून हा लौकिक कायम ठेवण्याकडे जर हंसच्या कलावंतांचा वेळ खर्च न होईल तर 'कष्ट करा, कष्ट करा' असें म्हणण्याची पाळी प्रेक्षकांवर येणार नाहीं.

जानेवारी-फेब्रुवारी १९३९

## उपास

महात्मा गांधींनीं राजकारणांत सुरू केलेल्या उपासाचें खूळ इतरेजनांच्याहि चांगलेंच अंगवळणीं पडल्यासारखें दिसतें आहे. त्रिकाळच्या जामिनकीच्या प्रकरणीं पुण्यांत देशदास रानड्यांनीं केलेला उपास जरा दृष्टिआड होतो न होतो तोंच मंत्रिमंडळाचा हृदयपालट होण्यासाठीं पुण्याच्या साठ्यांनीं उपास करून तो नीटपणें पारहि पाडला. त्यानंतर प्राथमिक शिक्षकांनीं आचार्य अत्र्यांच्या 'अध्यक्षतेखालीं' एका दिवसाचा उपास केला. विडंबनाचार्य अत्र्यांचा उपास एप्रिलच्या पहिल्या तारखेला नेमका यावा हा योगहि गमतीचा आहे खरा. एक गोष्ट मात्र खरी, कीं राजकारणाच्या नाटकांत देशदासांच्या उपासानें हास्यरस निर्माण होत असला तरी साठ्यांच्या आणि प्राथमिक शिक्षकांच्या उपासानें मात्र करुणरस उत्पन्न होण्यास हरकत नाहीं. थोड्याफार उपासानें शरीरशुद्धि होण्यास साधारणतः मदत होत असली तरी त्यामुळें मंत्रिमंडळाची अंतःशुद्धि होईल असें मात्र मला वाटत नाहीं. कोणत्याहि पक्षाचें सरकार असलें तरी त्याला राज्य करायचें असतें हें शासनशास्त्रांतील आद्यतत्त्व आहे. कोणत्याहि पक्षाचें सरकार असलें तरी त्याच्या हातून कळत न कळत चुका होणेंहि अशक्य नाहीं. अशा वेळीं प्रत्येक दुखावलेल्या व्यक्तीनें आमरण उपास केला तर राज्यशकट पुढें धकणेंच शक्य नाहीं. प्रत्येक गोष्टीला उपास हा रामबाण उपाय असता तर कायदेमंडळाला लोणावळ्याच्या एका प्रसिद्ध उपासप्रिय आरोग्य-गृहाचें स्वरूप आलें असतें. त्रिकाळच्या अन्यायाला जनतेनें जें उत्तर दिलें त्याचा परिणाम मंत्रिमंडळावर साठ्यांच्या उपासापेक्षांहि खासच जास्त होईल हें मी साठ्यांना नम्रपणें सांगण्याची परवानगी घेतों. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन आमच्या शहाण्या राजकारणी

पुरुषांनीं उपाशीपोटीं आततायी देशवेसेचा मार्ग सोडून भरल्या पोटीं राजकारण लढवावें अशी त्यांना माझी विनंति आहे. गांधींच्या उपासाच्या आचरटपणाचें सर्व जग जरी कौतुक करीत असलें तरी एखादा मामूली आदमी या दिव्यांत खतम झाला तर 'मूर्ख बेटा, भलत्याच भानगडींत पडल्यावर मरेल नाहीं तर काय?' असेच उद्गार लोकांच्या मुखांतून बाहेर पडतील. महात्माजींचीं खुळें त्यांनाच शोभतात—इतरांनीं त्या फंदांत पडूं नये हेंच उत्तम.

## माझ्या मुलाच्या निमित्तानें

मुंबईतील बॉम्बे बुक डेपोचे देसाई हे बडे उमदे आदमी आहेत. त्या दिवशीं दुकानांत नेहमींप्रमाणें खूप गर्दी असूनहि ते न त्रासतां प्रत्येक गिऱ्हाइकाला संतुष्ट ठेवण्याचा यत्न करीत होते. गर्दी जरा कमी झाल्यावर त्यांचें लक्ष माझ्याकडे गेलें व माझ्या हातांत 'सह्याद्रि' मासिकाचा अंक पाहून त्यांनीं कपाटांतली डिक्शनरी माझ्या हातांत मिस्किलपणानें हंसत दिली. के. नारायण काळ्यांचा विद्वत्ता-प्रचुर लेख त्या अंकांत प्रसिद्ध झाल्याचें त्यांना ठाऊक होतें. माझ्या-प्रमाणेंच चारपांच वाचकांनीं दुकानांत बसून संस्कृत कोशाच्या मदतीनें के. नारायणांचा लेख 'नारायणं नमस्कृत्य' करून वाचला होता. दुकानांतला एक कॉलेज-कुमार बोलला, 'हें पहा, देसाई, सह्याद्रीची लिपि आणि काळ्यांचा लेख—माझ्यासारख्याला कसा कळणार तो! मीं तो दोनतीनदां वाचण्याचा प्रयत्न केला, पण स्थाणुत्व, गतिमानता वगैरे शब्द पाहून माझें धाबेंच दणाणलें. मागें काळ्यांनीं केव्हांतरी 'चाक्षुष' हा शब्द वापरला होता म्हण-तात. खरेंच, बेसिक मराठी निघाली तर काळे, लालजी पेंडसे वगैरे थोर साहित्यिकांना बेसिक मराठींतच लेख लिहिण्याची मी तरी विनंति करीन. एरवीं काळे विद्वान् आहेत, वाङ्मयाचा त्यांचा

अभ्यास सखोल आहे, कांहींतरी उत्तम लिहिण्याची तळमळहि त्यांना आहे–पण भाषा मात्र भयंकर बोजड असते त्यांची. मला वाटतें, ते पहिल्यानें सोप्या आणि सरळ भाषेंत लेख लिहितात व नंतर संस्कृत कोश घेऊन तो कठिण करतात. पुण्यास इतक्या चोऱ्या होतात–पण काळ्यांचा संस्कृत कोश चोरण्याची सुबुद्धि कोणालाहि अजून कशी होत नाहीं ?' कॉलेज-कुमाराच्या वक्तव्यावर विचार करीत मी घरीं आलों आणि काळ्यांचा लेख वाचला. एकंदरीनें काळे बोलपटांच्या टीकाकारांवर बरेच गरम झालेले दिसतात. बोलपटांचीं निर्भीड [ म्हणजे 'त्या' अर्थानें नव्हे ! ] व प्रामाणिक परीक्षणें कां होत नाहींत याचीं कारणें काळे स्वतः कलानिर्मितीमध्यें दंग असल्यानें त्यांना माहीत नाहींत असें मला वाटतें. काळ्यांची विचारसरणी मलासुद्धां पटते व त्यांनीं समतोल बुद्धीनें लिहिलेला लेख खरोखरीच वाचनीय आहे. रागावून, कातावून लिहिणें शक्य असूनहि तो मोह काळ्यांनीं टाळला आहे.

**प्रोडयूसर्सना प्रामाणिक टीकाकार हवेत काय !**

एकंदरीनें पाहतां बोलपट निर्माण करणाऱ्यांना प्रामाणिक व 'पुरोगामी' [ म्हणजे हो काय, काळे ? ] टीकाकार मनापासून हवेत कीं काय याचीच मला शंका येते. जरा कुठें थोडीशी तिखट टीका झाली तर त्याचा ठसका प्रोडयूसर्सना लागतो कीं नाहीं हें काळ्यांना पुण्यांतहि प्रभात कंपनीच्या हपिसांत चौकशी केल्यास समजण्यासारखें आहे. 'सत्र है' या बोलपटाची गोष्ट घ्या. या बोलपटानें दादासाहेब तोरण्यांनीं कलेचें तोरण बांधलें, कीं कंपनीला काशीयात्रा घडवून कलेच्या अस्थि गंगार्पण केल्या हेंच मला समजत नाहीं–पण ही गोष्ट स्पष्टपणें सरस्वतीला सांगण्याचें धैर्य किती टीकाकारांनीं दाखविलें बरें ?

प्रामाणिक टीका एखाद्या पेपरमध्यें आली तर त्याच्या जाहिराती एकदम बंद होतात, हें काळ्यांना कदाचित् ठाऊक नसेल. सध्यांच्या हलाखीच्या दिवसांत प्रोड्यूसर किंवा जाहिरातींच्या एजंटांच्या घरचें कुत्रें आलें तरी ' अहो हड ' म्हणण्याची वेळ आली आहे. अशा स्थितींत कोणता मूर्ख पत्रपंडित आपलें नुकसान करून घेईल ? बोलपटांची तर बातच सोडा—पण शांतारामांच्या नवीन सामाजिक बोलपटांचीं नांवें कोणत्या अकलेच्या खंदकांतून खोदून काढलीं याची कुणीं चौकशी केली तर शांतारामांना ती रुचेल काय ? तसेंच प्रभात रोडपासून स्टुडिओपर्यंत प्रभातच्या नयनमनोहर ट्रेडमार्कच्या आकृतीचें विडंबन करून ती उलटी कां केली असा मीं प्रश्न केला तर तो तरी शांतारामांना आवडेल का ? ट्रेडमार्क म्हणजे निर्मात्याच्या कलागुणाचें व अभिमानाचें प्रतीक असतें आणि त्याचें विडंबन माझ्यासारख्या प्रभातच्या गरीब हितचिंतकाला उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचें जिवावर येतें. या बारक्या सारक्या गोष्टींतली टीका प्रभातला मानवणार नाहीं हें मला माहीत आहे. मग मी उद्यां त्यांच्या एखाद्या बोलपटावर सणसणीत टीका केली तर तें पाप मीं कुठें फेडावें ? माझा तर असा अनुभव आहे, काळेसाहेब, कीं प्रामाणिक टीकाकारांशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणेंसुद्धां कलावंतांना ( ? ) कमीपणाचें वाटतें. खरी वस्तुस्थिति काळ्यांना माहीत नसण्याचा संभव असल्यानें, मीं कांहीं गोष्टी खुल्या दिलानें त्यांना सुनावण्याचें धाडस केलें आहे. बॉम्बे टॉकीजचें अंत:करणहि टीकेच्या बाबतींत फार हळुवार आहे. विरुद्ध टीका त्यांना पचत नाहीं हें मी स्वानुभवानें सांगतों.

## बेजबाबदार टीकाकार

याचा अर्थ सामान्य टीकाकार आपली जबाबदारी ओळखून असतो असाहि नाहीं. वर्तमानपत्र ही संस्था वास्तविक आंब्याच्या झाडाप्रमाणें असायला हवी. समाजाला तिच्याकडे पाहून आनंद वाटावा आणि त्या संस्थेखालीं विसांवाहि मिळावा. पण आमच्या दैन्यामुळें मामुली वर्तमानपत्रें बाभळीच्या झाडांप्रमाणें झालीं आहेत. तीं दिसायलाहि धड नसतात आणि त्यांची छायाहि विसांव्यासाठीं पुरेशी नसते. त्यांच्याजवळ जाऊन कुणी जास्त लगट करूं पाहील तर त्यांचें कांटेरी स्वागत नेहमींच तयार असतें. पण मी पत्रपंडितांना अगदीं दोष देत नाहीं—जगणें हें त्यांचें आद्य कर्तव्य असतें व म्हणूनच बोलपट कंपन्यांशीं वैर करणें त्यांना परवडत नाहीं. इंग्लंडमध्येंहि हीच परिस्थिति असून तेथील बडे जाहिरातदारहि वर्तमानपत्रांना त्राहि भगवन् करीत असतात. तसेंच म्हटलें तर ज्या बोलपट कंपन्या लाखों रुपये धंद्यांत घालतात त्या स्तुति उकळण्याचा आपला हक्कहि गमावण्याइतक्या बेवकुफ असाव्यात असें मी तरी म्हणणार नाहीं. जगाच्या अंतापर्यंत हें असेंच चालावयाचें हें काळ्यांना मीं सांगावें असें नाहीं. माझा 'थीसिस' हाच आहे, कीं या सर्व गोष्टी दृष्टीआड करून काळ्यांनीं टीकाकारांना धारेवर धरावयाला नको होतें. प्रेक्षक आणि प्रोडयूसर्स यांमध्यें संबंध उत्पन्न करणारी एखादी शृंखला निर्माण होऊन बोलपटांबद्दल मामुली प्रेक्षकांना कांहींतरी उच्च दर्जाचें ज्ञान व्हावें या हेतूनें एका गरीब संपादकानें महाराष्ट्रांतील आघाडीवर असलेल्या एकदोन कंपन्यांकडे आपल्या नियतकालिकांत पुरवणीसाठीं साहाय्याची याचना केल्याचें मला नक्की माहीत आहे. पण त्याच्या प्रयत्नाला अजूनहि यश आलें नाहीं यावरून

अशा उपक्रमांची जरूर कंपन्यांना अजूनहि वाटत नाहीं हें उघड आहे. मनांत असूनहि प्रामाणिक परंतु गरीब संस्थेच्या चालकांना अशी पुरवणी देणें परवडत नाहीं. पण असा अभिनव उपक्रम करण्याची वेळ आज निश्चितपणें आली असून अशा प्रयत्नांत शंपन्नास रुपये खर्च झाले तर ते सत्कारणींच लागतील हें तज्ज्ञांनीं कृपा करुन लक्षांत आणावें. विनाकारण एकमेकांचे गुणदोष काढण्याचे हे दिवस नाहींत. सर्व कांहीं खेळीमेळीनें झालें तर त्यांत सर्वांचाच फायदा आहे.

### गरीब बिचारे ' शंकरभाऊ '

किर्लोस्कर मासिकाचा आदर्श समोर ठेवून ' बेतलेल्या ' झारापकर मासिकांत प्रो. मा. का. देशपांडे यांनीं शंकरराव किर्लोस्करांचें स्वभावचित्र रेखाटलें आहे. पुण्याच्या साहित्यक्षितिजावर नुकतेच उदयाला आलेले मशारनिल्हे लेखक हे एक असून, आपण तीन लेखांतच साहित्यिक बनलों असें या स्वारीला वाटण्याचा संभव आहे. परंतु लेखकाची एकंदर करामत पाहिली म्हणजे अर्धवट लेखाच्या हळकुंडानेंसुद्धां पिवळें होणें त्यांना अशक्य नव्हतें. हे गृहस्थ केव्हांतरी किर्लोस्करवाडीला गेले होते, हें त्यांच्या त्या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या ' फोटु'वरून मला कळलें. परंतु शंकररावांचें स्वभावचित्र ' असें ' रेखाटून त्यांना ' अति माणूस ' (Superman) करतील, अशी शंका खुद्द शंकररावांनासुद्धां आली नसेल. महायुद्धानंतरच्या महाराष्ट्रांतील कर्तबगार पुरुषांच्या इवल्याशा यादींत शंकररावजींबरोबर ताम्हणकरांचा ' दाजी ' नाहीं हें पाहून त्यांनीं समाधानाचा सुस्कारा सोडला असेल. कर्तबगार मूर्खांची यादी कोणत्याहि समाजांत मोटी असली तरी कर्तबगार शहाण्यांची यादी प्रो. देशपांड्यांना वाटते तितकी लहान

खासच नसते. एका लेखिकेनें भाबडेपणानें शंकररावांना लिहिलेल्या एका पत्रांतील उतारा देऊन प्रो. देशपांड्यांनीं तर सदभिरुचीचा अभावहि पूर्णपणें दाखविला आहे. लेखांतील अखेरचा जाड ठशांतील मजकूर वाचून तर ' ईश्वरा, या मित्रापासून माझें रक्षण कर ' असें वैतागानें म्हणण्याची पाळी शंकररावांवर आली असेल. आतां देशपांड्यांचे कृपाकटाक्ष प्रो. फडक्यांवर पडले असल्यानें, मला अप्पासाहेबांबद्दलहि सहानुभूति वाटूं लागली आहे. बाकी अत्र्यांच्या विनोदावरील व बर्नार्ड शॉवरील प्रो. मजकुरांचे लेख पाहून झारापकरांनीं देशपांड्यांचे लेख ' विनोदी ' म्हणून छापावयाला कांहींच हरकत नाहीं. मार्च—एप्रिल १९३९

## व्यक्तित्वाचा आधार

थोर लोकांचें व्यक्तित्वसुद्धां अगदीं लहान गोष्टींवर कसें आधारलेलें असतें हें मला प्रो. बापूसाहेब चाफेकर परवां भेटले त्या वेळीं कळलें. बापूसाहेब त्या वेळीं आपल्या नेहमींच्या पगडींत नसून साध्या काळ्या टोपींत होते. पण पगडी आणि बापूसाहेब यांचें साहचर्य माझ्या डोळ्यांना इतकें पटलें आहे कीं, टोपी घातलेल्या बापूसाहेबांचें व्यक्तित्व माझ्या दृष्टींत पहिल्यानें आलेंच नाहीं. बर्नार्ड शॉ किंवा पुण्याचे भगवा फेटा बांधणारे बाबासाहेब देशपांडे यांच्या चेहरेपट्टींत केसाचाहि फरक पडला तर त्यांना ओळखणें मुष्किलीचें होईल. कॉमरेड काणेकर हे आपल्या स्वतःच्या घरींसुद्धां टोपी घालून गेले तर ' शेट घरीं नाहींत ' असा जबाब त्यांचा गडी त्यांनाच देईल. ठराविक पगडी किंवा फेटा बांधलेले थोर लोक केमिस्टच्या कपाटांतील लाल जांभळी बुचें असलेल्या औषधांच्या बाटल्यांप्रमाणें मला वाटतात. शेंगदाण्यावर आधारलेलें तात्यासाहेब केळकरांचें व्यक्तित्व सर्वांच्याच परिचयाचें आहे.

हरभऱ्याच्या झाडावर ‘ सत्यवादी ’ कारांसारख्या अनेक लोकांचें व्यक्तित्व मजेनें विसांवा घेत असेल अशी कल्पना करणें अशक्य नाहीं. भाजीबाजारांतील बटाट्यांची टोपली पाहिली म्हणजे अनेक कवींच्या डोक्यांची आठवण होऊन त्यांच्या ‘व्यक्तित्वा’ची जाणीव मला होते. छत्तिसाचा आंकडा दिसला कीं अत्रे–वरेरकर डोळ्यांसमोर येतात. बाळासाहेब खेरांचें हंसणें आणि नमस्कार करण्याची त्यांची विनयशील ऐट, त्यांच्या व्यक्तित्वाचीं प्रतीकें म्हणून इतिहासजमा होण्यास हरकत नाहीं. चेंबर्लेन साहेबांची छत्री, लॉर्ड बॉल्डविन यांची पाइप आणि लॉइड जॉर्ज यांचे के. नारायण काळ्यांप्रमाणें जावळ यांची ओळख अलम दुनियेला झाली आहेच. गांधींच्या व्यक्तित्वाची बरीचशी मदार त्यांच्या गरीब शेळीवर इतकी आधारलेली आहे की, तीं बिचारी शेळी डॉ. मुंज्यांच्या तडाख्यांत सांपडून कधीं काळीं जिवानिशीं गेली तर महात्माजींचें व्यक्तित्व त्यांच्या चहात्यांना सुद्धां वातड लागण्याचा संभव आहे. बॅरिस्टर सावरकरांचें व्यक्तित्वहि आजकाल दंतवैद्यांचा ऐसपैस आधार घेतांना दृष्टीस पडतें. या सर्व गोष्टी लक्षांत आल्या म्हणजे थोर लोकांकडे मामुली जनतेचें लक्ष किती बारकाईनें असतें याची उपपत्ति लागते––अर्थात् थोरांना त्याची दादहि नसते ही गोष्ट निराळी.

## संपादक पिसाळला

यंदाच्या मॅट्रिकच्या परीक्षेंत मराठी भाषांतराचा जो एक दिव्य नमुना प्रसिद्ध झाला आहे, तो पाहून प्रसाददीक्षेच्या भाषांतरकाराला हायसें वाटेल. त्या विचित्र भाषांतरावर सर्व पत्रांनीं हल्ले केले आहेत हें योग्यच आहे. परंतु येथील ‘ प्रभात ’ पत्रानें त्या परीक्षकाची ‘ परीक्षक कीं हजाम ’ म्हणून जी हजामत केली आहे,

ती मात्र सदभिरुचीला धरून नाहीं असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. परीक्षकाची अत्यंत कडक शब्दांत हजेरी घेतांना, इतर पत्रांना उपमेसाठीं हेअर कटिंग सलूनचा उंबरठा झिजविण्याची पाळी आली नाहीं हें प्रभातकारांच्या लक्षांत आलें असेलच. श्री. नवरे हें आज जें पवित्र समाजकार्य करीत आहेत तें लक्षांत आणलें म्हणजे त्यांच्या चिडून लिहिण्याबद्दल तर फारच वाईट वाटतें ! चूक होऊं नये पण ती झाली तरी अशा पद्धतीची टीका करण्यापेक्षां कांहीं विधायक सूचना करण्याकडे नवऱ्यांनीं आपलें रक्त आटाविलें असतें तर तें त्यांच्यासारख्या कष्टाळू आणि अबोल समाजसेवकाला शोभलें असतें. नवऱ्यांसारख्या मामुली संपादकाला यशस्वी पत्रपंडित म्हणून अजूनहि लौकिक कमावायचा आहे. त्यापूर्वी तरी दुसऱ्याच्या हातांत जबरदस्तीनें वस्तरे देण्याचा त्यांना अधिकार नाहीं असें मला वाटतें. एका परीक्षकाला हजाम म्हण, दुसऱ्याला कामावरून काढा म्हणून शिफारस कर, अशानें काम भागेल असें नवऱ्यांना वाटत असेल तर गोष्ट निराळी. मराठीवर अत्याचार केलेल्या वेड्यावांकड्या परदेशी जाहिराती प्रसिद्ध झालेल्या पाहून नवऱ्यांचा मराठीबद्दलचा प्रेमाचा पुळका कुठें जातो हेंच मला समजत नाहीं. अशा जाहिरातींना पैसे मिळतात म्हणून जर मराठीच्या पावित्र्याकडे दुर्लक्ष करावयाचें असेल तर माझें कांहीं म्हणणें नाहीं. अशा जाहिराती छापण्याचें सर्व पत्रांनीं बंद करावें अशी चळवळ नवऱ्यांनीं केली तर बिचाऱ्या मराठी भाषेचे प्रत्यहीं होत असलेले धिंडवडे तरी थांबतील. पण परीक्षकाला हजाम म्हणण्यापेक्षां ही कामगिरी खासच कठीण आहे हें नवरे जाणतात. या पवित्र कार्यांत दत्तोपंत पोतदारांचें साहाय्य नवऱ्यांनीं घेतलें तर कांहींतरी फायदा होईल असें मला वाटतें. मराठींतील सर्व प्रमुख

पत्रांनीं या परदेशी जाहिरातवाल्यांना वठणीवर आणण्याचें ठरविलें तर अल्पावधींतच नवऱ्यांना यश येईल.

## क्रमिक पुस्तकें

ना. बाळासाहेब खेरांची स्थिति आज लेकुरवाळ्या बाईसारखी झाली आहे त्यांनीं आजवर किती कमिट्या स्थापन केल्या हें त्यांना-सुद्धां नक्की सांगतां येईल कीं नाहीं कोण जाणे! पूर्वीच्या त्या सर्व कमिट्यांच्या जोडीला क्रमिक पुस्तकांची कमिटी आतां नेमण्यांत येण्याचें जाहीर झालें आहे. कायदेमंडळांत झालेली या प्रश्नावरील चर्चा वाचूनहि सर्व शाळांतून एकजात एकाच गोत्राचीं पुस्तकें असावींत असें मला वाटत नाहीं. क्रमिक पुस्तकें तयार करण्यास आज बुद्धिमान् व तज्ज्ञ लोकांची जी चढाओढ चालली आहे तिच्यामुळें उत्कृष्ट पुस्तकांची निर्मिती होण्यास बहुमोल मदत होत आहे. पण क्रमिक पुस्तकांचा सरकारमान्य असा एकच 'सट' तयार झाला तर त्यामुळें वाटेल तो चमत्कार होणें अशक्य नाहीं. पुस्तकें तयार करणारांत कॉंग्रेस छापाचे वठलेले वृक्ष आले तर त्यांना नवविचारांची नयनमनोहर पालवी फुटणें कधींतरी शक्य आहे काय? प्रतिभेचे आणि बुद्धीचे झुळझुळ वाहणारे जीवंत झरे आटून, बुरसलेल्या विचारसरणीचें डबकें (Intellectual stagnation) त्याऐवजीं निर्माण होऊन तसल्या निर्जीव व रोगट जलाशयावर कोंवळ्या मुलामुलींना आपली ज्ञानपिपासा तृप्त करण्याचा प्रसंग येईल. तसेंच क्रमिक पुस्तकें तयार करण्याच्या धंद्यांत ज्या लोकांनीं लाखों रुपये गुंतविले आहेत त्यांमुळें तर हा प्रश्न जास्तच गुंता-गुंतीचा होणार आहे. 'क्रमिक पुस्तकबाजीवर' हे लोक जर भरमसाट फायदा घेत असतील तर त्याला सरकारनें खुशाल आळा घालावा. एकंदरींनें विचार केला तर सध्यांचीं क्रमिक पुस्तकें टाकाऊ आहेत

असेंहि कुणाला म्हणतां येणार नाहीं. तर मग त्याचें धोरण बदलण्याची स्फूर्ति लीलावती मुनशी यांना एकाएकीं कां यावी हें मला समजत नाहीं. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट हीच कीं, हा प्रश्न कमिटीवर सोंपविला जाणार असल्यानें एक पिढी तरी सहज निघून जाईल. कोणताहि तांतडीचा प्रश्न लांबणीवर टाकण्याचा कमिटी हा राजमान्य मार्ग असल्यानें, आज तरी सर्वांनीं निर्धास्त असायला हरकत नाहीं. या प्रश्नावर डॉ. परांजपे यांचें टाइम्समधील पत्र फार महत्त्वाचें आहे.

### अनुक्रमणिकेचा नमुना

सरकारमान्य कमिटीवर क्रमिक पुस्तकें 'पकविण्या'साठीं सोनगांवकर, प्रसाददीक्षेचे शहाणे भाषांतरकार, लक्ष्मुबाई ठुसे, नवाकाळ ( यांत 'संध्याकाळ' नांवाचें पिटुकलें सामील आहे ), लोकशक्ति आणि प्रकाश या पत्रांचे प्रतिनिधी वगैरे विद्वान् मंडळी असली तर विद्यार्थ्यांचा ग्रंथच आटोपला म्हणायचा. वरील प्रत्येकजण आपापल्या परीनें वाचकांचे हाल करायला समर्थ आहे—मग 'किमु यत्र समुच्चयम्'? अशा कमिटीमार्फत जीं पुस्तकें 'शेपल्या' जातील त्यांतील एखाद्या पुस्तकाची तरी अनुक्रमणिका खालीलप्रमाणें असली तर वाचकांना नवल वाटण्याचें कारण नाहीं.

### अनुक्रमणिका

**चरित्रें**:—महात्मा गांधी, शंकरराव देव, मीराबेन, जमनालाल बजाज, जनरल आवारी वगैरे.

**आरोग्यविषयक**:—नीरापानाचे फायदे, उपासाचें महत्त्व, खजुराचा उपयोग, मोसंब्याचा रस ( यालाच कांहीं चावट लोक 'मोशी वॉटर' म्हणतात ), मातीच्या लेपाचें महत्त्व, शेळीच्या दुधांतील जीवनसत्त्वें ( व्हिटॅमिन्स ) वगैरे.

**नीतिपर:**—सत्य आणि अहिंसा, सत्याग्रहीचे आवश्यक गुण, ‘ दारू पीना हराम है’, ‘ जय स्वावलंबन ’, ‘ कष्ट करा, कष्ट करा ’ वगैरे.

**स्थानमहात्म्यः**—शेगांव, सासवड, राजकोट, दिल्ली, जुहू, लंडन, साबरमती इत्यादि.

**सटर–फटर:**—इंग्रज लोकांचे सद्गुण, सुधारणांची मोडतोड, ( अर्थात् सुधारणा राबविणें ), काळ्या कायद्यांची आवश्यकता, फंड जमविण्याचें तंत्र, हिंदी याने हिंदुस्थानी, प्रभात-फेरी वगैरे.

**काव्य:**—‘ वैष्णवजन तो तेने कहिये ’, ‘ वंदेमातरम् ’.

**औद्योगिकः**—खादीची निपज, चरख्याचा इतिहास, व्याख्यानें देणें वगैरे.

इतक्या ‘ राष्ट्रीय ’ दृष्टीनें पुस्तकांपुढें अत्रे–घाटे–रानड्यांच्या पुस्तकांची काय किंमत ! बाकी असलीं ‘ राष्ट्रीय ’ पुस्तकें आपल्या मुलांना वाचावीं लागतील हें पाहून महाराष्ट्रांत तरी संततिनियमन फार जोरांत होऊं लागेल अशी मला खात्री आहे.

## दारूबंदी

येत्या ऑगस्टपासून मुंबई सरकार एका फार मोठ्या प्रयोगाला सुरुवात करणार आहे. निर्बुद्ध आणि भेसूर कार्टून्स, वेडेवांकडे पोस्टर्स, मदिरा-राक्षसाची होळी, आपल्या घोगऱ्या आवाजानें लाउड स्पीकर्समधून जनतेला अट्टहासानें दारूवर व्याख्यानें बरळणारे ‘ बल्लंटेर ’ वगैरे प्रकार पाहिले म्हणजे सरकार या बाबतींत किती ‘ सीरिअस् ’ आहे याची कल्पना येते. टेकीला आलेले शेतकरी, न्याय व अंमलबजावणी यांचा चाललेला अंन्याय्य संसार, भीषण बेकारी, प्राथमिक शिक्षणाची कुचंबणा, व्यापाराची मंदी व जनतेचा तीव्र असंतोष–या सर्वांकडे मात्र

सरकारनें दुर्लक्ष करून, विरोधी पक्षाचा Hasten slowly चा उपदेश न ऐकतां एका फार मोठ्या कार्याला सरकारानें हात घातलेला पाहून, सरकारला या प्रयोगांत शंभर टक्के यश यावें अशी माझी ईश्वराला विनंती आहे. हा प्रयोग अमेरिकेंत यशस्वी रीतीनें अयशस्वी झाला ही गोष्ट सरकारनें दृष्टीआड केलेली नाहीं हें लक्षांत घेतलें म्हणजे सरकारच्या आत्मविश्वासाचें कौतुक वाटतें. मी स्वत: संपूर्ण दारूबंदी व्हावी या मताचा आहें. तरीपण अनादिकालपासून जगांत मदिरा आहे, स्वर्गांतसुद्धां सोमरसानें वेहोष झालेल्या देवादिकांना प्रोहिबिशन नाहीं हें पाहिलें म्हणजे सरकारनें या बाबतींत आस्ते कदम जाण्याचें धोरण स्वीकारलें असतें तर तें जास्त मुत्सद्दीपणाचें झालें असतें असें मला वाटतें. दारूपायीं जमीनदोस्त झालेले गरीबांचे संसार पुन्हां उभे करायला, श्रीमंत घरवाल्यांवर आज कर लादण्यांत आला आहे. अपकारी खात्याचें उत्पन्न बुडवून सरकार या उपकारी प्रश्नाला हात घालीत आहे. ही सर्व जबरदस्त किंमत देऊन दारूबंदी झाली तर मुंबई सरकारनें सर्व जगाला एक अपूर्व संदेश दिल्यासारखें होईल. पण हा प्रयोग दुर्दैवानें कोलमडून पडला तर इतर प्रांतांवर त्यांचा फार मोठा परिणाम होऊन ते प्रांत खात्रीनें कच खातील. मत-प्रदर्शनाची किंवा सरकारला उपदेश करण्याची वेळ आतां निघून गेल्यानें हें सर्व लिहिणें एका अर्थानें अर्थात् फोल आहे. तरी पण दारूबंदीचा प्रयोग अपेक्षेप्रमाणें यशस्वी होत नाहीं असें सरकारला दिसून आलें तरी त्यांनीं हा प्रयोग सोडून न देतां विरोधी पक्षाचा Hasten slowly हा मार्ग पत्करावा—पण प्रयोग मध्येंच सोडूं नये.

स. नि. ५५८



## समाजांतील एक दुर्दैवी वर्ग

दारूबंदीमुळें समाजांतील एका दुर्दैवी वर्गाचे फार हाल होणार आहेत. माझ्या ओळखीचा एक श्रमजीवी म्हातारा आहे. शिक्षणाच्या अभावीं त्याला आपलें वयहि सुदैवानें नक्की सांगतां येत नाहीं, त्यामुळें आपण मृत्यूच्या किती जवळ आहों याची त्याला दादहि नाहीं. हक्कानें प्रेम करणारीं त्याचीं सर्व माणसें त्याला सोडून देवाघरीं गेलीं आहेत. संध्याकाळीं कामानंतर गत-कालांतील रम्य स्मृतिचित्रें पाहण्यांत त्याचा वेळ जात असला तरी त्याला त्यांची विस्मृति हवी असते. जो तो आपल्या संसारांत दंग असल्यानें म्हाताऱ्याशीं चार घटका बोलून त्याला सुखी करण्या-इतका इतरेजनांना साहाजिकच वेळ नसतो. इतरांचीं गोजिरवाणीं मुलें पाहून त्याचे बाहु स्फुरण पावत असतील. हो, आपलींहि नातवंडें अशींच नव्हतीं काय? रात्रीं भाकरी खायची तीसुद्धां एकट्यानेंच! एकाकी जीवन म्हणजे काय याची कल्पना फार थोड्यांना असेल. वाचकहो, अशा लाचार स्थितींत त्याचे पाय ताडीच्या दुकानाकडे वळतात व त्याला नकळतच तो ताडी पिऊन विस्मृतीनें गतजीवनाच्या दुःखद स्मृतीवर विजय मिळवितो. या म्हाताऱ्याला व्यसनी म्हणून मीं कधींहि नांवें ठेवलीं नाहींत. उलट मजजवळ पैसे असले तर त्याचें सुख विकत घेण्यासाठीं मीं ते अनेक वेळां खर्च केले आहेत. त्याला यामुळें मधून मधून कर्जहि होतें. पण प्रेमाचें आणि सहानुभूतीचें ऋण त्याला कोणीहि देत नसल्यानें त्याला या ऋणाचीहि फारशी फिकीर वाटत नाहीं. नीतिमत्तेच्या आणि सदाचरणाच्या कुणी सुखासुखी बाता मारायला लागला, तर निष्प्रेम आयुष्य व्यतीत करणारा हा म्हातारा उपदेश करणाऱ्याकडे पाहून तुच्छतेनें हंसतो आणि ताडीच्या दुकानाकडे

वळतो–त्या नीतिमार्तंडाला उत्तर देण्याचीहि तो तकलीफ घेत नाहीं. हा म्हातारा दारुडा नाहीं.–त्यानें दारू पिऊन अजूनहि गटारें गांठलीं नाहींत. तो औषध म्हणूनच दारू पितो. या मुंबईत असे अनेक लोक असतील. त्यांची ऑगस्टपासून काय स्थिति होईल हें मला तरी सांगतां येत नाहीं. पण अशा दुर्दैवी लोकांना सरकारनें दारू पिण्याचें Permit दिलें तर त्यांना जिवंत राहणें शक्य होईल. कांहीं लोक तर मुंबईसुद्धां सोडून जातील असें मला वाटतें.

‘ दळूबाई संमेलन ’

बॅरिस्टर सावरकरांना अधुनमधून विचित्र फतवे काढण्याची लहर कां येते हेंच मला समजत नाहीं. मराठी साहित्यसंमेलनाच्या वेळीं त्यांनीं असाच एक संदेश देऊन नगरला जमलेल्या साहित्यिकांना विनाकारण दुखविलें आहे. ‘ दळूबाई संमेलन ’ करण्यापेक्षां हैद्राबादला शेंदोनशें साहित्यिक नगरसंमेलनानें सत्याग्रहासाठीं पाठवावेत असा त्यांना ‘ वटहुकुमा ’चा सारांश आहे. वास्तविक सध्यांच्या धकाधकीच्या काळांतसुद्धां दादर येथें केळुस्कर पथावर राहाणाऱ्या या वीरानें गेल्या वर्षी मुंबईच्या संमेलनांत जात्यावर बसून साहित्याचें पीठ दळलें होतें. सावरकरांचे हे उद्गार वाचून त्यांची धर्मसेवा लक्षांत आणूनहि पुष्पवृष्टि करून घेण्यापलीकडे किंवा चांदीच्या रथांतून मिरविण्यापलीकडे त्यांनीं काय पराक्रम गाजविले असें कुणीं खवचटपणानें विचारलें तर हे राव काय उत्तर देतील ? जगांतील हिंदुधर्म नाहींसा व्हावा किंवा हैद्राबादचे हिंदु नामशेष व्हावेत असें नगर येथें जमलेल्या साहित्यिकांना खासच वाटलें नाहीं. मग तात्यारावांनीं साहित्यिकांना कां डिवचावें हेंच मला समजत नाहीं. हैद्राबादला साहित्यिक पाटवा, ही गोष्ट निराळ्या भाषेंत सांगण्याइतकें तात्यारावांचें मराठी खासच ‘ सशक्त ’ आहे. आपण स्वतः सत्या-

ग्रहासाठीं कां जात नाहीं, दोघां बंधूंना कां पाठवीत नाहीं ? असे प्रश्न कुणीं विचारले तर त्यांना समाधानकारक उत्तर देणें सोपें नाहीं. तात्यारावांबद्दल माझ्या मनांत आदर असूनहि मला टीका करावी लागत आहे याबद्दल मला वाईट वाटतें. माझें हें पाप दंतवैद्यांना विचारून ते क्षम्य मानतील अशी मला आशा आहे. मनुष्य कितीही थोर झाला तरी त्यानें Dignity सोडतां कामा नये हें तात्यारावांनीं विसरूं नये. बाकी शंभर कवि हैद्राबादला पाठविले तर सर अकबर एका क्षणांत शरण येऊन हिंदूंना वाटेल ते हक्क देतील याची मला खात्री आहे. काव्यगायन म्हणजे काय आफत आहे याची कल्पना सर अकबर यांना असेलच. आपले ते पुण्याचे कवि–सर्वांना वठणीवर आणायला ते एकटेहि समर्थ आहेत. पण जाऊं द्या. उगीच नांव घेऊन सर अकबरना मी जागें तरी कशाला करूं !

## ब्रह्मचारीची जाहिरातबाजी

निर्बुद्ध जाहिरात लिहिण्याचा मक्ता फक्त पुण्याचाच नाहीं व या विद्येंत आम्ही मुंबईकर पुणेंकरांच्या पुढें आहोंत ही गोष्ट येथील रॉयल फिल्म सर्किटनें येथें ब्रह्मचारी सुरू झाल्यापासून सिद्ध केली आहे. राष्ट्रीय ब्रह्मचर्य, लग्नपट वगैरे शब्द पेरून रॉयल रत्नांच्या जाहिराती जें विद्वद्रत्न लिहितें त्याच्या अचाट बुद्धिवैभवाची खात्री सर्वांना पूर्णपणें पटली आहे. या बृहस्पतीनें खरडलेल्या जाहिरातींचें स्वतंत्र पुस्तक केलें तर जाहिरात कशी लिहूं नये याचें ज्ञान होतकरू लोकांना होईल. ब्रह्मचारीच्या चर्चेबद्दल दोन ' अपघात ' होऊन मुंबईकर दोनदां तोंडघशीं पडले आहेत ही गोष्ट सुद्धां नजरेआड करून चालणार नाहीं. महात्मा गांधींचा उपास चालू असतां त्याचा उपयोग जाहिरातीसाठीं करणें म्हणजे कल्पनाविलासाचा कळस होय. निर्बुद्ध जाहिरातीचा वसंतऋतु बाराहि

महिने रॉयल फिल्म सर्किटच्या हपिसांत फुलला तर वाचकांना फुकट करमणूक सादर केल्याचें पुण्य चालकांना मिळेल. ता. १६ एप्रिलला ब्रह्मचारी बोलपटाच्या चर्चेचा जो बोजवारा उडाला त्याची दादहि कोल्हापूरच्या आमच्या बाळासाहेब पाटलांना नाहीं. हे वर्तमानपत्रकर्तेराव सत्यवादीच्या ता. १९ च्या अंकांत खालील बातमी छापून मोकळे झाले आहेत.

## ब्रह्मचारीवर चर्चा

आचार्य अत्रे यांच्या लेखणींतून उतरलेल्या हंसकृत 'ब्रह्मचारी' या बोलपटावर रविवार ता.१६ रोर्जी, दादर येथें कोहिनूर सिनेमांत, श्री. मामा वरेरकर यांच्या अध्यक्षतेखालीं चर्चा झाली. चर्चेच्या परीक्षक मंडळांत श्री. बाबूराव पटेल, श्री. मालती तेंडूलकर, अनंत काणेकर, श्री. प्र. ह. खाडिलकर, श्री. रमणिकभाई मेहता ही मंडळी असून, चर्चा समाप्त झाल्यावर आचार्य अत्रे यांनीं चर्चेला उत्तर दिलें.

एकूण सर्व दृष्टींनीं ब्रह्मचारी बोलपट चांगलाच गाजला आहे म्हणण्यास हरकत नाहीं.

## स्वदेशी

आमच्या राजकारणाच्या धुराळ्यांत स्वदेशीच्या व्रताकडे जनतेचें दुर्लक्ष होतें आहे ही गोष्ट पुढाऱ्यांच्या लक्षांत आली असेलच. स्वदेशी आणि 'औद्योगिक' प्रदर्शनेंहि या उदासीन वृत्तीला कारणीभूत होत असल्यास नवल वाटण्याचें कारण नाहीं. लग्नाच्या बाजारांत आमच्या कांहीं संस्थानिकांचें लक्ष परदेशी 'माला'कडे जात आहे. आपल्या लाडक्या कन्येला उच्च शिक्षणासाठीं हिंदुस्थानांत एकहि मनपसंत स्थळ आढळलें नाहीं म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूंनीं इंदिरेला पुन्हां विलायतेला पाठविलें आहे. लहानसान परदेशी वस्तु स्वस्त झाल्यानें त्या किती खपतात याची मामुली

लोकांना कल्पनाहि होणार नाहीं. चारदोन आण्यांत विकत मिळ-णारीं ' सोन्याचीं ' कर्णकुंडलें तरुण मुलींमध्यें फार लोकप्रिय झालीं आहेत ही गोष्ट मुलींचें कौतुक करणाऱ्या पालकांना कान धरून वजावण्याची वेळ आली आहे. बक्षिसें देऊन परदेशी कंपन्यांचे ' स्वदेशी ' साबण आज घरोघर खपत असतांना, आमचे साबणाचे कारखानदार कांहीं वर्षांनीं स्वच्छ धुऊन निघतील कीं काय अशी मला भीति वाटायला लागली आहे. नॅशनल प्लॅनिंगची योजना होईल तेव्हां होईल, पण तोंपर्यंत तरी स्वदेशीच्या या प्रश्नाकडे पुढाऱ्यांनीं लक्ष देऊन जनतेमध्यें स्वदेशी व्रताचें प्रेम निर्माण करायला हवें. रोज लागणाऱ्या जिन्नसांची यादी करून स्वदेशी जिन्नस स्वस्त कुठें मिळतील याची माहिती ना. पाटील यांनीं सर्वांच्या सोयीसाठीं सरकारीरीत्या मधून मधून प्रसिद्ध करावी. या बाबतींत मुंबईतील स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर, उद्योगमंदिराचे दादासाहेब रानडे, कांहीं स्वदेशी कारखानदारांचे प्रतिनिधी जनतेला मार्गदर्शक होतील अशी मला आशा आहे. प्रयोगादाखल आमच्या ब्राह्मणसभेच्या इमारतींत सभासदांसाठीं एक छोटासा स्टोअर काढला व तो उत्तम चालला तर इतरांनाहि हा प्रयोग कर-ण्याची उमेद येईल. या बाबतींत माझ्याकडून जी कांहीं अल्प सेवा करून घ्यायची असेल ती मी ब्राह्मणसभेला आनंदानें देईन.

### ग्राहकांची सोसायटी

महाराष्ट्रांत आज अनेक ज्ञातिनिष्ठ संस्था आपापल्या ज्ञातीची सेवा करतांना आपण पाहतों. अशा प्रत्येक संस्थेनें आपल्या ज्ञाति-बांधवांकरितां एकेक सोसायटी ( Consumers' Society ) काढून स्वदेशी मालाला उत्तेजन दिलें तर देशाची कितीतरी मोठी सेवा करण्याचें पुण्य त्यांना लागेल. यामुळें अनेक सुशिक्षित बेकारांना

धंदा मिळून ते अन्नाला लागतील. येथें 'कोना' रेस्टॉरंट व बेकरी तांबे नांवाच्या पदवीधरानें काढली आहे या गोष्टीवरून सुशिक्षित लोक वाटेल तो धंदा प्रामाणिकपणानें करण्यास पुढें येत आहेत ही गोष्ट सिद्ध होते. मी 'कोना' मध्यें जाऊन तेथील स्वच्छतेचा, टापटिपीचा आणि विनयशील नोकरवर्गाचा अनुभव घेतला आहे, त्यावरून आम्हांला उत्कृष्ट रीतीनें उपहारगृहें चालविणें अशक्य नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. (पण फाजील विनय दाखविण्याच्या धांदलींत नोकर लोक गिऱ्हाइकांना बनवीत तर नाहींत अशी शंका आश्रयदात्यांस येणें अशक्य नाहीं हें मी तांब्यांना सांगण्याची परवानगी घेतों.) सनातनी संस्कृतीचा सूड घेऊन आज पुण्यांतील ब्राह्मणवस्तीच्या बालेकिल्ल्यांत इराण्यांचीं व पंजाब्यांचीं मटनाचीं दुकानें चालूं शकतात ही गोष्ट जाणून पुणेकर पदवीधरांनीं अशीं दुकानें खोललीं तर पुण्यांतील पैसा पुण्यांत राहून कांहीं तरुणांना काम मिळेल हें त्यांनीं पूर्णपणें लक्षांत आणावें. पण हा प्रश्न केवळ बेकार तरुणांचा नसून समाजांतील प्रतिष्ठित व जबाबदार लोकांचाहि आहे. लॉंग लाइफचे आपटे, प्रि. गाडगीळ, प्रो. वामनराव काळे, प्रो. ओतुरकर, प्रो. माटे, प्रि. अत्रे, कॉमनवेल्थचे रामभाऊ अभ्यंकर वगैरे पुढाऱ्यांनीं हा प्रश्न हातीं घ्यावा व बेकार तरुणांना कांहींतरी मार्ग दाखवावा अशी माझी त्यांना विनंति आहे. जबाबदार लोक या फंदांत पडले तर समाजाकडून द्रव्याचें साहाय्यहि खास होईल अशी माझी खात्री आहे. सर्वांनींच राजकारणांत पडून त्याचा चिवडा करण्यापेक्षां स्वदेशीच्या क्षेत्रांत शिरून कांहींतरी उज्ज्वल व पवित्र देशसेवा करावी. हें कार्य सोपें नसलें तरी कठीणहि नाहीं असें माझ्या अल्प मतीला वाटतें. मात्र बेकार तरुणांनींच ही गोष्ट मनावर घ्यायला हवी. मे १९३९

## दैनिक संध्याकाळ

दारूबंदीच्या निमित्तानें मुंबईला गेल्या एप्रिलपासून 'संध्याकाळ' या नांवाचें एक स्वस्त दैनिक निघूं लागलें आहे. नवाकाळच्या रूक्ष वाळवंटांतून संध्याकाळसारख्या पत्रपांडित्याचा नयनमनोहर प्रवाह वर्तमानपत्राच्या सृष्टींत वाहूं लागेल असें मला तरी वाटलें नव्हतें. सौम्य दारूइतकाच माफक मादक विनोद या पत्रांत प्रत्यहीं येत असलेला पाहून, आपला डोळा चुकवून ही गफलत कशी होते या गहन प्रश्नाचा विचार अप्पा खाडिलकर रोज संध्याकाळीं कपाळाला हात लावून करीत असतील. 'शिवराळपंत' करंदीकर हें नवीन नांव वाचतांना खिलाडू वृत्तीचे खुद्द त्रिकाळ-कारसुद्धां, गालांतल्या गालांत हंसले असतील. I used to buy two papers every evening--one for facts and the other for fiction-- पण ' संध्याकाळ ' पत्रांत दोन्हीहि सांपडण्याची सोय असल्यानें माझे आजकाल सात पैसे वांचूं लागले आहेत. गुन्हे आणि अपघातप्रिय वाचकांना तसल्या तऱ्हेच्या सर्व बातम्याहि या पत्रांत हमखास मिळतील. शिष्टपणाच्या नसत्या कल्पनेला बळी पडून ' संध्याकाळ ' पत्राची गाडी सांधा बदलून नवाकाळच्या रुळावर जाणार नाहीं अशी मला आशा आहे.

## डॉ. खऱ्यांची तबियत

डॉ. खरे पदभ्रष्ट झाल्यापासून त्यांनीं लिहिण्याचा आणि बोलण्याचा जो सपाटा चालविला आहे त्यावरून त्यांची प्रकृति अजूनहि ताळ्यावर आलेली नाहीं असें वाटतें. केसरीच्या गळ्यांत फिर्यादीची घोरपड अडकविणारे पूर्वीचे खरे व त्याच्च पत्राच्या गळ्यांत आज प्रेमानें मिठी मारणारे डॉ. खरे हे एकच आहेत हें कुणाला खरें सुद्धां वाटणार नाहीं. कॉंग्रेस शिष्टांच्या उलट्या काळजाच्या

राजकारणाला डॉ. खरे बळी पडल्यापासून त्यांना काळजाचा विकार मध्यंतरीं झाला होता. पण डॉक्टर मजकुरांचें लिहिणें-बोलणें पाहून त्यांचा आजार बुद्धिमत्तेपर्यंत जाऊन भिडला असावा असें मला वाटतें. ज्या कॉंग्रेस पक्षांत डॉक्टर हे अजूनहि राजरोसपणें वावरत आहेत त्याबद्दल बोलतांना त्यांनीं जरा ताळतंत्र राखला तर त्यांच्या-सारख्या जबाबदार माणसाला तें जास्त शोभून दिसेल—राजकारणाची व सदभिरुचीची अगदीं फारकतच असली पाहिजे असेंच कांहीं नाहीं. वास्तविक पुण्याच्या थंड हवेंत डॉक्टरांचें डोकें इतकें ताप-ण्याची आवश्यकता नव्हती. पण परवांचीं त्यांचीं दोनतीन भाषणें पाहून 'गप्प बसायला काय घ्याल' असा सवाल करण्याची वेळ आली आहे. बेछूटपणें वाटेल तें बोलणारा गृहस्थ पंत प्रधान होऊं शकतो हें सुद्धा नागपूरच्या 'तिरंगी' राजकारणाचें एक बेरंगी दृश्य आहे म्हणायचें.

### अन्याय्य हुकूम

मला डी व्हॅलेराचा मोठा राग आला आहे. कांहीं दिवसांपूर्वी त्याच्या सरकारनें तीनशें अविवाहित तरुणांना सहा महिन्यांच्या आंत विवाहबद्ध होण्याचा हुकूम सोडल्याचें मी परवां कुठेंसें वाचलें. आज अत्यंत सुखांत असलेल्या तीनशें तरुणांच्या आशा आकांक्षा सहा महिन्यांनीं जमीनदोस्त होतील याचा विचार डी व्हॅलेरानें करायला हवा होता. सहा महिन्यांनंतर त्यांना स्वतःच्या घरांत अव्यवस्थित राहतां येणार नाहीं; जळलेली सिगारेट वाटेल तिथें टाकतां येणार नाहीं; आपले कपडे जागेवर ठेवावे लागतील; मित्रांबरोबर रात्रीं बेरात्रीं भटकायला मिळणार नाहीं. मला खात्री आहे, कीं सहा महिन्यांत जागतिक युद्ध झालें तर उपरोक्त तीनशें दुर्दैवी तरुण, पत्नीची मुलुखमैदान चुकवून शत्रूच्या तोफेला तोंड

देतील. स्त्री ही चलनी नाण्याप्रमाणें असते. कांहीं अपवादात्मक उदाहरणें सोडल्यास स्त्रीची ' फेस ' व्हॅल्यू ( Face value ) तिच्या खऱ्या व्हॅल्यूपेक्षां नेहमीं जास्त असते असा विवाहितांचा साधारणपणें अनुभव असल्यानें अविवाहित मनुष्य विवाहासारख्या संकटापासून सहसा चार पावलें लांबच असतो. तरी पण समाजालासुद्धां ब्रह्मचारी हा वर्ग साधारणतः नकोसाच असतो. दुसऱ्याचें झोन तिकीट घेऊन स्वतःच्या आयुष्याचा प्रवास करणाऱ्या बिनतिकिटाच्या खुशालचंद व बेजबाबदार उतारूप्रमाणें समाज ब्रह्मचाऱ्यांकडे पाहत असतो असें मला वाटतें.

## साक्षरता-प्रसार

मुंबई सरकारनें साक्षरताप्रसारासाठीं सुरू केलेले प्रयत्न अभिनंदनास पात्र आहेत. ज्या सुखी जीवांनीं आजपर्यंत शाळा चुकवून सुखानें आयुष्य व्यतीत केलें ते मात्र आज सरकारला शिव्या देत असतील. अक्षर-ओळख झाल्याच्या नुसत्या निमित्तानें श्रमजीवी वर्ग पांढरपेशा वर्गाप्रमाणें तकलादू होऊन अधूनमधून आजारी पडूं लागेल—तन्दुरुस्तीसाठीं अज्ञानासारखें दुसरें टॉनिक नाहीं. गेल्या महिन्यांत कु. गोदू गोखले ( म्हणजे आपल्या त्या मामा वरेरकरांची कादंबरी नव्हे ! ) यांना मोटारींतून सारखी ये-जा करावी लागल्यामुळें त्यांच्या शांत स्वभावाला बराच ताण पडला असावा. भाई लालजी पेंडसे यांनीं आपली एक ' मेथड ' गेल्या महिन्यांत साक्षरताप्रसारांत शेकून घेतली असें म्हणतात—या भल्या भाईचें लक्ष मजुरांच्या पोटाच्या प्रश्नांवरून त्यांच्या डोक्याकडे गेलें हें पाहून मला जरासा धक्काच बसला. साक्षरताप्रसाराचें पुण्यकर्म करण्यास सरकारजवळ आज जरी भरपूर पैसा नसला तरी हें पवित्र कार्य यापुढेंहि चालू ठेवण्याचा सरकारचा विचार आहे

असें कळतें. बाकी अशिक्षितांना उद्यां वाचायला येऊं लागलें तर त्यांना आमचीं वर्तमानपत्रें वाचण्याचा मोह होईल—आणि नंतर पत्रपंडितांबद्दल त्यांच्या मनांत आज असलेला सर्व आदर एका क्षणांत नाहींसा होईल अशी मला भीति वाटते. आपलें 'मराठी' लिखाण साक्षरतेच्या जलाशयांत डुंबणाऱ्या लोकांच्या हातीं जाणार नाहीं अशी खबरदारी भाई लालजी पेंडसे घेतीलच.

## खोडकर मुलासाठीं

कांहीं दिवसांपूर्वी मी आपलीं बरींचशीं पत्रें फाडून टाकलीं. त्यांपैकीं एक मजेदार पत्र वाचकांना सादर करितों:—'आपण पाठविलेलें प्रो. रानडयांचें 'दिवाळीची डाली' हें पुस्तक पोंचलें. लहान मुलांचे हाल होतील अशीं निर्बुद्ध पुस्तकें पुण्यामुंबईकडे 'बालवाङ्मय' म्हणून ओळखलीं जातात हें मला ठाऊक नव्हतें. तें पुस्तक घरांत आल्यापासून आमच्या घरचीं मुलें हट्ट करीनाशीं झालीं आहेत. याच लेखकाचीं अशीं दुसरीं पुस्तकें असतील तर तीं जरूर पाठवावींत. अलीकडे मुलें फार त्रास देऊं लागलीं आहेत—त्यांना वारंवार मारावें तर हात दुखतात. त्यापेक्षां 'अशीं' पुस्तकें त्यांच्याकडून सक्तीनें वाचून घेतलीं तर मुलें वठणीवर येण्यास वेळ लागणार नाहीं. अलीकडे आमच्या घरचीं व शेजारचीं मुलें फारच दंगा करीत असतात. सर्व उपाय करून झालें—आतां अखेरचा उपाय म्हणून मीं रेडिओ विकत घेतला आणि दंगा करणाऱ्या मुलांना रेडिओमार्फत 'मुलांचे कार्यक्रम' ऐकवूं लागलों. तेव्हांपासून आमच्या आळींतलीं सर्व मुलें सुतासारखीं सरळ झालीं आहेत. धन्य आहे त्या मार्कोनीसाहेबांची!

मुलांचे कार्यक्रम अशाच पद्धतीचे असावेत—त्यांत बुद्धिमत्तेला वाव असूं नये अशी शिफारस मी बुखारीसाहेबांना लवकरच करीन म्हणतों.' जून १९३९

## पाऊस गेला कुठें ?

कर्जाचा हप्ता देण्याची ऋणको ज्याप्रमाणें टाळाटाळ करतो, त्याचप्रमाणें जून महिन्यांत पावसानें आम्हांला तंग करून अगदीं रडकुंडीला आणलें. छत्र्या आणि ओव्हरकोट दाखवून आम्हीं त्याला चिडविण्याचा प्रयत्न केला आणि लहान मुलांनीं त्याला एक पैसा देण्याचा वायदाहि करून पाहिला—पण पावसाची स्वारी प्रसन्न होण्याचा रंग दिसेना. चतुर्थीचा उपास सोडण्यासाठीं ज्या रसिक सनातन्यांची अर्धांगीच्या मुखचंद्रावर भिस्त असायची, त्यांना जून महिन्यांत चंद्रदर्शन होऊन सुखानें उपास सोडतां आला नाहीं. नाहीं म्हणायला एखादे वेळीं पावसाची सर येऊन आम्हांला आशा वाटूं लागे—जीवनाचा उन्हाळा झालेल्या दुर्दैवी जीवांना आयुःपथावर सहानुभूतीचा शिडकावा कुठूनहि झाला तर पुढील प्रवास करण्यास कशी उमेद येत असेल याची मला कल्पना आली. गेल्या महिन्यांतील उकाडा सुसह्य करण्यासाठीं बाबा लोकांनीं अमलांत आणलेली दिगंबर वृत्ति पाहून थोरांना त्यांचा खासच हेवा वाटला असेल. रोजच्या व्यवहारांत मुलांनीं अशा रीतीनें नांवें टाकलेले कपडे जमेस धरूनच श्रीपाद कृष्णांना 'रम्य तें बालपण' हें पद करण्याची स्फूर्ति झाली असेल.

## जुलमाचा रामराम

मुंबई विद्यापीठाचा परवांचा प्रवेशपरीक्षेचा निकाल पाहून आपल्याला कॉलेजमध्यें जबरदस्तीनें ढकलल्याबद्दल अनेक खुशालचेंडू

मुलांना मनस्वी संताप आला असेल. नापास होण्याची सोन्यासारखी संधि हातची गेल्यामुळें कांहीं विद्यार्थ्यांनीं तरी जड पावलानेंच कॉलेजमध्यें प्रवेश केला असेल. निकालाची खैरात पाहून विद्यापीठावर ताशेरे झाडण्यास टपून बसलेले अनेक पत्रपंडित निराशेनें हताश झाले असतील. परीक्षेच्या यशानें कांहीं मुलांच्या आयुष्यांत एका नव्या प्रकरणाची सुरुवात झाली असेल--तर कच्च्या दिलाच्या चारदोन विद्यार्थ्यांनीं जीवनांतील अखेरचें प्रकरण घाईघाईनें लिहून आयुष्याचा ग्रंथच समाप्त केला असेल. विद्यापीठाचें यंदाचें उदार धोरण यापुढेंहि चालू राहील व प्रवेश-परीक्षेच्या उंबरठ्यावर ठेंच लागण्याची पाळी फारशा मुलांमुलींवर येणार नाहीं अशी मला आशा आहे. निकाल उत्तम व्हावा म्हणून मुलांना निकालांत लावण्याचा उमेदीनें पेपर काढणारे शहाणे मिळण्यास विद्यापीठाला अडचण पडूं नये असा माझा अंदाज आहे. तरी वेळच आली तर ' मुलांना नापास करणारे परीक्षक पाहिजेत ' अशी जाहिरात दिल्यास खात्रीनेंच काम होईल.

## शारदोपासक सम्मेलन

पुण्यांतील शारदामंदिराच्या वाढदिवसाच्या निमित्तानें प्रतिवर्षी होणारें शारदोपासकसंमेलन एका दृष्टीनें फार महत्त्वाचें असतें. या निमित्तानें तरी बरेच साहित्यसेवक एका ठिकाणीं गोळा होतात आणि त्यांचा रोटीव्यवहारहि ( बेसूर काव्यगायनासकट ) आनंदानें पार पडूं शकतो. या संमेलनांत निरुपयोगी ठराव वगैरे पास न होतां, कांहीं महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांकडून ( हो, तज्ज्ञांकडूनच नाहीं तर काय ? ) चर्चा होते. यंदाच्या संमेलनाचे अध्यक्ष मामा वरेरकर हे होते. वाचकहो, देवाची शपथ घेऊन सांगतों कीं, अत्रे कार्याध्यक्ष असलेल्या शारदामंदिराचें यंदाचें

संमेलन मामा वरेरकरांच्याच अध्यक्षतेखालीं आणि तेंहि गुण्यागोविंदानें पार पडलें. आयुष्याची म्युनिसिपालिटी (आणि बोलपट) केलेले अत्रे हे गेल्या संमेलनांत सदेह हजर होते ही गोष्ट सुद्धां उपेक्षणीय नाहीं. अत्रे नसते तर संमेलन अगदीं रुक्ष झालें असतें हें सांगायला नकोच. चिरंजीव गोपीनाथ, निरंतर आणि देव या तरुण कार्यकर्त्यांना, मेजवानीसाठीं आंब्यांचें ओझें पाठीवर वाहणाऱ्या कांहीं श्रमजीवी लोकांचें पाठबळ नसतें तर तें संमेलन इतकें गोड व स 'रस' झालेंच नसतें असें मला वाटतें.

## लिंहिणावळ

या संमेलनांतील लेखकांची 'लिहणावळ' या विषयावर चर्चा झाली. लेखक-प्रकाशकांमधील सलोख्याचे आणि खेळीमेळीचे संबंध लक्षांत घेतां, हा विषय चर्चेसाठीं आला नसता तरी चालण्यासारखें होतें. ज्या प्रकाशकांना लेखकांना मोबदला देणें परडवतें असे प्रकाशक भरपूर मोबदला देतातच. तरी पण, किर्लोस्करसारखी एखादी अपवादात्मक संस्था सोडली, तर नियत-कालिकांच्या चालकांना तरी साधारणपणें लेखकांना मोबदला देणें परवडत नाहीं ही गोष्ट सत्य आहे. इतर कोणत्याच बाबतींत आम्हीं पाश्चात्यांप्रमाणें वागत नाहीं. लेखक-प्रकाशक हॉटेलमध्यें न उतरतां एकमेकांकडे पाहुणे म्हणून उतरतात आणि खाणावळ, (कांहीं वेळेला) 'पिणावळ' आणि झोंपणावळ इत्यादि खर्चांची जबाबदारी परस्परांवर टाकतात. महाराष्ट्रांत सर्वच दरिद्री कारभार असल्यानें लेखकांनीं विनाकारण ऐट आणून आपल्या लेखनाच्या मोलाबद्दल कुठल्याहि अर्थानें मुजोरी करूं नये हें उत्तम. लेखक तरी स्वतः मराठी पुस्तकांवर आणि नियतकालिकांवर

कितीसे पैसे खर्च करितात? भाषांतर करून लेखक म्हणून मिरविण्यासाठीं इंग्रजी पुस्तकांवर त्यांचा खर्च होत असल्यानें मराठी-साठीं पैसे शिल्लक पडत नसतील तर माझें कांहींच म्हणणें नाहीं.

## पुढें चालूं

तसेंच पाहिलें तर कांहीं लेखक सोडले तर मोबदला देण्यालायक कितीसे लेखक महाराष्ट्रांत आहेत? हजामतीची उलटी नी सुलटी मीमांसा करणाऱ्या खांडेकरांचें आजकालचें कांहीं लेखन तर इतकें दरिद्री असतें, कीं त्यांना मोबदला देण्याऐवजीं त्यांचे लेख छापण्या-साठीं जाहिरातीच्या दरानें त्यांच्याकडून भरपूर मोबदला चोपून घेणें अवश्य आहे. कांहीं प्रथितयश लेखकांच्या लेखांवर नांव नसतें तर तें सर्व लेखन संपादकांकडून लेखकांकडे साभार परत गेलें असतें. नामवंत लेखकांपेक्षां कितीतरी होतकरू लेखक आज त्यांच्यापेक्षां सरस सांपडतील. कांहीं वेळेला त्या बिचाऱ्यांचे लेख न वाचतांच संपादकांकडून परत येत असतील. मोबदल्याच्या वेडामुळें एका तरुण विनोदी लेखकाची लेखनांतील पद्धतशीर पिछेहाट पाहिली म्हणजे मोबदला उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीच्या आड येतो कीं काय अशी भीति वाटते. ज्यांचा संसार लेखनावर आहे अशांना प्रत्येक प्रकाशकानें मोबदला द्यावा असें मी म्हणेन—पण सुस्थितींतील लेखकांनीं मोबदल्यासाठीं जांवयासारखें अडून बसूं नये असें मला वाटतें.

## रद्दींचा अर्थ

या बाबतींत लेखकांना मी एक धोक्याची सूचना नम्रपणें देण्याचें धाडस करितों. लिहिणावळीचें हें वेड असेंच वाढत गेलें तर उत्तमोत्तम वाङ्मय पैदा होणें कठीण जाईल असें मला

वाटतें. वाङ्मयाचा आजपर्यंतचा आढावा घेतला तर नामवंत लेखकांची कलाकृति मोबदल्याची भाषा केल्याशिवाय निर्माण झालेली आहे. रुपेरी चाळ पायांत बांधून श्रीमंत प्रकाशकांच्या लहरीच्या ठेक्यावर लेखकांच्या प्रतिभेचा नाच आजपर्यंत झालेला नाहीं. मोबदल्याच्या मोहानें लेखन पैदा होऊं लागल्यापासूनच नामवंत लेखकांचे रद्दी लेख छापलेल्या कागदांना ' रद्दी ' म्हणण्याची वहिवाट पडली असावी असें मला वाटतें. हा सर्व खटाटोप करतांना प्रथितयश साहित्यिकांच्या खुर्द्याला मी हातसुद्धां लावलेला नाहीं—त्यांच्यांतील मोहरांबद्दलच विचार आहे. मी स्वतः मोबदला देण्याच्या विरुद्ध नाहीं हें पुन्हां स्पष्टपणें सांगतों. पण मोबदला देतांना लेखनाच्या योग्यतेकडे व तो देणाऱ्या प्रकाशकाच्या सामर्थ्याकडे पाहिलें पाहिजे, इतकेंच माझें म्हणणें आहे. बड्या धेंडाचें नांव लेखाच्या टाळक्यावर असलें म्हणजे तो लेख शिरसावंद्य मानला जाऊं नये असें मला वाटतें.

## ' ऐकणावळ '

लिहिणावळीच्या चर्चेच्या तापल्या तव्यावर पुण्यांतील एका प्रथितयश ( वाचकहो, वहिवाटीला अनुसरून मी हा शब्द वापरला आहे-—त्यांत फारसा अर्थ नाहीं. ) कवीनें, गेल्या पंधरा वर्षांत महाराष्ट्रानें काव्यगायनाबद्दल आपल्याला कांहींच मोबदला दिला नाहीं अशा तक्रारीची पोळी शेकून घेतली. आपला घसा ( आणि श्रोत्यांचे कान ) फोडून या भल्या गृहस्थानें श्रोत्यांना 'ऐकणावळ' दिल्याशिवाय आपलें बेसूर व भसाडें काव्यगायन उभ्या महाराष्ट्राला कां सुनावलें अशी माझी उलट तक्रार आहे. आपल्या घशाच्या जोरावर स्वतःची ' पब्लिक सिटी ' करून आपण जंगी कवी

आहोंत हें लोकांच्या घशाखालीं उतरविण्याचा मोका सतत पंधरा वर्षे महाराष्ट्राच्या सौजन्यानें या कवीला मिळाला हा मोबदला कां थोडा झाला ? यशवन्त, सोपानदेवसारख्या कवींनीं मोबदल्याची तक्रार केली तर ती कुणीहि ऐकून घेईल. पण वाटेल त्या कवीनें उठावें आणि मोबदल्याबद्दल तक्रार करावी याचा अर्थच मला समजत नाहीं—जणूं काय, महाराष्ट्रांतील लोकांच्या पैशाला किंमतच नाहीं ! या कवींला काव्यगायनाचा मोबदला मिळाला नाहीं यावरून महाराष्ट्रांत अजूनहि रसिकपणा आहे ही गोष्ट मात्र सिद्ध होते.

## बोलपटांचीं परीक्षणें

'बोलपटांचीं परीक्षणें करण्याची लायकी आमच्यांत अजून आली नाहीं' असें धाडसी विधान आपल्या धाडसी स्वभावाला अनुसरून अत्रे यांनीं केलें. वर्तमानपत्रांतील जाहिराती थांबवून ' योग्य ' परीक्षणें कशीं असावींत याचे धडे कांहीं प्रोडयूसर्स व डिस्ट्रिब्यूटर्स पत्रपंडितांना वेळोवेळीं देत असल्यानें ' प्रामाणिक ' परीक्षणाच्या बाबतींत आचार्यांना निराश होण्याचें कारण नाहीं. मात्र हें सर्व चालू असतां बोलपटनिर्मात्याकडूनच कलेचा खून होतो आहे हें आचार्यांनीं लक्षांत ठेवावें. तसेंच 'नवीन लेखकांनीं बोलपटसृष्टींत जाऊन पैसे मिळवावे,' असेंहि अत्र्यांनीं गेल्या संमेलनांत सांगितलें. परंतु प्रोडयूसर्सच्या अकलमंदीचा अडसर जोंपर्यंत मुख्य दरवाजाला आंतून लागलेला आहे तोंपर्यंत मिरासदार लेखकांशिवाय इतरांना वाट मिळणार कशी ? सध्यांच्या कथा-लेखकांइतकेच चांगले ( याने वाईट ) लेखक मिळणें अशक्य नाहीं. परंतु अत्र्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे आमच्या कलावंतांचा शिळी कढीच तापवून पिण्याचा आंबट शोक जोंपर्यंत

कायम आहे तोंपर्यंत नवीन लेखकांना बोलपटसृष्टींत पदार्पण करणें शक्य होणार नाहीं.

## विनोदाचा मोका हुकविला

यावरून मला ' ब्रँडीच्या बाटली 'ची आठवण झाली. कांहीं दिवसांपूर्वी मी हा बोलपट पाहत असतां, अत्र्यांनीं विनोदाचा एक उत्कृष्ट मोका हुकविला असें माझ्या अल्प समजुतीप्रमाणें मला वाटलें. गोविंदा शिपाई केशवराव काकड्यांसाठीं दारूच्या चौदा बाटल्या चोरून आणतो व एका पुलाखालीं त्या दडवून ठेवून शेवंतीशीं प्रणयचेष्टा करतो. ( भरल्या गांवांत रमणी-वल्लभासाठीं असा एकांत राखून ठेवणारी म्युनिसिपालिटी किती कित्ती रसिक असेल, नाहीं ? ) त्यानंतर गांवांत पोलिस, मिरवणुकी व कडक तपासणी असूनहि मशारनिल्हे गोविंदराव शिपाई त्या बाटल्या हपीसांत कशा नेतात हें मला तरी समजलें नाहीं. त्या वेळीं खुद्द शेवंतीच्या कासंडींत त्या बाटल्या भरून ती सर्व मादक जबाबदारी प्रेयसीच्या शिरावरून मिरवणुकींत नाचत खेळत पोलिसांच्या नाकावर टिच्चून हपीसापर्यंत आणण्याची व्यवस्था झाली असती तर प्रचंड विनोद निर्माण झाला असता व अत्र्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करायला एक जादा कारण घडलें असतें. माझ्या या सूचनेचा अत्र्यांनीं आणि ( तशी संवय असल्यास ) मास्टर विनायकांनीं विचार करून वरील चित्र डोळ्यांसमोर उभें करून पाहावें.

## एक जागृत शंखोबा

कांहीं दिवसांपूर्वी एका पवित्र तीर्थाच्या ठिकाणीं एक जागृत शंख वीस वर्षांनीं पाण्यावर तरंगतांना दिसला. हा शुभ शकुन

समजून हजारों भाविक लोक त्या शंखोबाचें दर्शन घेण्यास तीर्थांच्या ठिकाणीं धांवून आले. रोजच्या रुक्ष व्यवहारी जगांत जाग्रत किंवा सुप्त शंखाला मान नसला तरी साहित्यसृष्टींत उपमेसाठीं तरी शंखाचा उपयोग अधूनमधून होत असतोच--कोकिलकूजन करणाऱ्या रमणीच्या कंठाला भसाड्या आवाजाच्या शंखाची उपमा आकारासाठीं देतात, हा विरोधाभास कौतुक करण्यासारखा नाहीं, असें कोण म्हणेल ? राजकारणांतहि वेळीं अवेळीं वाजून सभेंतून अध्यक्षपदाच्या अडणीवर बसण्यापलीकडे शंखांचा फारसा उपयोग झालेला नाहीं याची ग्वाही महाराष्ट्राचे दिपुटी महात्मा शंकरराव देवहि देतील. धार्मिक क्षेत्रांत मात्र कोणत्याहि शंखाला मानाचें स्थान असतें ही गोष्ट धर्मावर निष्ठा नसणारा सुद्धां कबूल करील. उपरोक्त पवित्र जाग्रत शंख आज कुठें तरी अडणीवर बसून एकाद्या संस्थानिकाप्रमाणें मानमरातब लाटत असेल यांत शंका नाहीं. एकूण आमच्या बेवकूफ धर्मभोळेपणाची तारीफ करावी तितकी थोडीच आहे.

## संध्याकाळची निशा

आजकाल कुणालाहि चांगलें म्हणण्याची सोय उरली नाहीं. कांहीं दिवसांपूर्वी येथील 'संध्याकाळ' पत्राची मीं स्तुति केली होती. पण इतरांनीं केलेल्या कौतुकानें या पिटुकल्या पत्राचें इवलेंसें डोकें फिरल्यासारखें होऊन त्यांतील नारदानें उन्मत्तपणानें लिहिण्यास सुरुवात केली आहे. अर्धांगवायूनें आजारी असलेला एखादा असहाय लेखक अलमगीर आहे अशी अर्धवट कल्पना करून त्याला या चढेल नारदानें अष्टवक्र म्हणून आपलें अर्धे शरीर प्लॅस्टरमध्यें ठेवण्याचा बेशरम सल्ला दिला आहे. एखादा मनुष्य मरत पडला असतां, केवळ राजकारणाच्या बाबतींत मताभिन्नता

असली म्हणून असें हृदयशून्य लेखन नवाकाळ संस्थेंत पचावें याचें मला वाईट वाटतें. ईश्वरकृपेनें नारद म्हातारा व्हावा—पण हृदयाला घरें पाडणाऱ्या लेखनाचा अनुभव परावलंबी वार्धक्यामुळें त्याला येऊं नये. नवाकाळ संस्थेंत निर्बुद्ध वातावरण असलें तरी साधारणपणें सदभिरुचीची मर्यादा सोडणारें अमर्याद लेखन त्या पत्रांत बुद्धिपुर:सर छापलें जात नाहीं आणि म्हणूनच स्वार्थत्यागी, तत्त्वनिष्ठ आणि वंदनीय काकांच्या मंगल मुद्रण मंदिरांत अशा रीतीचें अमंगल मुद्रणस्वातंत्र्य यापुढें नारदाला मिळणार नाहीं अशी मला आशा वाटते.

## मुलें आणि राजकारण

महात्मा गांधींच्या आजपर्यंतच्या चळवळींत शाळेंतील मुलें किती बेजबाबदार आणि दीडशहाणीं झालीं आहेत याचा प्रत्यक्ष अनुभव पुढाऱ्यांना आल्यामुळें, जवाहरलाल नेहरू आणि राजाजी यांनीं, शाळा-कॉलेजांतील मुलांनीं राजकारणांत प्रत्यक्ष भाग घेऊं नये, असें आपलें स्पष्ट मत कांहीं दिवसांपूर्वी जाहीर केलें आहे. परंतु थोर पुढाऱ्यांच्या उपदेशाला धाब्यावर बसवून, येथील दारू-बंदी प्रचार-समितीनें म्युनिसिपल शाळेंतील मुलें ( आणि मुली ) दारूबंदीच्या कार्यासाठीं राबवून घेण्याचा घाट घातला आहे हें पाहून मला अत्यंत वाईट वाटतें. या कृत्यांत आमचे नगरपितेहि समितीला सामील आहेत हें पाहून कांहीं पालकांना तरी खासच 'राग येईल. ह्या कृत्याच्या समर्थनार्थ येथील 'नवाकाळ' पत्रानें जुनी नोकरशाही राजनिष्ठेच्या प्रदर्शनासाठीं मुलांचा उपयोग करीत होती तर आतांच त्यांत वावगें काय आहे ?' असा प्रश्न विचारला आहे. पूर्वीच्या राटवटींत मुलांमुलींचे हाल झाले किंवा नाहींत हें मला माहीत नाहीं. पण पावसाळ्याच्या दिवसांत मिरवणुकी काढून

मुलांच्या प्रकृतींवर अनिष्ट परिणाम होईल असें समितीनें तरी करण्यांत अर्थ काय ?

## मुलांना अलिप्त ठेवा

संपूर्ण दारूबंदी शक्य तर व्हावी, या मताचा मी असल्यामुळें उत्साहाच्या अभावाप्रमाणें उत्साहाचा अतिरेकहि कार्याला विघातक होऊं शकेल, असें दारूबंदी समितीस माझें नम्र सांगणें आहे. वेळीं-अवेळीं काढलेल्या मिरवणुकींत लहान मुलांचे हाल कसे होतात याची कल्पना मला पुण्यांतील 'बाल्दिन'च्या एका दृश्यावरून आली आहे. कॉंग्रेस सरकारला आज असें वाटतें—पण उद्यां भाला-कार भोपटकरांचा पक्ष अधिकारावर आला तर बिचाऱ्या मुलांना सामुदायिक होळीचा सण पांचजन्य करीत पार पाडावा लागेल, मुंज झालेल्या मुलांना चौपाटीवर श्रावणी करावी लागेल व 'कां न भक्षिसि गोमय ताजें ?' या भालाकारांच्या प्रश्नाला तोंड वेडेंवांकडें करून उत्तर द्यावें लागेल. तसेंच मद्यपी बापावर पाळत ठेवून मुलांनीं त्याचा रपोट सरकारला करायचा ही घरभेदी कल्पना नवा-काळखेरीज करून इतर कुणाला पटेल असें मला वाटत नाहीं. घरभेदीपणानें मोठीं मोठीं राष्ट्रंसुद्धां काळाच्या उदरांत गडप झालीं आहेत, याचें ज्ञान नवाकाळला असेल असें मला वाटलें होतें. दारू-बंदीसाठीं लहान मुलांचा उपयोग होणार नाहीं अशी मला अजूनहि आशा वाटते.

## स्टॉप प्रेस—

वरील मजकूर लिहून झाल्यावर आमच्या नगरपित्यांना शहाणपणा सुचून लहान मुलांचा उपयोग दारूबंदीसाठीं होणार नसल्याची बातमी कानांवर आली—नशीब लहान मुलांचें !

जुलै-ऑगस्ट १९३९

## गोंगाट–जीवनाचा शाप

गोंगाट हा मुंबईतील जीवनाचा शाप होय. त्यामुळें मोटारींच्या इलेक्ट्रिक हॉर्नला येत्या एप्रिलपासून बंदी होण्याची शक्यता पाहून सर्वांना समाधान वाटेल. सकाळीं उठल्याबरोबर ' मीऽऽठऽऽबाऽऽरीऽऽक ' या ओळखीच्या आवाजानें प्रातःकालच्या शांत जीवनाच्या आनंदांत मिठाचा खडा पडतो. त्यानंतर ' कांदेबटाटी ' आपली हजेरी देतात. ' कलोओ ओंऽऽ ओ ' ची आरोळी मधून मधून होत असतेच. घरांतून बाहेर पडलें म्हणजे तर कांहीं विचारायलाच नको. या सर्व गोंगाटानें कावलेला जीव दिवसाच्या श्रमानंतर विश्रांति घेईल तर त्याला ' कडक चंपी ' आणि ' कुलपी मलाई ' सतावून सोडील. येथें जो तो आपलीं कामें ' गर्जून ' करीत असतो. या गोंगाटाच्या जमेकडील बाजूला मीं येथील स्त्रियांचा गोंगाट नोंदलेला नाहीं, हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. या सर्व गोंगाटाचा परिणाम आयुष्यावर होऊन मुंबई-करांचें आयुष्य खात्रीनें घटत असेल यांत शंका नाहीं. जरा संधि मिळाली तर आम्हांस मुंबईच्या बाहेर कांहीं काल तरी शांतपणें जगावेंसें वाटतें तें उगीच नाहीं.

## कालावर मात

आधुनिक धांवपळीच्या जीवनांत प्रत्येक मनुष्य कालावर मात करण्याची खटपट करीत असतो. आगगाडी अपुरी वाटून कीं काय, सदेह स्वर्गाला जाण्याचा धोका पतकरूनहि मनुष्य विमानानें प्रवास करूं लागला आहे. परंतु थोडासा वेळ वांचवूनसुद्धां त्याचें काय करायचें हा प्रश्न आमच्या निरुद्योगी लोकांसमोर राहतोच. तरीपण कालावर मात करण्याच्या धांदलींत अकालीं कालवश होणारे कांहीं

लोक पाहिले म्हणजे वाईट वाटतें. घाईमुळें जीवनांतील मजा नाहींशी होते. पुण्याच्या वाटेवर मार्गे रिव्हर्सिंग स्टेशन असतांना सनातनी उतारूंना जानवें शोधण्याची, खुशालचेंडू लोकांना करवंदें खाण्याची आणि रसिकांना नयनमनोहर सृष्टिसौंदर्य पाहण्याची सोय होती—पण पुण्याला लौकर पोंचण्याच्या घाईत प्रवासांतील तो आनंद आज नाहींसा झाला आहे. मोटारींमुळें तर पूर्वीचा बैलांच्या गळ्यांतील मंजुळ घंटानादाच्या संगीतांत होणारा प्रवास कालांतरानें पुण्यांतील इतिहास संशोधन मंडळाच्या दप्तरांतच सांपडला तर सांपडेल. नशीब आमचें !

## दुकानदारीचे गुण

हळूहळू मुंबईतील इराणी ' राइस प्लेट ' सुरू करतात कीं काय अशी आमच्या हॉटेलवाल्यांत भीति उत्पन्न झाली आहे. परंतु गिऱ्हाइकांना मंमं करण्याची ही सोय इराण्यांनीं यापूर्वीच कशी सुरू केली नाहीं, याचेंच मला आश्चर्य वाटतें. दुकानदारीला लागणारे गुण आम्हा दक्षिणी लोकांत अजूनहि येत नाहींत यावरून आमच्या समाजाला भिकेचे डोहाळे लागले आहेत असें वाटतें. खाणावळीचा किंवा उपाहार-गृहाचा मालक गिऱ्हाइकांकडे, ते अन्नछत्रांत मोफत अन्न गिळताहेत अशा ऐटीनें पाहत असतो. उत्तम डामडौल असणाऱ्या जोड्यांच्या दुकानांत, गिऱ्हाईक मूर्ख आहे असें समजून त्यांना जोड्यांबरोबर शालजोडींतले सुद्धां मिळण्याची खात्री असते. टोप्यांचा व्यापारी विनयानें गिऱ्हाइकाला टोपी घालण्याचा प्रयत्न करीत असतो. दुकानदारींत इराणी, गुजराथी, वोहरी वगैरे लोक अनुकरणीय आहेत हें मला अकलेची फाजील ऐट असणाऱ्या आमच्या उद्दाम दक्षिणी दुकानदारांना बजावून सांगावयाचें आहे.

स. नि. ८५०



## दख्खनची राणी

कांहीं वर्षांपूर्वी जी. आय्. पी. रेल्वेनें ' दख्खनची राणी ' या नांवाची एक सुंदर व ऐषारामी गाडी श्रीमंत उतारूंसाठीं निर्माण केली. आपला निळा शालू परिधान करून व अंगावर पाच-माणकांचे मोजके अलंकार घालून या राणीसाहेब पुण्या-मुंबईंत रोज डौलानें येत जात असत. परंतु जागतिक मंदीचा परिणाम या राणीसरकारच्या प्रजाजनांवर होऊन, त्यांच्याकडून मिळणारा रोजचा नजराणा हळूंहळूं इतका कमी झाला कीं, आजकाल तर या बाईसाहेबांचा प्रवास जाहिराती देऊनच होण्याची पाळी आली आहे. या ' दख्खनच्या राणी 'वर रेल्वेनें इतका पैसा खर्च केला आहे. कीं, तो सत्कारणी लागून त्यावर व्याज कसें सुटेल याची चिंता रेलवेच्या अधिकाऱ्यांना लागली असल्यास नवल नाहीं. या ' राणी'चीं मतें सध्यांच्या लोकशाहीला जुळतील अशीं झालीं तर तिची धांवपळ रोजहि होण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें. या गाडीला अप्पर आणि लोअर ( Upper and Lower ) असे दोन वर्ग ठेवून, अप्परचें भाडें इंटर आणि सेकंड यांच्या दरम्यान कुठेंतरी आणून ठेवलें व लोअरचें मेल थर्ड क्लासइतकेंच असलें तर ही गाडी खूपच फायदेशीर होईल अशी माझी खात्री आहे.

## एक उपयुक्त सूचना

अशी व्यवस्था झाली तर पूना मेल अजिबात कमी करून ही ' राणी ' पुण्यास साडेसाताच्या सुमारास पोंचेल अशा बेतानें मुंबईहून सोडावी. हा प्रयोग यशस्वी झाला तर हळूहळू या दोनच वर्गांची पद्धत हिंदी रेलवेवर करण्यास हरकत नाहीं. यामुळें बड्या सरकारी अधिकाऱ्यांना द्यावा लागणारा भत्ता व प्रवास खर्च यांत

मोठी बचत होऊन गरिब रयतेचे खूपसे पैसे वांचतील व सध्यांचा उच्चनीच भेदभाव जाऊन उतारूंमधील 'वर्गयुद्ध' पुष्कळशा प्रमाणांत कमी होईल. बाजीराव उतारूंसाठीं गाई गाई करायला एखाद्या स्वतंत्र स्लीपिंगकारची योजना झाली तर दुसऱ्या उतारूंचाहि प्रश्न सुटेल. मी सांगितल्याप्रमाणें दख्खनच्या राणीचा प्रयोग सहा महिने करून पाहिला तरी माझी सूचना किती मोलाची आहे हें जी. आय्. पी. रेल्वे एजंटला कळून येईल. गरीब हिंदी लोकांचे लक्षावधी रुपये एका गाडींत अडकवून ठेवण्याचें खरोखरीच कांहीं प्रयोजन नाहीं. परंतु रेलवेचे अधिकारी इतके सनातनी वृत्तीचे असतात व इभ्रतीच्या खोट्या कल्पनेनें त्यांना इतकें पछाडलेलें असतें कीं, माझी ही सूचना मूर्खपणाची आहे असें त्यांना वाटल्यास मला आश्चर्य वाटणार नाहीं.

## महात्माजींना विनंति

कांहीं दिवसांपूर्वी महात्मा गांधी आणि डॉ. खरे यांच्या पत्रांची अदलाबदल होऊन खरे आजारी असल्याची बातमी गांधींना दुसऱ्याच्या चुकीनें समजली. यावरून गांधींना हिंदुस्थानांत काय चाललें आहे हें दुसऱ्या कुणाच्या तरी पक्षपाती नजरेंतूनच पाहावें लागत आहे असें दिसतें. बाकी डॉ. मुंजे आणि महात्माजी यांचा कधींकाळीं रोटीव्यवहार झाला आणि कुणाच्या तरी गफलतीनें त्यांच्या खाद्यपेयांची अदलाबदल झाली तर मात्र मोठी आफत होईल. मुंज्यांचा खाना गांधींना चालणार नाहीं व त्या महात्म्याला विनाकारण उपास घडायचा. गांधींचा खजूर चट्टाचट्टा करूनहि 'उपाशी' पोटीं मुंज्यांची प्रेमळ दृष्टि गांधींच्या शेळीवर जाईल व ती बिचारी जीवानिशीं गेली तरी आपल्या विशाल पोटावर

हात फिरवीत शेळी जराशी वातड होती अशी तक्रार मुंज्यांची राहील ही गोष्ट निराळीच. या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून महात्मा-जींनीं यापुढें सर्व वर्तमानपत्रें स्वतः पाहावींत, म्हणजे त्यांचे लाडके भगत काय लीला करीत आहेत हें त्यांना कळून येईल.

## असेहि लोक असतात

कांहीं दिवसांपूर्वी एक मनुष्य हृदयक्रिया बंद पडून रस्त्यांतच मरण पावला. शेजारीं चालणाऱ्या एका सद्गृहस्थानें मृताला मदत करण्याच्या निमित्तानें त्याच्या खिशांतील पैशांचें पाकीट चोरलें व आयुष्यांत केलेल्या पहिल्या व शेवटच्या सेवेबद्दल अज्ञात मृतात्म्यापासून आपली फी अशा रीतीनें वसूल करून घेतली. हृदयक्रिया बंद पडून एकाच्या हृदयाच्या अस्तित्वाचा पुरावा निर्माण होण्याबरोबरच, हृदयशून्य कृतीनें दुसऱ्या एकाच्या हृदयाच्या अभावाचा पुरावा तयार व्हावा, हा योगायोग चमत्कारिक तर खराच. परलोकाच्या प्रवासाचें तिकीट पैशाशिवाय विकत मिळतें व तेथें पोटापाण्याचा प्रश्नहि इहलोकाइतका बिकट नाहीं याची खात्री असल्यानें, एका जिवंत परोपकारी माणसानें मृताच्या अंगा-वरील थोडीशी जडजोखम स्वतःच्या अंगावर घेतली—After all it takes all sorts to make our world.

## शिवणकलेचें स्तोम

कॉंग्रेसच्या जमान्यांत शिवणकलेला इतकें महत्त्व कां आलें आहे हें कोडें मला तरी सुटत नाहीं. वाटेल त्या टेलरिंग कॉलेजचा उद्घाटनसमारंभ पार पाडण्यासाठीं, फाटक्या किंवा उसवलेल्या साहित्यिकापासून तर निसवलेल्या राजकारणी पुरुषापर्यंत सर्व लोक तयार असतात. सफाईनें खिसा किंवा गळा कापणें हा जरी पिनल

कोडांत अपराध असला तरी कापडाच्या सृष्टींत या कलेला भलताच भाव चढला आहे. कपडे कसे असावेत या प्रश्नाऐवजीं कोट्यवधि लोकांना लज्जारक्षणासाठीं तरी कापड कसें मिळेल हा प्रश्न माझ्या मतें महत्त्वाचा आहे. खादीचा उपदेश गांधीजी रात्रंदिवस करीत असले तरी गरिबांच्या वस्त्रांच्या प्रश्नाला रहाटाच्या सुतानें धांव-दोरासुद्धां घालतां येणार नाहीं अशी मी जर ' टीप ' मारली तर माझी फारशी चूक होणार नाहीं, असें मला वाटतें.

## शंकरराव मुजुमदार

ता. २९ नोहेंबर रोजीं मराठी रंगभूमीचा एक खंदा वीर काल-वश झाला. शंकरराव मुजुमदार म्हणजे गेल्या अर्धशतकांतील मराठी रंगभूमीचा एक चालता-बोलता इतिहासच होता. नट, व्यवस्थापक-संपादक अशीं अनेक नातीं त्यांच्यांत एकवटलेलीं होतीं. गुणी, जनांना त्यांच्या गुणांचा योग्य गौरव करून जगाच्या रंगभूमीवर पुढें आणणें हा शंकररावजींचा एक विशेष होता. चकाट्या पिट-तांना मागील आठवणी शंकरराव अशा मजेदार पद्धतीनें सांगत, कीं ऐकणारा तास दोन तास त्यांच्या वाक्प्रवाहाबरोबर सुखानें वाहत जाई. पुण्यांतील किर्लोस्कर थिएटरमध्यें आज जरी बोल-पट बडबडत असले तरी त्यांच्या प्रत्येक विटेला वाचा फुटल्यास ती शंकररावांचें गुणवर्णन करील अशी माझी खात्री आहे. मराठी रंगभूमीची आजची दुर्दशा पाहून शंकररावांना फार वाईट वाटे—पण सध्यांच्या बोलपटांच्या जमान्यांत गप्प बसण्यापलीकडे त्यांनाहि कांहीं करतां येणें शक्य नव्हतें. शंकररावांच्या आत्म्यास ईश्वरानें चिरशांति द्यावी अशी माझी ईश्वरापाशीं विनंति आहे.

## आचार्य अत्रे

आचार्य अत्रे कॉंग्रेसमध्यें गेल्यानें पुण्यांत तरी एक अत्यंत बुद्धिमान् पुढारी कॉंग्रेसवाल्यांना मिळाला आहे. शंकरराव देव आणि त्यांच्याच जातीच्या मामुली पुढाऱ्यांना आचार्य अत्र्यांचें तेज कितपत सहन होतें हें कालांतरानें दिसेलच. परंतु तशीच वेळ आली तर पुढारी म्हणून जनतेच्या मान्यतेचा शिक्का आचार्यांच्याच प्रशस्त पाठीवर बसेल हें शंकररावांनीं मनांत समजून असावें. शंकरराव देवांनीं विद्यार्थिदशेंत नाटकांत काम केल्याचें सांगतात. परंतु एकंदर परिस्थिति पाहिली तर शंकररावांचें राजकारणाच्या रंगभूमीवरील देशभक्ताचें सोंग मात्र फार वर्षे चालेल असें वाटत नाहीं—पुढारी म्हणून अत्र्यांचीच भूमिका अधिक रंगेल असा माझा सूर वाहतो. अत्र्यांचीं आजकालचीं सार्वजनिक भाषणें ऐकलीं म्हणजे झुणका-भाकरीशीं त्यांनीं केलेला उघड प्रणय क्षम्य ठरतो. अत्र्यांच्या अमदानींत पुण्यनगरीचें स्वरूप इतकें पालटण्याचा संभव आहे कीं त्यांच्या दिलदारपणाच्या आड इतर नतद्रष्ट लोक आले नाहींत तर पुणें हें ओळखणेंहि कठीण जाईल. पण आचार्य, पुण्यांतील रस्त्यांतले दिवे ' टॉर्च ' शिवाय दिसत नाहींत ही गोष्ट खरी काय ?

## कलावन्तांना विसरूं नका

परवां अत्र्यांनीं शारदामंदिराला म्युनिसिपालिटीकडून कांहीं-तरी मदत होईल असा आशावाद व्यक्त केला आहे. तसेंच जोतीबा फुल्यांचेंहि एखादें सुंदरसें स्मारक करण्याचें आश्वासन त्यांनीं जनतेला दिलें आहे. परंतु आचार्य, फूल नाहीं तर निदान फुलाची पाकळी तरी पुण्यांतील कलावंतांना आपण द्यावी, असें मी आपणांस सुचवितों.

पुण्यांत चांगले चित्रकार व शिल्पकार असण्याचा संभव आहे. त्यांच्या कलेचे नमुने आपण म्युनिसिपालिटीकडून दर वर्षी विकत घेऊन गरीब कलावंतांना सक्रिय सहानुभूति दाखविलींत तर कला आणि कलावंत जगविण्याचें पुण्य पुण्यनगरीला मिळून इतर शहरांना तो उत्कृष्ट आदर्श होईल. नगरमातेच्या मांडीवर सुखानें विश्रांति घेण्याचा हक्क साहित्यिकांप्रमाणें कलावंतांनाहि आहे ही गोष्ट आपणांस पटेलच. तसेंच मामा वरेरकरांची 'नॅशनल थिएटर'ची कल्पनाहि आपण उचलून धरली तर नाकार्शी सूत धरलेली मराठी रंगभूमि जगेल. थोडक्यांत सांगायचें तर पुण्याची सौंदर्य-दृष्टि आणि आयुष्याकडे पाहण्याची दृष्टि निवळण्याची जबाबदारी आपल्या पक्षावर आहे. ती आपण सहृदयतेनें पार पाडाल अशी मला आशा आहे.

**न्याय द्या**

कॉंग्रेस सरकार सुरू झाल्यावर कर्वे युनिव्हर्सिटीला सरकारी मान्यता मिळून त्यांतील पदवीधर मुलींना नोकरीचा 'राजमार्ग' खुला होईल अशी माझी अपेक्षा होती. परंतु 'राष्ट्रीय' विद्यापीठाच्या विशा'रदां'ना मान्यता मिळून त्यांना नवीन कुरण मोकळें झालें तरी जी. ए. आणि पी. ए. बिचाऱ्या अजूनहि आशेनें ताटकळत हात जोडून उभ्याच आहेत. राष्ट्रीय विशारदांपेक्षां कर्वे युनिव्हर्सि-टींतील मुली कोणत्याहि अर्थानें कांकणभर सरसच ठरतील. परंतु या प्रश्नाकडे सरकारचें लक्ष अजूनहि जात नाहीं, याबद्दल कुणालाहि वाईट वाटेल. परिस्थितीला अशक्य अशा आर्थिक अडचणी सरकारनें आणण्यांत अर्थ नाहीं. 'राष्ट्रीय' विद्यापीठांना मान्यता मिळाल्यानें तर या उपरोक्त मुलींचा प्रश्न सहानुभूतीच्या हद्दींतून हक्काच्या हद्दींत जाऊं पाहत आहे. आज ही युनिव्हर्सिटी कै. सर

विठ्ठलदास ठाकरसींच्या कृपेनें जगली आहे. ती त्यांच्याच पुण्याईनें यापुढेंहि जगेल अशी सरकारची खात्री नसेल असें मी तरी म्हणत नाहीं. मग आतां अडचण ती कुठें आहे ?

## एक ' सोपा ' उपाय

५ डिसेंबरच्या ' स्वराज्य ' पत्रांत दारूनें धुंद झालेल्याला शुद्धीवर आणण्याचा एक उपाय सांगितला आहे. एका पंपांत ९० टक्के हवा व १० टक्के कार्बन डाय-ऑक्साइड भरून हें मिश्रण दारू प्यालेल्या सुखी जीवाच्या तोंडांत सोडलें तर त्याची निशा उतरण्यास वेळ लागत नाहीं. इतकी दगदग करून हा ' टक्क्याचा' खेळ खेळण्यापेक्षां, ' येईल लेकाचा शुद्धीवर ' असें म्हणून मी स्वस्थ बसेन. निशाबाजाला त्याच्या सुखसमाधींतून खेंचून आणणें म्हणजे त्या बिचाऱ्याची भयंकर निराशा करण्यासारखेंच होय. सत्यसृष्टींतील जळजळीत सत्य विसरण्यासाठींच दारूबाज लोक मदिरासक्त होतात व कांहीं काल तरी सुखाच्या सीमेंत रेंगाळत असतात. ढेकूण मारण्यासाठीं, एकेक ढेकूण धरून त्याच्या तोंडांत राकेलाचा थेंब नाहीं तर चिमुटभर कटोल सोडण्याइतकाच उपरोक्त इलाज सोपा आहे. एखाद्याची दारूची धुंदी उतरविण्यासाठीं एखाद्यानें खरोखरीच वरील उपाय करण्याचा चंग बांधला तर उपाय करणाराच शुद्धीवर नाहीं असें हमखास अनुमान इतरेजन करतील. बाकी वर्तमानपत्रांत लिहिण्यापलीकडे अशा उपायांची कांहीं किंमत आहे असें मला वाटत नाहीं.

## Mass Contact

लवकरच सुरू होणारीं झोन तिकिटें पाहून कॉंग्रेसनें केलेल्या ' मास कॉन्टॅक्ट'च्या कटांत रेल्वेसुद्धां सामील आहेत कीं काय

असा संशय येतो. झोनच्या काळांत हिंदुस्थानांतील सर्व लोकांचा इतका जबरदस्त 'कॉन्टॅक्ट' येतो, कीं तसा कॉंग्रेसच्या हजारों व्याख्यानांनींहि होणें शक्य नाहीं. लहानशा बांकावरील जनतेचा दशमुखी रावण पाहिला, कीं सर्व धर्मांच्या व राजकीय मतांच्या लोकांचा शरीरसंबंध किती घट्ट प्रमाणांत होत असेल, याची कल्पना कुणालाहि होईल. हिंदु-मुसलमान, जहाल-मवाळ, महासभावाले आणि लीगवाले, साहित्यिक आणि त्यांचे गरीब व भाबडे वाचक या सर्वांना कुरकुर केल्याशिवाय समपातळीवर आणण्याची रेल्वेची ही युक्ति पाहिली म्हणजे झोन तिकिटें प्रसविणाऱ्या बुद्धिमत्तेची कमाल वाटते. अशाच एखाद्या झोन तिकिटाचे मोसमांत अलमगीर, शंकरराव देव, डॉ. आंबेडकर, जीना, सावरकर [ दंतवैद्य नव्हत ! ], वल्लभभाई, खरे, शुक्ल, नरीमन, गांधी आणि त्यांची शेळी एका डब्यांत कोंबले गेले तर त्यांचे सर्व मतभेद एका क्षणांत दूर होऊन देशांतील मतामतांचा गलबला नाहींसा होईल.

## कोरडी दारू

गेल्या दिवाळींतील सालाबादप्रमाणें घडलेले अपघात लक्षांत आणले म्हणजे ओल्या दारूप्रमाणें कोरड्या दारूकडे सुद्धां सरकारनें लक्ष देण्याची वेळ आली आहे असें म्हणावें लागतें. ओलें 'दारूकाम' मुकाट्यानें करण्याची सोय असल्यानें त्यापासून होणारे भयंकर अनर्थ कालांतरानें दृष्टिपथांत येतात—पण सुकी दारू आपलें काम अगदीं 'गर्जून' करीत असल्यानें तिचे अनर्थ कर्णपथावर येण्यास वेळ लागत नाहीं. संसाराची शोभा असणारीं इवलींशीं मुलें शोभेच्या दारूनें फटाक्यासारखीं उडून देवाघरीं जातांना पाहून 'ही दारू नाहींशी करतां येणार नाहीं का?' असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. दिवाळीच्या मंगल प्रसंगीं बाहेर रंगीबेरंगी दिवे लागले

असतां, फटाक्यांच्या अपघातानें एखाद्याचा कुलदीपक विझण्याचा अमंगल प्रसंग पाहून कुणाचेंहि मन सुन्न होईल. हिंदुस्थानांतील कॉंग्रेस सरकार या प्रश्नाकडे लक्ष देईल काय ?

## पुण्यांतील अज्ञात अत्याचारी चोरांस–पुण्यांतच कुठेंतरी–पुणें

आपल्या पराक्रमाचीं वर्णनें पुण्यांतील पत्रांत येत असलेलीं पाहून मी आपणांस दुरूनच नमस्कार करतों. आपल्या प्रश्नाच्या बाबतींत परवां पुण्याच्या नागरिकांची जी सभा झाली त्या ठिकाणीं आपण उपस्थित असण्याचा संभव आहे. नागरिकांच्या तक्रारींना तडकाफडकी उत्तर देऊन आपणांस आपली कैफीयत मांडण्याचा मोह झाला असेल. पण आपलें म्हणणें म्हणजे ‘ चोराच्या उलट्या ’ असें इतरांना वाटण्याची खात्री पाहून आपण गप्प राहिलांत हें आपल्याला भूषणावह आहे. बाबुराव गोखले व सोनुबाई काळे यांचीं मूर्खपणाचीं भाषणें ऐकून आपण मनांत हंसलांहि असाल. तरीपण आपण जो उद्योग सध्यां आरंभला आहेत तो कांहीं बरा नाहीं. हा अत्याचारी मार्ग आपण सोडून दिला तर पुणेंकरांना हायसें वाटून त्यांचें हिंडणें-फिरणें पूर्ववत् सुरू होईल. त्या दरिद्री पुण्यांत सशस्त्र वाटमारी करूनहि आपला धंदा नीटपणें चालत नाहीं, अशीहि आपली प्रामाणिक तक्रार असण्याचा संभव आहे. आपली तक्रार अगदीं बाजवी आहे, आणि म्हणूनच आपण हा अत्याचारी मार्ग ताबडतोब सोडावा अशी माझी विनंति आहे.

### ताजा कलम नं. १

आपण संभावित दिसतां असें म्हणतात. यावरून आपण कोणत्याहि राजकीय पक्षाचे नसण्याचा संभव आहे. पहांटेच्या आणि संध्यासमयींच्या संधिप्रकाशांत आपला संधिसाधु धंदा चालत

असल्यानें त्या अस्पष्ट प्रकाशांत आपला राजकीय रंग ओळखणें शक्यहि नाहीं. आपले हे सर्व अत्याचार पाहून; नागरिकांची झोंपमोड न करतां हलक्या हातानें व हलक्या पावलानें चोरी करणारे इतर भिडस्त चोर आपणांस खासच शिव्या देत असतील. आपला संचार पुण्यांत सुरू झाल्यापासून तरुणींच्या मागावर असलेल्या व त्यांना तकलीफ देणाऱ्या अनेक आर्यपुत्रांची गैरसोय झाली असेल. सुंदर ललनांच्या वदनचंद्रावर कविता खरडणारे अनेक कवडे आज आपल्या घरट्यांत दिवाभीतांप्रमाणें बसून उसासे टाकीत असतील. गरीब पित्याचे ' शिक्षणा 'साठीं येत असलेल्या पैशावर चैन करणाऱ्या खुशालचेंडू तरुणांना ' लकी 'मध्यें सात्त्विक आहार करून कॅम्पांतील सिनेमा शो पाहण्याचें धाडस होत नसेल. पण चौर्यकर्मविशारदांनो, अंधारांत आपल्याच टोळींतील एखाद्याला अत्याचार करून लुटूं नका—नाहींतर आयते गोत्यांत याल.

### ताजा कलम नं. २

धाडसी तरुणांनो, आतां माझें जरा ऐकून घ्याल तर आपला फायदाच होईल. मराठींत वाङ्मयचौर्याचा इतिहास आपण कुठें तरी चोरून जरी वाचलात तरी आपल्यासारख्या धाडसी तरुणांस साहित्यसृष्टींत किती मोठा ' चान्स ' आहे हें समजून येईल. आपल्यासारख्या पराक्रमी वीरांना कोणत्याहि इंग्रजी पुस्तकावर डल्ला मारून त्या साहित्यावर लेखक म्हणून चांगलाच लौकिक कमावतां येईल. आपणाला ' टीम वर्क ' ची संवय असल्यानें आपण एखादें मासिक काढूं शकतां, एखादें मंडळ स्थापन करून कोणत्याहि विषयावर जाहीर चर्चा करूं शकतां. पुण्यांतील रस्त्यांवर वाटमारी करण्यापेक्षां साहित्यसागरावर चांचेगिरी करणें हें जास्त सोपें आहे

असें तुमचें अनुभवांतीं मत बनेल अशी माझी खात्री आहे. आपला सभ्यांचा धंदा जोरांत चालून आपल्या कंपनीचे शेअर्स मुंबईच्या बाजारांत येतील असें मला तरी वाटत नाहीं. तेव्हां, सभ्य गृहस्थांनो, माझें गरिबाचें जरा ऐका व सभ्यांचा अत्याचारी मार्ग सोडून संभावित नागरिक व्हा.

## मुंबईतील हिंवाळा

मुंबईतील उद्योगधंद्याप्रमाणेंच येथील हवासुद्धां आजकाल थंड होण्याच्या मार्गाला लागली आहे. म्हटली तर थंड, नाहीं तर नाहीं–अशी हवा आम्हांला फार मानवते. कपाटांत ऊब खात असलेले गरम कपडे छातीच्या कोनाड्यावर लपेटून तरुणांचे तांडे सकाळीं फिरायला निघतात. शरीराची डागडुजी करीत असलेले पेन्शनर या दिवसांत थोडीशी जादा काळजी घेऊन तरुण पिढीबद्दल जरा साशंक होऊन भवितव्यतेबद्दल उसासे टाकतात. ज्यांना सत्तेचें घर नाहीं असे अनेक पाटीवाले आपल्या अपुऱ्या कपड्यांनीं थंडी सहन करण्याचा प्रयत्न करून कष्टानें उरलेल्या पैशांतून एक 'सिंगल' घेऊन आपलें रोजचें कष्टाचें जीवन सुरू करतात. अशा गरीब लोकांना हिंवाळ्याचे दिवस फारच त्रासाचे जातात. मुंबईला घर-भाडें कमी करण्यासाठीं कमिटी बसते. परंतु अत्यंत गरिबीमुळें ज्यांना घरच करणें अशक्य असतें अशा लोकांचा प्रश्न मात्र कुणीच मनावर घेत नाहीं. वरती आकाश आणि खालीं जमीन–हेंच बिचाऱ्यांचें जन्माचें घर !

## दारुबंदी आणि वाङ्मय

सभ्यांच्या मंत्रिमंडळाचे कारकीर्दींतच मुंबई इलाख्यांत संपूर्ण दारुबंदी करण्याची आपली महत्त्वाकांक्षा डॉ. गिल्डर यांनीं जाहीर

केल्यापासून मला मराठी वाङ्मयाबद्दल काळजी वाटूं लागली आहे. मराठींतील कांहीं मादक वाङ्मय कांहीं साहित्यसेवकांच्या मदिराभक्तीमुळेंच जन्माला आलें आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे प्रतिभासाधनाचा हा राजरोस मार्ग साहित्यिकांच्या मामुली रहदारीला बंद करूं नये अशी माझी सरकारला प्रार्थना आहे. अमदाबादला संपूर्ण दारूबंदी झाली आहे या एकाच सबबीवर तें पवित्र क्षेत्र साहित्य-संमेलनासाठीं नालायक ठरणार आहे हें कोणताहि प्रामाणिक साहित्यिक कबूल करील. कॉंग्रेस सरकारचें हें ' कोरडें ' धोरण पाहून त्यांच्या हृदयांतील मराठी साहित्याबद्दल असलेला ओलावा नाहींसा झाला आहे असें मला वाटतें. एकीकडून हिंदीची कुरघोडी व दुसरीकडून मदिरेसारख्या स्फूर्तीच्या साधनांची अशक्यता—अशा दुहेरी अडचणींत आमचें वाङ्मय सांपडण्यापूर्वी साहित्यसंमेलनानें या ' अन्यायावर ' कांहीं तरी उपाययोजना करावी अशी माझी सर्वांना प्रार्थना आहे.

## सुखाचा प्रवास

यावरून मला एक मजेदार गोष्ट आठवली आहे. माझा एक मित्र मदिरेचा उपयोग प्रतिभा जागी करण्याऐवजीं स्वतःच्या गाढ झोपेकडे कसा करतो हें मी आतां वाचकांना सांगणार आहें. वास्तविक तो तसा पीत नाहीं—त्याची व मदिरेची नुसती थोडीशी तोंडओळख आहे. परंतु प्रवासाला जातांना हा भला गृहस्थ बीरची एक रिकामी बाटली नेहमीं उशाशी ठेवून ट्रेनच्या गर्दींत सुद्धां अगदीं ताणून प्रवास करीत असतो. त्याला झोंपेंतून कुणीं उठविण्याचा प्रयत्न केलाच तर " अरे भाई, उसकू मत छेडना—ओ खूप पीके सोया है. देखो ना ये बोतल ! " असा सावधगिरीचा इषारा शेजारचा उतारू हलक्या आवाजांत देतो.

माझ्या या मित्राची ही पेटंट युक्ति त्याला आतांपर्यंत उपयोगी पडली आहे. पण सर्वत्र दारूबंदी झाली तर मात्र माझ्या मित्राला प्रवासांत सुखानें झोंप घेतां येणार नाहीं आणि मुजोरीनें चांगला प्रवास घडण्यासाठीं त्याला गांधी टोपीचा आश्रय करावा लागेल. संपूर्ण दारूबंदी झाली तर ताडीच्या झाडाखालीं मात्र राजरोस दूध पिण्यास हरकत नाहीं हें खरें.

## मराठी-कानडी वाद

कर्नाटकांत मराठी-कानडी वाद अगदीं निकराला आला आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. 'हा प्रश्न कायमचा निकालांत लागेपर्यंत आपण बेळगांवांत हिंदीच बोलूं'' अशी भीष्मप्रतिज्ञा गंगाधरराव देशपांडे यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं केली—आणि मोडलीहि. वास्तविक असा निश्चय शहाण्यानें करूं नये, कारण खुद्द बेळगांवांतच एखाद्याला शिव्या हांसडण्याचा प्रसंग आला तर मराठी कानडीइतक्या सफाईनें हिंदींत शिव्या देणें गंगाधररावांना जमणार नाहीं. बाकी हा वाद चालू आहे तोंपर्यंत श्रीपाद कृष्णांनीं सांगितलेला उपाय गंगाधररावांनीं बेळगांवच्या मुक्कामांत करायला हरकत नाहीं. परंतु इतरांनीं मात्र 'साहित्यबत्तिशीं'तील उपाय करण्याचें धैर्य केलें तर निरुपायानें त्याला आपल्या बत्तिशीला मुकावें लागेल. कानडी-मराठी वाद हा लवकर मिटणारा नसल्यानें गंगाधररावांनीं अशक्य असे निश्चय करूं नयेत हें चांगलें. हा वाद बंद झाला तर कर्नाटकांतील सार्वजनिक आयुष्यांतली खरी गंमत नाहींशी होईल असें मला वाटतें.

## बिचारे थोर लोक

मला थोर लोकांची फार कींव येते. त्यांना ज्याप्रमाणें सुखानें जगतां येत नाहीं त्याप्रमाणें त्यांना सुखानें मरतांहि येत नाहीं. थोर

लोक सोयीच्या वेळीं कालवश झाले नाहींत तर अग्रलेख वेळेवारी देतां आला नाहीं म्हणून वर्तमानपत्राचे संपादक आणि सुट्टी बुडाली म्हणून शाळेंतील बाबालोक मृत्युमुखीं पडलेल्या थोराबद्दल रडतात. थोर लोकांना अग्नि देण्यापूर्वी त्यांच्याबद्दल भाषणें करण्याची वहिवाट आहे. एखाद्या थोर गृहस्थाचे डोळे मिटण्याची खोटी—हंगामी वक्त्यांचीं तोंडें उघडलींच म्हणून हमखास समजावें. मृत व्यक्ति हूं कीं चूं करीत नाहीं या गोष्टीचा फायदा घेऊन कांहीं लोक तिची इतकी स्तुति करतात कीं, एखादे वेळीं मेलेला गृहस्थ जिवंत होऊन त्या सर्व मूर्ख आणि तोंडपुज्या वक्त्यांच्या श्रीमुखांत देतो कीं काय अशी मला नेहमीं भीति वाटत असते. जिवंत जगांतील इरसाल भोंदूपणा पाहायचा असेल तर स्मशानाइतकी दुसरी जागा नसावी, हा विरोधाभास और तर खराच. स्मशानांतील हें वक्तव्य सरकारनें कायद्यानें बंद करण्याचें बिल कायदेमंडळांत कधीं काळीं आणलें तर जिवंत सभासदा-बरोबरच मृत व्यक्तिसुद्धां त्या बिलाला आपली मूक संमति देईल अशी मला खात्री आहे.

## मुडदेफराशी भाषणबाजी

मृताच्या जवळ असणाऱ्या प्रेमळ आप्तांना मन असतें याची सुद्धां या भाटांना आठवण राहत नाहीं. स्मशानगीताचे हे बेगडी गायक मृताच्या अंत्यविधीला येण्यापूर्वी वाटेवरील दुकानांत चांगला फराळ करून आलेले असतात, हें मीं अनेक वेळा पाहिलें आहे. मृताच्या स्मृतींनीं प्रेमळ आप्तेष्टांचा कंठ दाटून येत असतां ज्या हंगामी पोपटांना कंठ फुटतो अशा सर्वांना दयामाया न दाखवितां सरकारनें पिंजऱ्यांत कोंडलें तर मला तरी आनंद होईल. या सर्व भाषणबाजीच्या मुळाशीं, दुसरे दिवशीं वर्तमानपत्रांत आपलें नांव

व शक्य तों फोटो छापून यावा हा स्वार्थ असतो. कांहीं कायम ठशाचे स्मशानी वक्ते अशा वेळीं स्मशानवैराग्याचा असा कांहीं आव आणतात कीं, बोलायची सोय नाहीं. परंतु कांहीं वेळानें 'कशाला', 'कशाला' म्हणून ते पुढें सरसावतातच. प्रत्येक मोठ्या गांवांत असले एकदोन तरी मुडदेफराशी वक्ते असतातच. आमच्यांत अनेक सुधारणा व्हाव्यात म्हणून आपण हमेश खटपट करीत असतों, परंतु या महत्त्वाच्या गोष्टीकडे मात्र अजून कुणाचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. मला वाटतें, जगाच्या अंतापर्यंत हा मानवी भोंदूपणा असाच चालायचा.

## आजचा अखेरचा दिवस

आज वर्षाचा अखेरचा दिवस. आपलें आयुष्य एकेका दिवसानें रोज कमी होत असलें तरी वर्ष संपल्यावर मात्र त्याची तीव्र आणि दुःखद जाणिव आपल्याला होते. गेल्या अनेक वर्षांप्रमाणें यंदाचेंहि वर्ष सर्वांना कठीण गेलें. देशांत कॉंग्रेसचें राज्य सुरू असलें तरी त्यापासून जनतेला म्हणण्यासारखा फायदा झालेला नाहीं. कॉंग्रेसच्या राजवटींत श्रीमंत हे जास्त श्रीमंत व गरीब हे जास्त गरीब होणार कीं काय अशी साधार भीति सर्वांना वाटते आहे. देशांतील पिकें बुडालीं असलीं तरी देशभक्तीचें पीक मात्र नेहमींप्रमाणेंच भरपूर आहे. युरोपमध्यें रोज कांहीं तरी होत असल्यानें काल विकत घेतलेला नकाशा आज निरुपयोगी ठरत आहे. पश्चिमेकडील सर्व राष्ट्रें दारूगोळा वाढविण्यांत गर्क झालीं असून ती आतषबाजी दुसऱ्याच्या देशांत केव्हां होते याची सर्व लोक सभय वाट पाहत आहेत. दारूगोळा म्हणजे चाकोलेट नसल्यानें ती सर्व जड जबाबदारी उदार अंतःकरणानें दुसऱ्याच्या माथीं मारणें अपरिहार्य आहे हें प्रत्येक राष्ट्र आज जाणून आहे. आज

अबोल असणाऱ्या लाखों तोफा, तोंडांतून एका शब्दासरशीं कोट्यवधि तरुणांचे बळी केव्हां घेतील याचा नेम नाहीं. मुलूख-गिरीची राक्षसी महत्त्वाकांक्षा या भावी भयानक संकटाच्या पाठी-मागें आहे. हें सर्व असलें तरी I wish my readers a happy new year.'

## नेहमींचें दृश्य

नागरिक हक्कांच्या बाबतींत गप्पा मारणारे लोक नागरिकांच्या कर्तव्याबद्दल किती बेफिकीर असतात हें गेल्या मंगळवारीं प्रार्थना-समाजाजवळ कुणालाहि पाहतां आलें असतें. दुपारीं ट्रॅमची वरची तार तुटून ती रस्त्यांत पडली. रस्त्यांतील विजेची ती तार किती भयंकर होती याचें ज्ञान सर्वांना असलें तरी फायर ब्रिगेडच्या लोकांनाहि न जुमानतां कांहीं लोक विनाकारण गर्दी करून त्या तारेजवळून जाण्याचा प्रयत्न करीत होते. उत्साहाच्या भरांत त्या तारेला एखाद्याचा स्पर्श झाला असता तर तो तडकाफडकी अगदीं 'तारेनें' स्वर्गाला गेला असता. अपघाताची 'गम्मत' पाहायला सवकलेले मुंबईचे लोक जरा खुट्ट झाले तरी रस्त्यांत किती गर्दी करतात याचा अनुभव प्रत्येकाला आहेच. गर्दीमुळें जबाबदार अधिकाऱ्यांना व्यवस्था करणें किती कठीण काम होऊन बसतें याचा जर आमचे लोक विचार करतील तर त्यांचे जनतेवर फार उपकार होतील. अशा वेळीं कांहीं कमीजास्त झालें तर व्यवस्था ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या डोक्यावर नागरिकांशीं अतिप्रसंग केल्याचें खापर फुटतें तें निराळेंच. नागरिकांचें कुतूहल कोणत्या प्रमाणांत पेट घेतें हें मुंबईतील एखाद्या आगीच्या प्रसंगीं चांगलेंच दिसून येतें. आमचे सुज्ञ नागरिक यापासून योग्य तो बोध घेतील तर कितीतरी गोष्टी सुरळीत होऊं लागतील. डिसेंबर १९३८

## हा फाजिलपणा बंद करा

गेल्या वर्षाप्रमाणें यंदाहि तानाजी उत्सव कमिटी पुण्यांतील भाबड्या तरुणांच्या गळ्यांत घोरपडी अडकविणार आहे असें परवां कुणींसें मला सांगितलें. घोरपडीच्या साह्यानें सिंहगड चढून जाणाऱ्या माणसास पन्नास रुपयांचें प्रचंड बक्षिस ठेवून तानाजी उत्सव कमिटीनें पुणेंकरांनाच शोभणारें औदार्य गेल्या वर्षी दाखविलें. सामान्य माणसाच्या असामान्य धैर्याची ( आणि वेळ प्रसंग पडल्यास त्याच्या प्राणाचीहि ) वरील किंमत म्हणजे जागतिक मंदीच्या दिवसांत कमी नाहीं. नामजोशी नांवाचा एक तरुण या दिव्यांतून अपघातानंतरहि शीरसलामत बचावला व त्याचा कपाळमोक्ष होऊनसुद्धां या अत्यंत बेवकूफपणाच्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लागला नाहीं हें तरुणांचें दुर्दैवच होय. पूर्वीच्या घोरपडी त्या जमान्याबरोबर नाहींशा झाल्या व आजकालच्या घोरपडी कांहीं पुढाऱ्यांप्रमाणें अवसानघातकी आहेत हें निदान पुण्यांतील लोकांना तरी सांगायला नको. या गोष्टींचा विचार करून सिंहगड चढून जाणाऱ्या 'धीरोदत्त' प्रसंगाच्या निमित्तानें वडीलधाऱ्या माणसांनीं तरुणांच्या गळ्यांत घोरपडी अडकविण्याचें कार्य करूं नये अशी माझी त्यांना नम्र विनंति आहे.

## तरुणांची दिशाभूल करूं नका

तरुणांमध्यें साहसप्रेम निर्माण करावयाचें असेल तर आजकालच्या काळाला शोभणारें दिव्य त्यांना करायला लावून त्यासाठीं बक्षिससुद्धां जंगी ठेवायला हवें. आमच्या ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध पुढाऱ्यांना तरुणांमधील साहसवृत्ति तेवत ठेवायची असेल तर विमानानें पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्याला पांच लाख रुपयांचें बक्षीस त्यांनीं ठेवावें.

पण आम्हां दरिद्री दक्षिणी लोकांना पाटीवर थट्टेंतहि पांच लाख रुपये लिहितां येतील कीं नाहीं कोण जाणे! अशा परिस्थितींत पांच लाख रुपये देण्याचें त्यांना धाडस तरी होईल का? बक्षिस देण्याच्या या 'धाडसाबद्दल' मात्र तो भला आदमी स्वतःला बक्षिस म्हणून निदान दहा टक्के तरी बाजूला काढून ठेवील. तेव्हां यंदापासून तरी तानाजी कमिटीचे लोक आमच्या तरुणांची दिशा-भूल करणार नाहींत अशी मला आशा आहे. याउपर त्यांनीं आपला हट्ट चालविला तर असल्या मूर्खपणाला सरकारनें बंदी करून असला साहसी जलसा कायद्यानें थांबवावा असा प्रचार करण्याची पाळी येईल. साहस आणि मूर्खपणा यांतील तफावत तानाजी कमिटीला कळेल अशी मला आशा आहे.

## प्रसाददीक्षेंतील पत्रें

हीं पत्रें प्रेमा कंटक या नांवाच्या मराठी मातृभाषा असणाऱ्या 'बेन' ला आलीं असें म्हणतात. हें खरें असेल तर तिनेंसुद्धां पत्रांच्या भाषांतराचा मार्ग निष्कंटक करूं नये हें अजब आहे. 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायानें मराठीचा कांटा काढून टाकण्यासहि 'प्रसाददीक्षा' या पुस्तकाचा उपयोग होईल असें मला वाटत नाहीं. तसें म्हटलें तर या पुस्तकांत फारसा दम नाहीं. बाह्यांगाप्रमाणेंच पुस्तकाचें अंतरंगहि फारसें आकर्षक नाहीं. तरी पण त्या पुस्तकाचें भाषांतर व्यवस्थित झालें असतें तर त्यावर पडलेला अश्लीलपणाचा छाप थोडातरी पुसतां आला असता. अजून हिंदी भाषा आमच्या शाळांतून सक्तीची झाली नाहीं तर मराठीची ही दैना! मग उद्यां जर ती सक्तीनें आमच्या माथीं मारण्यांत आली तर मराठी लेखकांचीं—व विशेषतः भाषांतर करणाऱ्याचीं—डोकीं ठिकाणावर राहणें शक्य नाहीं. मराठी भाषेकडे पाहून

तरी हिंदीचें फार स्तोम माजविण्याच्या मीं विरुद्ध आहें—पण मद्रास-कडे दृष्टि फेंकल्यास मराठीबद्दल मन उदास होतें.

## भाव्यांचा ' विनोद '

परवां ' त्रिकाळ ' पत्राचा अंक चाळीत असतां, केसरीच्या वा. कृ. भाव्यांनीं लिहिलेल्या ' प्रीतिविवाहा 'च्या मतप्रदर्शनार्थ लिहिलेल्या नाटकांतील कांहीं 'विनोदाचे' मासले पाहून मी थक्क झालों. संस्कृतिरक्षक मंडळांत तर भाव्यांच्या या नाटकानें अगदीं हाहाकार उडून जाईल अशी मला भीति वाटते. नाट्यसृष्टींत कां होईना, पण या वयांत भाव्यांसारखा मुरब्बी लेखक प्रीतिविवाहाच्या वाटेस गेला ही गोष्ट कमी अभिनंदनीय नाहीं. स्त्रियांच्या वेषभूषेवरील भावेप्रणीत भाष्य वाचल्यावर हा भला गृहस्थ रस्त्यानें जातांना डोळे उघडे ठेवून जात असतो हें पाहून मला आनंद झाला. केसरीच्या आवारांत प्रीतिविवाहाला प्रतिबंध नाहीं अशी माझी आपली कल्पना कांहीं वर्षांपूर्वी झाली होती. तसेंच मतप्रदर्शनासाठीं केसरी कंपूतल्या लोकांनीं लेखन करावें यावरून त्या लोकांना मतें असूं शकतात हें सुद्धां ओघानें सिद्ध होतेंच. परंतु मतप्रदर्शनाबरोबरच मूर्खपणाचें प्रदर्शन होतें, याचें भान मात्र भाव्यांना राहिलें नाहीं. पुस्तकांतील कांहीं भाग अत्यंत अश्लील असला तरी भाव्यांसारख्या पिकल्या पानांत अजून हिरवेपणा आहे ही गोष्ट वाळवंटांतील हिरवळीप्रमाणें नयनमनोहर नाहीं असें कोण म्हणेल ?

## सिंह आणि अहिंसावाद

जोगेश्वरी येथें स्वामी कृष्णानंद या नांवाच्या साधूच्या आश्रमांत एक शाकाहारी सिंह असून त्यानें परवांपर्यंत अहिंसावादाचें पालन केलें होतें. स्वामीमहाराजांच्या दर्शनाला आलेल्या लोकांच्या गप्पा

ऐकून एकंदर परिस्थितीचें ‘ सिंहावलोकन ’ करण्यापलीकडे या प्राण्याची मजल कधींहि गेली नाहीं असें जोगेश्वरीचे ‘ केसरीकार ’ अभिमानानें सांगत असतात. या सिंहाचा प्रवेश बडया लाटांच्या बंगल्यांत कांहीं वर्षांपूर्वी झाला होता असें म्हणतात. परंतु आपलें अहिंसेचें व्रत या सिंहानें कांहीं दिवसांपूर्वी मोडून एका लहान मुलीवर झडप घालून तिला जखमी केलें. कॉंग्रेसमधील नरसिंह अहिंसावाद बाजूला सारून गरीब लोकांची शिस्तभंगाच्या गोंजिरवाण्या नांवाखालीं अधूनमधून शिकार करतात हें या सिंहाच्या कानावर आलें म्हणूनच त्यानें ही आपली आलेली संधि सोडली नाहीं असें मला वाटतें. या सिंहाला वठणीवर आणण्यासाठीं स्वामीजींचा ‘ ओम् ’ हा एकच शब्द पुरेसा असला तरी एखादे वेळीं असें ओंफस् झालेलें पाहून जोगेश्वरीचे स्वामीमहाराज आपल्या लाडक्या सिंहाला यापुढें तरी शृंखलाबद्ध करतील अशी मला आशा आहे.

## कॉलेजचीं संमेलनें

कॉलेजच्या गॅदरिंगच्या निमित्तानें तरुण मुलांमुलींच्या प्रश्नाकडे जनतेचें लक्ष अधूनमधून जातें ही गोष्ट मला समाधानाची वाटते. गॅदरिंग ही संस्था कॉलेजच्या शिक्षणांत फार महत्त्वाची बाब होऊन बसली आहे, व अशा प्रसंगीं होणारा पैशाचा व कालाचा अपव्यय लक्षांत घेतां, आहेत त्या स्वरूपांत हीं संमेलनें चालू ठेवावीं कीं नाहीं याचा विचार करण्याची वेळ आली आहे असें मला वाटतें. प्रत्यक्ष आयुष्याच्या गाड्याला जुंपण्यापूर्वी, मुलांमुलींचा कॉलेजमधील काल मजेंत हुदडावयचा असला तरी त्यालाहि कांहींतरी मर्यादा असावी असें मला वाटतें. आपले पालक आपल्यासाठीं किती कष्ट करतात व आपल्याला सुख मिळावें म्हणून ते किती

काटकसरीनें राहतात हें मुलामुलींनीं लक्षांत ठेवलें तर त्यांच्यामध्यें इष्ट सुधारणा होण्यास वेळ लागणार नाहीं. तशांतून कॉलेजमधील मुलांमुलींच्या वागणुकीकडे पालक कौतुकानें पाहत आले आणि म्हणूनच आपण जें करूं तें पचेल ही वृत्ति त्यांच्यामध्यें निर्माण झाली. तेव्हां 'आजच्या एकंदर परिस्थितीला पालकहि अप्रत्यक्षपणें जबाबदार आहेत.' असें मुलांमुलींनीं म्हटलें तर त्यांची फारशी चूक होणार नाहीं असें मला वाटतें.

## मुलांना विश्वासांत घ्या

कॉलेजच्या मुलांमुलींबद्दल मला फार आशा आहे. त्यांचें स्वैर वर्तन शुद्ध हेतूनें त्यांच्या समोर मांडलें तर तीं सर्व आपल्या चुका खात्रीनें दुरुस्त करतील. परवां अशाच एका प्रसंगीं मुलांनीं —— आणि मुलींनींहि——' वंदे मातरम् ' या राष्ट्रगीताचा अपमान केला असें समजतें. ही गोष्ट खरी असेल तर ' हिंदी ' म्हणवून घेणाऱ्या प्रत्येकाला लाजेनें खालीं मान घालावी लागेल. तरीपण मुलांच्या बारगळयाच्या मुळाशीं कांहींतरी वाईट हेतु असतो असें मला तरी म्हणवत नाहीं. पालकांनीं कौतुक करावें, उत्तेजन द्यावें, वर्तमानपत्रांत आपापल्या कॉलेजंचे हीन अभिरुचीला पोषक असे रिपोर्ट द्यावेत आणि सुशिक्षित म्हणून मुलामुलींचें कोड समाजानें पुरवावें असा बनाव बनून आला म्हणजे मुलांच्या हातून कमीजास्त झालें तर नवल तें काय ? यापुढें प्रत्येक पालकानें आपल्या मुलांमुलींना विश्वासांत घेऊन प्रेमानें त्यांची कानउघाडणी केली तर मुलांमुलींच्या हातून अप्रिय वर्तन होणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. मराठी पत्रपंडितांनींसुद्धां या महत्त्वाच्या प्रश्नांत बिचाऱ्या पालकांना मदत केली तर त्यांच्यावर उपकारच होतील. पण आमचे वर्तमानपत्रकार ही गोष्ट मनावर घेतील असें मला तरी वाटत नाहीं.

## रिकामटेकडे मुंबईकर

मुंबईच्या लोकांना खूप काम असतें, अशी जरी बाहेरगांवच्या लोकांची समजूत असली तरी येथें रिकामटेकडे लोकहि खूप आहेत हें मी त्यांना सांगतों. जरा कुठें कांहीं झालें तर एका मिनिटांत शेंकडों लोक गोळा होतात. एखादा ' वक्ता ' रस्त्यांतच व्याख्यान देऊं लागला तर त्याला श्रोते मिळण्याची पंचाईत पडत नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेऊनच कांहीं सार्वजनिक ठिकाणीं कॉंग्रेस आपल्या मासिक झेंडा-वंदनाचा कार्यक्रम उरकून घेत असते. परवां माझा एक मित्र रस्त्यानें चालला होता. एका गल्लींत खूप गर्दी झाली असून लोक मजेनें हंसत होते. एक मनुष्य मोठ्यानें कांहींतरी बडबडत होता. बाहेरगांवच्या माझ्या मित्राला एखादा कॉंग्रेसचा देशभक्त उपदेशाचा अनाहूत रतीब श्रोत्यांना वांटतो आहे असें वाटलें व त्या थोर देशभक्ताच्या भाषणाचा आपल्यालाहि लाभ व्हावा म्हणून तो गर्दींत घुसला. त्याला वाटलें कीं येत्या इलेक्शनचा चांगलासा प्रचार कुणीतरी करीत असेल व आपण तें भाषण ऐकून धन्य धन्य होऊं. पण वाचकहो ! गर्दींत शिरल्यावर बोलणारा इसम देशभक्त नसून एक साधासुधा आदमी होता व त्याच्यासमोर एक नंदीबैल होता असें त्याला दिसलें.

## उलट्या मंत्राचें सामर्थ्य

रेडिओची तकलीफ इतर शहरांतून फारशी नसली तरी मुंबईत मात्र या यंत्राचा कांहीं वेळेला फार त्रास होतो. आपण पैसे दिले असल्यानें वाटेल तितक्या मोठ्यानें रेडिओ वाजत ठेवण्याचा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असें रेडिओच्या मालकाला प्रामाणिकपणानें वाटतें. अशा करण्यापासून शेजाऱ्यांना उपसर्ग होईल कीं

नाहीं याची ती पर्वाच करीत नाहीं. भूमिजनांचे आणि लहान मुलांचे निर्बुद्ध कार्यक्रम इच्छेविरुद्ध कानांवर आदळूं लागले म्हणजे त्यांची कींव येते. माझ्या एका मित्राला असाच त्रास होत असतां त्यानें मात्र एक अभिनव कल्पना अमलांत आणली. शेजाऱ्याची बनियावृत्ति ओळखून त्यानें आपणास बिनखर्चानें होणाऱ्या त्या ' करमणुकी 'ची खूप तारीफ केली व रेडिओच्या मालकाचे आभार मानले. 'रेडिओ घेण्याचा आपला बेत होता, पण अनायासें आपलें काम होत असल्याचें पाहून आपण तो बेत रद्द केला ' असेंहि त्यानें शेजाऱ्याला सांगितलें. आपल्या पैशाचा ' फायदा ' इतरांना फुकट मिळतो आहे असें पाहून रेडिओच्या मालकानें दुसरे दिवसापासून रेडिओ अगदीं हलक्या स्वरांत वाजविण्याची तजवीज केली, आणि माझा मित्र एका जाचांतून बचावला.

### योग्य उपाय करा

ता. ८ च्या 'नवाकाळ' पत्रांत पी. विश्वनाथ या नांवाच्या सद्गृहस्थांचें एक पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांनीं वर्णन केलेली हकीगत खरी असल्यास कुणालाहि चीड येईल. कांहीं सुशिक्षित तरुणांनीं रस्त्यानें जाणाऱ्या मुलींची चेष्टा केली आणि त्याबद्दल एका मुलीचें खरमरीत उत्तरहि त्या टवाळांना ऐकायला मिळालें, असें मला साधारणपणें नवाकाळच्या छपाईच्या तडाख्यांत सांपडलेल्या मजकुरावरून कळलें. त्या टवाळ रंगेल तरुणांची चेष्टा चालू असतां पी. विश्वनाथ यांनीं त्यांपैकीं एकाचें तरी तोंड कां रंगविलें नाहीं, याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें. समाजांत भगिनीवर्गाची अब्रू हलकटपणानें हाताळणाऱ्यांना पी. विश्वनाथसारखे थंड प्रकृतीचे प्रेक्षक मिळतात म्हणूनच हे अत्याचार वाढत्या

प्रमाणांत आढळतात. पी. विश्वनाथ कॉंग्रेसचे शंभर टक्के अनत्याचारी मेंबर असले तरी त्यांचें हें वर्तन खुद्द गांधींनासुद्धां पटणार नाहीं. यापुढें दुर्दैवानें असा प्रसंग पी. विश्वनाथ यांच्यावर आलाच तर त्यांनीं आपल्या हाताची रग वर्तमानपत्रांत पत्र लिहिण्यांत दवडूं नये, अशी त्यांना माझी विनंति आहे. दुष्ट गुंडांच्या हातून लाचार भगिनीला सोडवायचें यांत अत्याचार खात्रीनें नाहीं, हें मी पी. विश्वनाथ यांना पुन्हां सांगतों.

## आचरट कॉंग्रेसभक्त

कांग्रेसचा महोत्सव जवळ येऊं लागला म्हणजे कांहीं लोकांचें सुप्त वेड जागें होऊं लागतें. आपल्या गांवाहून पायीं प्रवास करून कॉंग्रेस नगर गांठणाऱ्यांचा एक वर्ग असून त्याचे तीन 'प्रतिनिधि' कांहीं दिवसांपूर्वी पुण्याहून त्रिपुरीकडे कूच करते झाले. मजल दरमजल करून वाटेवरील गांवांत मुक्काम ठोकून विश्रांतीनंतर पुढें सटकायचें असा या पुणेरी टोळीचा कार्यक्रम आहे. मुक्कामाला केव्हांहि पोंचलें तरी, सर्व गांवांत प्रभातफेरीचीं गीतें गाण्याचा या त्रिकुटाचा कार्यक्रम असल्यानें कांहीं ठिकाणीं त्यांची ही 'प्रभातफेरी' सूर्यास्तानंतरहि घडल्याची बातमी छापून आलेली आहे. या प्रकारावरून नादुरुस्त मेंदूशीं संबंध असलेल्या पुण्यांतील एका संस्थेच्या 'वधाऱ्या'चा उद्घाटन समारंभ डॉ. गिल्डर यांना कां करावा लागला याची उपपत्ति लागते. एकूण पुणें कांहीं बाबतींत तरी महाराष्ट्रांतील इतर शहरांपेक्षां एक कदम आगे आहे असा पुणेकरांचा हट्ट रास्त नाहीं असें कोण नाकबूल करील? इतकी पायपीट करूनहि उपरोक्त पुणेरी त्रिकुट त्रिपुरीला वेळेवर पोंचलें तर त्याचे फोटो छापण्यास कांहींच हरकत नाहीं. वरील उदहरणां-

वरून कांहीं भाग्यवंत लोकांना रिकामटेकडेपणांत घालवायला भरपूर वेळ असतो हें पाहून कोणालाहि त्यांचा हेवा वाटेल.

## हुंडा

कांहीं दिवसांपूर्वी सौ. मैत्रेयी विनोद, M.A., B.T., या नांवाच्या पुण्यांतील एका सुशिक्षित बाईंनीं कुठल्याशा एका महिला परिषदेंत हुंड्याबद्दल आपलीं जीं मतें बोलून दाखविलीं तीं वाचून आमच्या शिकलेल्या महिला अजूनहि गार्गी-मैत्रेयीच्या जमान्यांत रेंगाळताहेत असें स्पष्ट दिसतें. यानंतर थोड्याच दिवसांनीं नागपूरकडे कु. ताटके या नांवाच्या एका कॉलेज कन्येनें हुंड्यापायीं स्वतःला जाळून घेतल्याचें वृत्त मीं वर्तमानपत्रांत वाचलें. हुंड्याची दुष्ट व तिरस्करणीय चाल अशा दुर्दैवी रीतीनें अधून मधून अक्षरशः तावून सुलाखून निघत असतां आमच्या कांहीं सुशिक्षित तरुणींनीं तिची तरफदारी करावी याचें मला आश्चर्य वाटतें. आडनांवापलिकडे मैत्रेयीबाईंचा विनोदाशीं संबंध असल्याचा बोभाटा नसल्यानें त्यांनीं केलेलें भाषण 'विनोदी' होतें असें सुद्धां म्हणण्याची सोय नाहीं. आपल्या हौशी ऐपतीप्रमाणें गरीब मनुष्यसुद्धां जांवयाला कांहीं तरी देत असला तरी मूर्ख नवरदेवानें हुंड्यासाठीं अडून बसणें हें केव्हांहि निंद्यच होय. कुरूप मुलींना उजवायला हुंडा जरी कामी पडत असला तरी हुंड्यासाठीं आमच्या मुली कामास येऊं लागल्या तर त्या 'खुनाचें' पाप तरुणांवरच आहे हें त्यांनीं विसरूं नये. विनोदाबाईंच्या प्रामाणिक मतांवर अर्थातच माझी टीका नाहीं.

## पालकांना विनंति

दिवाळीच्या मंगल प्रसंगीं फटाक्यांमुळें ज्याप्रमाणें अपघात होतात त्याप्रमाणें मुंबईत पतंगांच्या निमित्तानें चारदोन अपघात

तरी होतातच. दुसऱ्यानें ‘ काटलेले ’ पतंग हस्तगत करण्यासाठीं प्राणांवर उदार होऊन कांहीं पतंगप्रेमी रस्त्यांत मोटारखालीं येतात, नाहींतर इमारतीच्या उंच ‘ अगाशी ’वरून खालीं पडतात. ‘ मांज्या ’ लावलेला तुटलेल्या पतंगाचा थोडासा दोरा हस्तगत करण्यासाठीं आयुष्याची दोरी तुटण्याचा कांहींवर प्रसंग येतो. प्रतिवर्षी संक्रांतीला होणारे हे अपघात पाहून हलव्याप्रमाणेंच माझ्या अंगावरहि कांटा येतो. तिळगुळाची देवघेव करून वर्षभर गोड बोलण्याचा वायदा करणारें एखाद्याचें तोंड मुलाच्या अपघातानें कडु होतें. ध्येयाइतकाच उंच असलेला पतंग हातीं यावा म्हणून मुलें धडपड करतात. आणि त्या धडपडींत कांहीं ध्येयवादी तरुणांप्रमाणें जिवाचें बलिदान देतात. या टाळतां येणाऱ्या अपघातांची खरी जबाबदारी मुलांच्या पालकांवर आहे असें मला वाटतें. मुलांची हौस म्हणून त्यांना पतंग आणून दिल्यावर आपलें कर्तव्य संपलें अशा बेफिकीरी आनंदांत पालक असतात आणि याचें दुर्दैवी पर्यवसान पाहण्याचें कांहींच्या नशिबीं असतें. आमचे लोक आतां तरी शहाणे होतील काय ?

## रसिक मियाचा लांडा कारभार

कांहीं दिवसांपूर्वी उमरावतीच्या कॉलेजांत एका मुसलमान विद्यार्थ्यानें एका विद्यार्थिनीच्या डोक्यांतलें फूल भर वर्गांत काढलें आणि तिचा विनयभंग केला. या अत्याचाराचा रिपोर्ट त्या मुलीनें प्रिन्सिपॉलकडे नेऊनसुद्धां त्या महात्म्यानें त्या रसिक मुसलमान विद्यार्थ्यास ताबडतोब शासन केलें नाहीं ही गोष्ट जरा चमत्कारिकच दिसते. एका सन्मान्य शिक्षणसंस्थेच्या कीर्तीला हरताळ फांसणाऱ्या एका गुलजार मीयाला योग्य शासन मिळण्यासाटीं सर्व विद्यार्थ्यांना हरताळ पुकारण्याचा प्रसंग यावा याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं थड

प्रकृतीच्या प्रिन्सिपॉलला ताबडतोब जबाब मागावा. ज्ञानामृत प्राशन करण्याच्या•या वयांत एखाद्या मुसलमान विद्यार्थ्याला इष्काच्या चषकाची चटक असेल तर त्यानें कॉलेजला रामराम ठोकून शादीच्या मार्गाला लागणें हा उत्तम मार्ग होय. उपरोक्त मीयानें पुन्हां एखाद्या रमणीरत्नाचा विनयभंग करण्याचा लांडा कारभार केला तर त्याची गांठ चौदाव्या रत्नाशीं पडेल हें त्यानें विसरूं नये. कॉलेजमधील एकंदर बेजबाबदार वातावरणाची ही प्रतिक्रिया आहे ही गोष्ट मात्र सर्व हिंदु कुमार-कुमारींनीं लक्षांत ठेवावी.

## इस्पितळें आणि मराठी वाङ्मय

कांहीं दिवसांपूर्वीं मी ज्ञानप्रकाश चाळीत असतां 'लेखकांचा इस्पितळाशीं संबंध आला तर मराठी साहित्यांत कांहींशी नवीन पद्धतीची भर पडेल' असें प्रो. फडक्यांनीं कुठेंसें म्हटलें असल्याचें दिसून आलें. माझा या बाबतींत फडक्यांशीं प्रामाणिक मतभेद आहे. इस्पितळाशीं लेखकांचा दोन तऱ्हेनें संबंध येऊं शकतो. एखाद्या अपघातांत लेखक सांपडला आणि त्याचा इस्पितळाशीं संबंध आला तर मृत्युपत्राखेरीज इतर वाङ्मय त्याला निर्माण करणें शक्यच नाहीं. दादर संमेलनानंतर एक लेखक उजवा हात अपघातांत दुखावल्यामुळें इस्पितळांत गेला. सुदैवानें तो सव्यसाची लेखक नसल्यानें डाव्या हातानें लिखाण करणें मनांत असूनहि त्याला साधलें नाहीं. सर्व अवयवांनिशीं आणि धड डोक्यानें लेखक किंवा कवि इस्पितळांत गेले आणि तेथें सुंदर परिचारिका असल्या तर त्या रसिक कलावंतांना हृद्रोग जडून लेखन करण्याइतकें त्यांचें डोकें शुद्धीवर राहणेंच शक्य नाहीं. आणि वाचकहो, एखादा कवि इस्पितळांत जाऊन आपलें स्वर्गीय काव्यगायन करूं लागला तर येथील खरोखरीचे रोगी स्वर्गवासी होतील या भीतीनें त्या

कवीला जबाबदार अधिकारी इस्पितळाबाहेर हांकून देतील. एकूण लेखकांनीं इस्पितळाच्या वाटेस जाऊं नये हेंच उत्तम. •

## जिवंतपणीं श्राद्धसमारंभ

कांहीं मनुष्यांचा परलोकावर किती जबरदस्त विश्वास असतो याचें प्रत्यंतर बंगालमध्यें कांहीं दिवसांपूर्वी आलें. ई. बी. रेल्वेवर मुकर्जी नांवाचा एक कट्टर सनातनी गृहस्थ नोकरीवर आहे. आपल्या पश्चात् आपला वाह्यात मुलगा आपलें श्राद्ध करील कीं नाहीं, या भीतीनें मुकर्जीनें आपलें स्वतःचें श्राद्ध इष्टमित्रांना समारंभपूर्वक पाचारण करून उरकून घेतलें व सर्वांना सुंदरशी मेजवानी दिली. वडिलांनीं अशा रीतीनें श्राद्ध समारंभ उरकल्यामुळें ' बाप दाखव नाहींतर श्राद्ध कर ' अशा पेचप्रसंगांतून तूर्त तरी मुकर्जीचे भाग्यवंत चिरंजीव सुटले आहेत. पण स्वर्गांतली पद्धति मुकर्जीसकट कुणालाच ठाऊक नसल्यानें एकदां घेतलेला पिंड त्याला सदासर्वकाळ कसा पुरणार याची विवंचना त्याला सतावून सोडीत असेलच. स्वर्गांत समाजसत्तावाद नांदत असला तर मुकर्जीला इहलोकाप्रमाणें परलोकींसुद्धां पोटभर खावयाला मिळेल याबद्दल वाद नाहीं. परंतु स्वर्गांत कॉंग्रेसचें राज्य असलें तर मात्र मुकर्जीला पोटाची काळजी करण्याची पंचाईत पडेल खरी. आतांपर्यंत स्वर्गांत गेलेल्या रेल्वे नोकरांनीं पोटासाठीं तेथें संप पुकारला तर एखादा स्वर्गवासी कॉंग्रेसवाला त्याच्यावर गोळीबार करून त्याला पुन्हां स्वर्गांत पाठवायचा. परलोकविद्याविशारद ऋषि या प्रश्नावर प्रकाश पाडतील तर मुकर्जी सुखानें प्राण सोडील.

## सावरकरी भयंकर मराठी

आष्टी येथें राहणाऱ्या बापट या नांवाच्या गृहस्थानें हिंदुस्थानाला ' इंदुस्थान ' म्हणावें असें जाहीर केलें आहे.

डॉ. पटवर्धनांप्रमाणें भाषाशुद्धीचें वेड लागलेल्या एखाद्या गृहस्था-कडून खालीलप्रमाणें मला पत्र आलें तर त्यांत आश्चर्य वाटायला नको :—

" कर्णावतीहून माझ्या एका मित्राचें आवतन आलें म्हणून टांगाळून अग्निरथाच्या फलाटावर आलों. गुंजराथ टपाली ( Mail ) निघून गेली होती म्हणून काठेवाड तुफानी (Express) पकडावी लागली. प्रवासपत्रिका ( Ticket ) देणाऱ्यास भागानगर आणि कर्णावती हीं नांवें टाऊक नाहींत ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. आतां आपल्या मुंबापुरीला आलों कीं, दादरास केळुस-कर पथावर राहणाऱ्या तात्यारावांना हें निवेदन करून यावर एखादी त्वर्य ( urgent ) योजना करावी अशी विनंति करीन. काल रामभाऊ आठवल्यांकडे गेलों होतों. त्यांच्याबद्दल वर्तमान-पत्रांत विनाकारण तुम्ही लोक कांहींतरी लिहीतां. त्यांच्याकडे काष्ठ-फलकावर बसून चषकांतून उदक प्राशन करून निघालों. येतांना सामानासाठीं एक श्रमजीवी माणूस मिळाला म्हणून अडचण झाली नाहीं... .." वगैरे वगैरे !

वाचकहो, जिवंत आहांत ना हें वाचून? याचें नांव भाषाशुद्धि! अर्थात् एखाद्या इरसाल भाषाशुद्धिवाल्याला वरील पत्र आहे त्या-पेक्षांहि भयंकर करतां येईल ही गोष्ट निराळी. हा माझा आपला अल्पसा प्रयत्न आहे.

## हत्या आणि आत्महत्या

हत्या आणि आत्महत्या यांचें प्रमाण दिवसेंदिवस वाढतें आहे, हें मुंबई कॉरोनरच्या गेल्या वर्षाच्या अहवालावरून लक्षांत येतें. पोटाला खायला मिळत नाहीं, मुलाबाळांचे हाल बघवत नाहींत आणि अब्रूनें दिवस काढणें अशक्य होतें ही परिस्थितीच या

दुर्दैवी आत्महत्यांना कारण होते. परिस्थिति बदलेपर्यंत हें असेंच चालायचें असें म्हटल्याशिवाय आज गत्यंतर नाहीं. परंतु 'रस्त्यांतले अपघात खरोखरीच टाळतां येणें शक्य नाहीं काय ?' असा प्रश्न मला कोणीं विचारला तर 'ते अपघात बऱ्याचशा प्रमाणांत टाळतां येणें शक्य आहे' असें उत्तर मी देईन. बहुजनसमाजाची बेफिकीर वृत्ति नाहींशी झाली तर अपघातांचें प्रमाण एकदम कमी होईल. पतंग आणि फटाके यांच्यापासून होणारे अपघात कां टळतां येऊं नयेत हेंच मला समजत नाहीं. तसेंच रस्त्यानें जातांना फुटपाथ असूनहि त्यांचा उपयोग लोक कां करीत नाहींत हें सुद्धां जबाबदार अधिकाऱ्यांनीं पाहण्यासारखें आहे. अगदीं विमा उतरल्यागत रस्त्यानें चालण्याची आमची प्रवृत्ति जोंपर्यंत नाहींशी होत नाहीं तोंपर्यंत तरी अपघातांचें प्रमाण कमी होणें शक्य नाहीं.

### सायकली आणि लहान मुलें

मुंबईच्या रस्त्यावर लहान मुलें सायकलवरून सैरावैरा पळतांना आपण नेहेमीं पाहतों. वास्तविक लहान मुलांना सायकलवरून जाऊं देणें, हें बेकायदा करायला कांहींच हरकत नाहीं. तसेंच या मुलांना भाड्यानें सायकली देणाऱ्यांनासुद्धां दंड व्हायला हवेत. पण आमचे जबाबदार अधिकारी या बाबतींत अगदींच थंड आहेत. लहानपणापासून मुलांना सेफ्टी फर्स्टची शिकवण मिळाली तर रस्त्यानें जतांना तीं खात्रीनें फुटपाथवरूनच चालूं लागतील अशी माझी खात्री आहे. यासाठीं मुलांच्या अभ्यासक्रमांतच आदर्श नागरिक होण्यासाठीं कांहींतरी सोय केली पाहिजे. सिनेमा, रेडिओ, ग्रामोफोन रेकॉर्ड वगैरे त्यांना दाखवून ऐकवून अपघात कसे टाळावेत याचें ज्ञान त्यांना होणें अवश्य आहे. या बाबतींत म्युनिसि-

पालिटी, सरकार आणि सेफ्टी फर्स्ट यांचें सहकार्य झालें तर पुष्कळसें काम होईल असें मला वाटतें. या महत्त्वाच्या प्रश्नावर एखादी लहान आणि सुटसुटीत कमिटी सरकारनें बसविली तर अनेक लोकांना जीवदान दिल्याचें श्रेय त्यांना मिळेल. ना. मुनशी यांचें या सूचनेकडे लक्ष जाईल काय ?

**खोटें बोलण्याचें कारण**

हल्लीं नवीन नवीन शोध निघाले असल्यानें आजारी पडणेंहि मोठें सोयीचें झालें आहे. आजारी माणसांना दुसऱ्यांचें ताजेंतवानें रक्त देऊन त्यांची जीवनज्योत तेवती ठेवण्याची युक्ति निघाल्यापासून अनेकांचे अपमृत्यु टाळतां आले आहेत. कांहीं महिन्यांपूर्वी माझा एक मित्र असाच आजारी पडला असतां त्याला जगविण्यासाठीं एकाचें रक्त त्याच्या शरिरांत घालण्यांत आलें. सुदैवानें माझा मित्र त्या जिवावरच्या दुखण्यांतून उठला व आम्हां सर्वांचा जीव भांड्यांत पडला. परंतु कांहीं दिवसांनीं माझ्या मित्राच्या स्वभावांत आश्चर्यकारक फरक पडला व त्यामुळें आम्हांला चांगलाच धक्का बसला. कधीं चुकूनहि खोटें न बोलणारा तो उमदा तरुण आतां चुकूनहि खरें बोलेनासा झाला. त्याचें खोटें बोलणें इतक्या थराला गेलें, कीं आपला मुलगा गेल्या आजारांत खतम् झाला असता तर बरें झालें असतें असें त्याच्या आईवडिलांना वाटतें. याचें कारणहि आमच्या लक्षांत येईना. अखेरीस कसून तपास केल्यानंतर आम्हांला समजलें, कीं गेल्या आजारांत त्या तरुण मित्राला एका कट्टर कॉंग्रेसवाल्याचें रक्त देण्यांत आलें होतें.

**न ‘ चालणारा ’ रुपाया**

परवां मीं एका दुकानांत माल खरेदी केल्यावर त्याचें बिल चुकतें केलें. परंतु एका रुपयाचा आवाज नीट नव्हता म्हणून दुकानदारानें

तो रुपया मला परत केला. रुपयाचा आवाज ओळखतां येण्याइतकें संगीताचें ज्ञान आमच्या समाजांत मामूली माणसांनाहि आजकाल कसें मिळतें आहे हें यावरून दिसून येतें. वास्तविक तो रुपया चालत चालतच माझ्या जवळ आला होता--तेव्हां तो त्याच वेळीं कां 'चालूं' शकला नाहीं हें मला समजत नाहीं. साहित्य-सृष्टींत जर खोटीं नाणीं चालूं शकतात तर साध्या व्यवहारांतच तीं कां चालूं नयेत हें कोडें मला तरी उलगडत नाहीं. सत्यसृष्टींत बनावट नाणीं चटकन् ओळखतां येतात. पण खोटीं नाणीं साहित्यसृष्टींत तरी आमरण भाव खाऊन असतात हें पाहिलें म्हणजे कुणालाहि मजा वाटेल. गल्लोगल्लीं ठाण मांडून बसलेल्या संगीत शाळांमुळें समाजांतील सर्वांचे गाण्याचे कान रुपयाच्या आवाजानें टवकारले गेले तर अनेकांची फार मोठी गैरसोय होईल, असें मला वाटतें. निरनिराळे पदार्थ देणारीं यंत्रें विलायतेप्रमाणें आमच्याकडे आलीं तर मात्र समाजांतील सर्व बेसूर रुपये निमूटपणें चालूं लागतील अशी माझी खात्री आहे.

## दारूबंदी

गेल्या बुधवारीं मुंबई सरकारचें अंदाजपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून मुंबईतील मद्यप्यांना धसका बसला असेल. कॉंग्रेस सरकार अशा रीतीनें जीवनाचा आनंद आपल्यापासून हिरावून नेणार नाहीं अशी भाबडी समजूत अनेक मद्यप्यांची असण्याचा संभव आहे. सरकारच्या या 'कोरडया' धोरणाचा निषेध, अनेक गुत्त्यांतून आज अगदीं ओल्या डोळ्यानें होत असेल. कांहीं जुन्या आणि जाणित्या वीरांनीं आपण ऑगस्टमध्यें घरटाव करून या दुष्ट आणि सहानुभूतिशून्य मुंबईतून बाहेर कुठेंतरी जिवाला 'ओलावा' मिळेल अशा ठिकाणीं जाण्याचा आपला मनोदय घरमालकांना सांगितला

असेल. सिनेमासृष्टींतील अनेक कलावंतांना ऑगस्टपासून आपल्या कामांत ' रंग. ' भरणार नाहीं अशी भीति वाटत असेल. गुत्त्यांच्या बाहेर चणे विकणाऱ्यांना उपासमार होऊन फुटाणे फाकण्याची पाळी येते कीं काय अशी शंका वाटत असेल. पुणें अजूनहि या दारूबंदीच्या फंदांत नसल्यानें, त्या ऐतिहासिक शहराची मुंबईच्या उपनगरांत जमा करून ' ग्रेटर बॉम्बे 'चें ऐस-पैस धोरण पुण्यापर्यंत नेऊन भिडवावें असा अर्ज सरकारला करण्याचाहि कांहीं लोकांचा मनसुबा असेल.

**Hasten Slowly**

दारूबंदीचें धोरण कुणालाहि अमान्य होण्यासारखें नसलें तरी या बाबतींत अमेरिकेला आलेला अनुभव कॉंग्रेससरकारनें दृष्टीआड करू नये असें माझें माबाप सरकारला सांगणें आहे. दारूबंदीचा अव्वल अमदानींतला उत्साह कालान्तरानें कमी होणें अशक्य नाहीं. उत्साहाच्या अभावाप्रमाणेंच उत्साहाचा अतिरेक कार्याची हानि करण्यास कारणभूत होत असतो हें अनेक वेळां सिद्ध झालें असूनहि त्याचा पुन्हां पडताळा पाहण्याचें अण्णासाहेब लठ्ठयांनीं टाळलें असतें तर त्यांत फारसें बिघडलें नसतें. Hasten slowly चें गेल्या वर्षांतील तत्त्व आणखी कांहीं वर्षें चालणें इष्ट होतें असें मला वाटतें. तरी पण दारूबंदीचें तत्त्व मला मान्य असल्यानें मुंबई सरकारला या पवित्र कार्यांत यश यावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. मात्र यापुढें स्पिरिटचा खप वाढून जनता निराळ्या अर्थानें ' स्पिरिटेड ' होणार नाहीं ही दक्षता सरकारनें वेळेवारी घ्यावी हें चांगलें. दारूबंदीच्या कडक अंमल-बजावणीच्या निमित्तानें मुंबईच्या आयुष्यांत विनोदनिर्मितीचे अनेक प्रसंग येऊन ओल्या पावसाळ्यांतील कंटाळवाणा जीवनक्रम

थोडातरी मजेचा आणि सुसह्य होईल हासुद्धां 'कोरडया' धोरणाचा थोडाथोडका फायदा नाहीं.

### एक अजब उतारू

कांहीं दिवसांपूर्वी कलकत्त्याहून नैहत्तीला जाणाऱ्या एका गाडींत एक सर्प असल्याचें दिसून आल्यावरून उतारूंनीं फलाटावर भराभर उडया मारून स्वतःचा बचाव करून घेतला. बिनातिकिटानें प्रवास करण्याचें वेड सर्पांपर्यंत जाईल असें रेल्वेच्या अधिकाऱ्यांनासुद्धां वाटलें नसेल. हा भला गृहस्थ अगदीं मुख्य दरवाजानें सरपटत आला असता तरी त्याला तिकिट विचारण्याचें धाडस एकाहि तिकीट कलेक्टरला झालें नसतें हें उघड आहे. आपला हक्काचा पेटारा सोडून बिनातिकिटानें प्रवास करण्याचा चंग अनेक सर्पांनीं बांधला तर मात्र तिकिट कलेक्टराबरोबर पुंगीवाले गारुडीहि नेमण्याचा प्रसंग हिंदी रेल्वेवर येईल असें मला वाटतें. पुढाऱ्यांच्या आगमनानें डबा जसा खाली होतो तसाच सर्पप्रवेशानें होण्याची खात्री असल्यानें, झोनच्या दिवसांतसुद्धां कोणत्याहि सर्पाचा प्रवास सुखाचा होईल यांत शंका नाहीं. परंतु फुकट प्रवासाचें डोक्यांतील वेड, डोक्यासकट चेंचून निघण्याचा संभव असल्यानें सर्पांची जात रेल्वेच्या वाटेस फार करून जाणार नाहीं असें मला वाटतें. साहित्यसृष्टींत शिरोड्याचें एक पराक्रमी फुरसें जसें नामवंत झालें त्याचप्रमाणें रेल्वेच्या जगांत प्रथितयश होण्याचा पहिला मान कोणत्या सर्पाला मिळतो हें केव्हां तरी दिसेलच.

### अपत्यप्रेमाचा अभिनव नमुना

परवां मैनसिंग येथून फार मजेदार बातमी आली आहे. कुठल्याशा परीक्षेत आपल्या मुलाच्या ऐवजीं एका प्रेमळ पित्यानें संस्कृतचा पेपर सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु या सुसंस्कृत पित्याला

आपल्या संस्कृताचें ज्ञान, सुपरवायझरच्या मतभेदामुळें प्रकट करतां आलें नाहीं आणि त्याला परीक्षेच्या हॉलमधून मानहानि सहन करून जावें लागलें. या प्रकारामुळें त्या अपत्यवत्सल पित्याला फार वाईट वाटलें असेल यांत शंका नाहीं. आपली इस्टेट ज्या अर्थी आपण आपल्या मुलाला देऊं शकतों, त्या अर्थी आपलें ज्ञान त्याच्या कामीं लावण्यास हरकत नाहीं अशी भाबडी समजूत त्या भल्या गृहस्थाची झाली असल्यास त्याची चूक नाहीं. रोजच्या व्यवहारांत गांवीं गेलेला गडी बदली देऊं शकतो तर परीक्षेंतच या सरळ बदली-प्रकरणाला मज्जाव कां असावा हें कोडें तो गृहस्थ अजूनहि सोडवीत बसला असेल. एकंदरीनें, आपल्या लाडक्या मुलासाठीं आजकालच्या जमान्यांत कोणत्याहि पित्याला वाटेल तें करतां येऊं नये याचें वाईट वाटतें. ‘मेरा लडका’ म्हणून त्या गृहस्थानें स्वस्थ बसावें अशी माझी त्याला विनंति आहे.

## शिक्षकांना न्याय द्या

मुंबई इलाखा प्राथमिक शिक्षकांच्या भीषण परिस्थितीचें आचार्य अत्रे यांनीं परवां जें वर्णन केलें तें वाचून कोणत्याहि सहृदय माण-साला अत्यंत वाईट वाटेल. परंतु कॉंग्रेस सरकारचें लक्ष या प्रश्नाकडे ता. १ एप्रिलच्या मास्तरांच्या उपासानें जाईल असें मला तरी वाटत नाहीं. उपासाची देशदास रानडे-मेथड त्रिकाळच्या प्रकरणीं जी कुचकामाची ठरली आहे ती या मास्तरांना कितपत उपयोगीं पडेल याची मला फार शंका वाटते. अर्धपोटीं राहणाऱ्या मास्तरांना एका दिवसाचा उपास सहज पचनीं पडेल ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. मात्र मास्तरांच्या भयंकर परिस्थितीचें लोण आचार्य अत्रे हे ना. खेरांपर्यंत पोंचवितील तरच त्यांची या बाबतींत सक्रिय सहानुभूति आहे असें मी म्हणेन. या सहानु-

भूतीचा ‘ इसार ’ म्हणून त्यांनीं पुण्यांतील म्युनिसिपल मास्तर लोकांचा पगार वाढवावा आणि ‘ आधीं केलें मग सांगितलें ’ हें तत्त्व आचरणांत आणावें. जी गोष्ट पुण्याच्या म्युनिसिपालिटीला करतां येणें शक्य आहे ती सरकारला खात्रीनेंच करतां येईल. बाकी अत्र्यांचा उपासावर विश्वास आहे, या गोष्टीवर माझा आतांपर्यंत विश्वास नव्हता.

---

## गेलें वर्ष ( धनुर्धारी दिवाळी अंक १९३९ )

आज मीं गेल्या वर्षी घडलेल्या कांहीं गोष्टींचा आढावा घेण्याचें ठरविलें आहे. हें निरीक्षण करतांना माझी दृष्टि पुण्या-मुंबई-पलीकडे फारशी न जाणें साहजिकच आहे. गतसालचा आढावा घेतांना माझ्या स्मृतिपटलावर रेंगाळत असलेल्या सर्वच आठवणी खरडून काढण्याचें मीं ठरविलें तर माझ्या या लेखाला सरकारी रुक्ष अहवालाचें स्वरूप येऊन वाचकांना तो वाचणें अशक्य होऊन जाईल. तसेंच विधायक, प्रांजल आणि प्रामाणिक टीकाक्षेत्रां-पलीकडे माझी लेखणी शक्य तों जाणार नाहीं याची काळजीसुद्धां मी आपणाकडून घेईनच. परंतु ही खबरदारी घेऊनहि माझी टीका एखाद्याला बोंचली तर ‘ द्वेष नोहे––प्रेम मुळाशीं आहे ’ इतकें मात्र त्यांनीं लक्षांत ठेवावें. राजकारण, समाजकारण, साहित्य, सिनेमा, औद्योगिक प्रगति वगैरे अनेक प्रवाह डोळ्यांखालून घालण्याची उचापत करतांना, एखाद्याची लेखणी कितीहि साळसूद असली तरी तिच्याकडून अजाणतां कांहीं प्रमाद घडणें अशक्य नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत ठेवून मी ज्या भावनेनें आणि हेतूनें आजचा आढावा वाचकांना सादर करीत आहें, त्या भावनेकडे

आणि हेतूकडे वाचकांनीं उदार अंतःकरणानें लक्ष द्यावें अशी माझी त्यांना नम्र विनंति आहे.

* * *

कॉंग्रेस-सरकारच्या तडाख्यांत मुंबई प्रांत गेल्यापासून, विरोधी पक्षांची आणि वर्तमानपत्रांची टीका जमेस धरूनहि, त्या सरकारनें आपल्याकडून प्रामाणिकपणानें राज्यशकट हांकण्याची पराकाष्ठा केली हें कोणालाहि मान्य करावें लागेल. मर्यादित अधिकार-क्षेत्रांत अमर्याद सुधारणा घडवून रामराज्य स्थापन करणें हें आजच्या परिस्थितींत खुद्द श्रीप्रभु रामचंद्रालाहि शक्य झालें नसतें. वृत्तपत्रांच्या बाबतींत काळ्या कायद्याचा कलंकित आश्रय आणि गेल्या सत्तावीस महिन्यांत झालेले गोळीबार यांसारख्या दुर्दैवी घटना घडल्या नसत्या तर टीकेसाठीं वळवळणाऱ्या विरोधी पक्षांनासुद्धां आनंद झाला असता. गोळीबाराच्या बाबतींत न्याय-देवतेनें अखेरचा निकाल दिला असल्यानें, इतिहासजमा झालेल्या त्या रक्तलांछित घटनेवरील खपली आज काढणें सदभिरुचीला धरून होणार नाहीं. वृत्तपत्रांच्या बाबतींत यापुढें कोणत्याहि सरकारनें जादा कायद्यांचा आश्रय घेण्याचा मोह आवरता घ्यावा. राजकारणांतील हे जवळचे मार्ग (Short cuts) जरी राजमान्य आणि सहजसाध्य वाटत असले तरी असल्या पाऊल वाटेनें जाण्यांत जनतेच्या नागरिकस्वातंत्र्याला पायबंदच बसतो याची जाणीव सर्वांनीं मनांत बाळगावी.

* * *

गेल्या ऑगस्टमध्यें कॉंग्रेस-सरकारनें मुंबईत संपूर्ण दारूबंदी सुरू केली. सरकारचा हा प्रयोग यशस्वी होणार नाहीं अशी अनेकां-प्रमाणेंच मलाहि भीति वाटत होती. जी गोष्ट अमेरिकेलाहि करतां

आली नाहीं ती कॉंग्रेस सरकारला साध्य होणार नाहीं असें मला वाटलें. परंतु ही अत्यंत कठीण कामगिरी उत्कृष्ट रीतीनें पार पाडल्या-बद्दल मी खेरमंत्रिमंडळाचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. सध्यांची लढाईची धामधूम नसती तर या यशस्वी प्रयोगाला सर्व जगाचें प्रशस्तिपत्र मिळालें असतें. गेल्या ऑगस्टपासून, मी खाऊन 'पिऊन' सुखी आहें असें मामुली माणसाला म्हणण्याची सोय उरली नाहीं. गरिबगुरिबांचें अकल्याण करणारी मदिरा, कल्याणला पिण्याची सोय असली तरी इतक्या लांब जाणें साधारण माणसाला नेहमीं शक्य नसल्यानें हा यशस्वी प्रयोग ढांसळून पडण्याची फारशी भीति नाहीं. पारशी समाजाचा भयंकर विरोध सहन करूनहि डॉ. गिल्डर यांनीं दारूबंदीच्या बाबतींत जें असामान्य धैर्य दाखविलें त्याबद्दल मुंबईतील लाखों दीनदुबळे कॉंग्रेस-सरकारला आणि विशेषतः डॉ. गिल्डरना मनापासून दुवा देत असतील. कॉंग्रेसच्या राजवटींतील हा फार मोठा विजय होय असें मला वाटतें.

* * *

दारूबंदीचा मोका साधून, आमच्या या मुंबईत साहित्य आणि चित्रकला यांवर दिवसाढवळ्या राजरोस अत्याचार घडले आणि अनत्याचारी कॉंग्रेस-सरकारनें ते सर्व उघड्या डोळ्यांनीं पाहिले. सरकारच्या प्रसिद्धिखात्याकडून दारूबंदीबद्दल जीं चित्रें (?) प्रसिद्ध करण्यांत आलीं तीं पाहूनच अनेक अट्टल दारुडेसुद्धां गर्भगळित झाले असतील. अनंतराव गद्रे यांच्या 'अध्यक्षतेखालीं' आजपर्यंत जीं निर्बुद्ध चित्रें प्रसिद्ध झालीं त्या सर्वांना चीत मारील असें एकेक चित्र कॉंग्रेस-सरकारच्या प्रसिद्धि-खात्यानें लाचार लोकांवर भिरकावून दिलें. कॉंग्रेस-सरकार, दारूबंदी-समिति आणि प्रसिद्धि-खातें यांच्यांत सौंदर्यदृष्टि आणि विनोद यांचा इतका दुष्काळ असेल असें

मला वाटलें नव्हतें. ही पर्वणी साधून लहान मुलांमुलींनीं सुद्धां इतकें लेखन केलें, कीं एखाद्या रिकामटेकड्या टीकाकारानें दारूबंदी-साहित्य ' चाळून ' पाहण्याचें ठरविलें असतें तर त्यांत वळवळणारे शेकडों ' पोरकिडे ' त्याला सांपडणें अशक्य नव्हतें. अशा सर्व मार्गांनीं पिणाऱ्या प्रजेला कॉंग्रेस-सरकारनें सळो कां पळो करून सोडल्यावर पट्टीच्या पिणाऱ्यांना सुद्धां ' एकच प्याला ' झोकून वेडेवाकडे खेळ खेळण्यास आवेश तरी येणार कसा ?

* * *

नॅशनल प्लॅनिंग कमिटी नेमून हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति कशी करतां येईल या प्रश्नाबाबतहि कॉंग्रेस-सरकारचें धोरण फार महत्त्वाचें होतें. परंतु एकंदर कार्यपद्धति पाहिली म्हणजे औद्योगिक प्रगतीचें सर्वसंमत धोरण ठरण्यास फार काळ लोटेल असें वाटतें. आतां तर हें भिजत घोंगडें नवीन परिस्थितींत कुणी हाताळील कीं नाहीं हा सुद्धां प्रश्नच आहे. महायुद्धाचा फायदा घेऊन निदान महाराष्ट्रांतील उद्योगधंद्यांची प्रगति करावी या हेतूनें प्रो. काळे, केसरीचे आ. रा. भट वगैरे पुण्यांतील कांहीं लोक त्या दिशेनें प्रयत्न करीत आहेत. महाराष्ट्रांतील कारखानदारांकडून सूचना आल्यानंतर त्या दृष्टीनें भटांचा 'आरा' खडा योग्य वेळीं जाहीर होईलच. परंतु तोंपर्यंत तरी पुण्याचे दक्षिणी एफ. ई. दिनशा म्हणून भटांचें चरित्र किर्लोस्कर, झारापकर आणि प्रावीण्य या मासिकांत येणार नाहीं अशी मला आशा आहे. भटांच्या रिपोर्टो-नंतर शिवाजी टिळकांच्या पुण्याईवर गुजराण करणाऱ्या महाराष्ट्रांत उद्योगधंदे करणारे जे उद्योगी लोक आहेत त्यांचीं नांवें तरी जनतेला कळतील.

* * *

प्राण्याचें कातडें माझ्या वहाणांसाठीं वापरलें होतें तो हिंदुमहासभेचा मेंबर असून त्यानें मेल्यानंतरहि कॉंग्रेसवर असा सूड घेतला असल्यास नकळे !

*　　　*　　　*

हिंदुमहासभेचें गेल्या वर्षातील कार्य फारच उज्ज्वल होतें. उत्कृष्ट वक्तृत्व आणि कार्याची तळमळ या तात्या सावरकरांच्या गुणांनींच हिंदु महासभेचा व्याप भारतांत वाढला. भागानगरचा सत्याग्रह म्हणजे तात्यांच्या टोपींतला अत्यंत मानाचा तुरा होय. कॉंग्रेसच्या मदतीशिवाय हा लढा चालून उभय पक्षांना मान्य असा त्याचा शेवट झाला. पोलंड, स्पेन आणि चीन यांच्याबद्दल सहानुभूतीचे अश्रु गाळणाऱ्या कॉंग्रेसला भागानगरच्या हिंदूंबद्दल मात्र मायेचे पाझर फुटले नाहींत, हें पाहून 'कॉंग्रेस मुसलमानधार्जिणी आहे ' या तिच्यावरील आरोपाला साहजिकच पुष्टि मिळते. राजकोटला पणाला लावलेल्या पुण्याईचा एक शतांश भाग जरी भागानगरसाठीं महात्माजींनीं वहाल केला असता तरी तेथील बहुसंख्य हिंदूंना कांहींतरी जास्त हक्क मिळाले असते. भागानगरच्या ' सुधारणा ' पाहून तात्या जरी कितीहि खूष झाले असले तरी जिभल्या चाटण्यासारखें त्यांच्यांत कांहींच नाहीं, हें सूर्यप्रकाशाइतकें उघड सत्य होय. दंतवैद्य, बाबा आणि शीख शरीररक्षक यांना चुकवून ' नागरिक'चा घरचा अहेर तात्यांप्रत प्रविष्ट झाला असेल अशी मला आशा आहे.

*　　　*　　　*

भागानगरच्या सत्याग्रहावरून कॉंग्रेस आणि महासभा यांच्या कार्यपद्धतींतला एक ठळक फरक नजरेंत भरतो. कोणत्याहि लढ्याचे प्रसंगीं कॉंग्रेसचे पुढारी आधीं तुरुंगांत जातात. पण महासभेच्या

पुढाऱ्यांकडून भोळ्याभाबड्या सत्याग्रहींना प्रेमाचा कोरडा आशीर्वाद देण्यापलीकडे फारसा पराक्रम झालेला दिसत नाहीं. 'Come on, boys' हें कॉंग्रेसचें ब्रीदवाक्य तर 'Go on, boys' हा महासभेचा महामंत्र! पूर्वायुष्यांत कष्ट उपसल्यानें तात्या आणि बाबा हे सत्याग्रहाला गेले नाहींत, याबद्दल मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. पण दंतवैद्यांची मजल केळुसकर पथापलीकडे कां गेली नाहीं हें मला समजत नाहीं. डॉ. मुंजे, मसूरकर महाराज वगैरे पुढारी मागें कां राहिले? म्हणूनच अण्णासाहेब भोपटकर, धोंडूमामा साठे, अनंतराव गद्रे वगैरे लोकांचें मला जास्त महत्त्व वाटतें. महासभेच्या बाबतींत 'जो मागें रहतो तो पुढारी' अशी पुढारी या शब्दाची व्याख्या एखाद्या कॉंग्रेस पत्रानें केली तर तात्या सावरकरांना ती मान्य होईल असें मला वाटत नाहीं. कार्यकर्त्यांना निरोप देणारे लोक शेवटीं कार्याचाच निरोप घेतात कीं काय हें पुढें दिसेलच.

* * *

महासभेच्या इतर कांहीं गोष्टीसुद्धां जरा चमत्कारिकच वाटतात. तिच्या जादा उत्साही तरुणांची कार्यपद्धति पाहिली म्हणजे पांढरी गांधी टोपी ज्याप्रमाणें महाराष्ट्राला आज डोईजड झाली आहे त्याच प्रमाणें महासभेची भगवी टोपीसुद्धां कालांतरानें शिरजोर होईल कीं काय अशी सकारण भीति अनेकांना आज वाटते आहे. कॉंग्रेसचे लोक ज्या अट्टाहासानें महात्माजींना (कदाचित् त्यांच्या इच्छेविरुद्ध) विभूतिपदावर चढवीत आहेत तोच महासभावाल्यांचाहि आग्रह तात्यांच्या बाबतींत पाहून, बहुजनसमाजाच्या भावनेबरोबर त्याची बुद्धिमत्ताहि पुढाऱ्यांकडे गहाण राहणार कीं काय अशी शंका येऊं लागते. स्वतःची किंवा आपल्या प्रतिमेची मिरवणूक काढूं देणें हा

प्रचारासाठीं अप्रतिम उपाय असला तरी अखेरीला प्रत्यक्ष कार्यासाठीं त्याचा फारसा उपयोग होत असेलसें मला वाटत नाहीं. पुढाऱ्यांची जयंति म्हणजे भक्तांच्या स्वतंत्र बुद्धिमत्तेची मयंति होय. कांहीं दिवसांपूर्वी दादरला ' विनायक नगर ' बनविण्याचा कांहीं लोकांनीं घाट घातला होता हें तात्यांच्या कानावर गेलें असेलच. Dr. Ambedkar also to note this, please.

*　　　*　　　*

महाराष्ट्राच्या राजकारणांतील एका अपूर्व प्रकरणाचा येथें उल्लेख करणें अपरिहार्य आहे. प्रसंग बडा बाका होता. पुण्यांतील गेस्ट हाउसमध्यें राजकारणी लोकांची एक मेजवानी होती. बिचारे तात्या केळकरहि तेथें उपस्थित होते. वल्लभभाई पटेल आणि तात्यांची दृष्टादृष्ट होतांच दोघांनाहि प्रेमाचें भरतें आलें आणि त्यांनीं सर्वांसमोर एकमेकांना चक्क मिठी मारली. रमणी वल्लभाची मिठी, मिठी असते ( असें म्हणतात. ); पण तात्या-वल्लभाची ही मिठी कशी होती हें त्यांच्याशिवाय इतरांना कळणें शक्य नाहीं. या प्रकारानंतर तात्यांनीं ' नारसिंह ' अवतार धारण केला नाहीं, यावरून वल्लभभाईनीं केलेला अतिप्रसंग तात्यांना मानवला असावा असें समजायला हरकत नाहीं. बाकी जहाल राजकारणाचा इतक्या जवळून आणि ' कडकडून ' अभ्यास करण्याचा तात्यांच्या आयुष्यांतील हा पहिलाच प्रसंग असावा. वरील प्रकारावरून कॉंग्रेसवाले एकंदरीनें विश्वास ठेवण्यास पात्र नसतात, असें डेमोक्रॅटिक स्वराज्य पार्टीच्या लोकांना वाटतें तें उगीच नाहीं. असले प्रसंग अंगावर आले म्हणजे मनांत असूनहि, राजकारणांतून अंग काढणें तात्यांना कसें शक्य होत नाहीं हें दिसतें.

*　　　*　　　*

मुसलमानांची गेल्या वर्षातील कामगिरी पाहिली म्हणजे मन निराशेनें व्याप्त होतें. हिंदुस्थान जसा हिंदूंचा तसा तो मुसलमान, अस्पृश्य, ख्रिस्ती, शीख, पारशी, यहुदी आणि इतर ज्ञातींचाहि आहे. सर्वांना योग्य तो न्याय मिळावा अशीच प्रत्येक प्रामाणिक हिंदी माणसाची इच्छा आहे. आपसांतील झगडे राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गातील अडथळे आहेत हें न समजण्याइतके जिना खासच दूध-खुळे नाहींत. परंतु वीस वर्षांपूर्वीची त्यांची राष्ट्रीय वृत्ति जाऊन तिची जागा आज ज्ञातिप्रेमानें घेतली आहे. कॉंग्रेस हाउसच्या शेजारीं असलेल्या जिना हॉलच्या दगडांना वाचा असती तर जिनांच्या त्या वेळच्या राष्ट्रीय वृत्तीची साक्ष त्यांनीं आज दिली असती. जिनांचें अंतःकरण आज न्यायासाठीं खरोखरच तळमळत असेल तर हैदराबादच्या बहुसंख्य हिंदूंना न्याय मिळावा अशी खटपट ते कां करीत नाहींत ? हिंदुस्थानचा प्रश्न मुसलमान म्हणून न सोडवितां तो त्यांनीं हिंदी म्हणून सोडविण्यास मदत केली तर डोमिनिअन स्टेटस आज आम्हांला मिळेल—त्यासाठीं भिक्षा मागावी लागणार नाहीं.

* * *

हिंदुस्थानच्या राजकारणाच्या पेठेंत 'फॉरवर्ड ब्लॉक' या चीजेला खूप मागणी असून या शेअरचा भाव सारखा वाढतो आहे. हाय कमांडच्या शासनाला बळी पडलेले बरेचसे लोक यांत आहेत. तरीपण हायकमांडच्या आज्ञेनें डॉ. खऱ्यांचा बळी विनतक्रार घेणारे सुभाषबाबू स्वत:वर बेतल्यावर मात्र न्यायनीतीच्या बाता मारून स्वतंत्र मार्ग कसे काढते झाले हें पाहून मजा वाटते. अलमगिराच्या भाषेंत सांगायचें म्हणजे ' बोंगालचा ' हा ' रसगुल्ला ' पुढेंमागें रुचिहीन झाला नाहीं म्हणजे मिळविली. परंतु आपले बोसबाबू

डॉ. खऱ्यांप्रमाणें ' हे ' नसल्यानें सुभाषबाबूंच्या फॉरवर्ड ब्लॉकनें सर्व हिंदुस्थानांत खूपच प्रगति केली. या चळवळीमुळें हाय कमांडच्या तडाख्यांत सांपडलेल्या काँग्रेसच्या बोथट राजकारणास धार लागण्यास मदत होईल. तसेंच शिस्तभंगाबद्दल इतरांना शासन करण्यांत तरबेज झालेली ' हाय कमांड ' स्वतःसुद्धा थोडीफार शिस्त शिकेल, हा या नवीन चळवळीचा फायदाच आहे. या चळवळीनें काँग्रेसचा जोम कमी न होतां तो खात्रीनें वाढेल हें मात्र गांधीविरोधी आणि सुभाषधार्जिणी वृत्तपत्रांनीं लक्षांत ठेवावें.

* * *

पुण्यांतील साठ्यांचा चौदा दिवसांचा उपवास आणि सेनापति बापटांची ( न झालेली ) जलसमाधि यांचाहि उडता उल्लेख करणें अवश्य आहे. चौदा दिवसांच्या उपवासानंतर त्याचा उपयोग काँग्रेस मंत्रिमंडळाच्या अंतःशुद्धीपेक्षां स्वतःच्या शरीरशुद्धीकडेच अधिक झाला हें साठ्यांना आतां तरी पटलें असेल. सेनापति बापटांनीं जलसमाधीचा आपला बेत बदलला म्हणून अखिल महाराष्ट्राला त्या वेळीं हायसें वाटलें. सेनापतींसारखीं नररत्नें महाराष्ट्रांत फार नाहींत व म्हणूनच आम्हांला त्या प्रामाणिक कार्यकर्त्याबद्दल आपलेपणा वाटतो. या गडबडींत देशदास रानड्यांचा अग्निकाष्ठ भक्षण करून ' सती ' जाण्याचा योग टळला हेंहि बरेंच झालें. पुण्यांतील राजकारणाच्या रंगभूमीवरील देशदास हें विनोदी पात्र असल्यानें त्यांना वाटेल तें क्षम्य आहे. उपवास, जलसमाधि आणि अग्निकाष्ठभक्षण वगैरे आततायी मार्ग व्यवहारी महाराष्ट्राला एकंदरीनें मान्य नाहींत ही समाधानाची गोष्ट आहे. जें काय करायचें तें भरल्या पोटानें करावें. महात्मा लोकांचे मार्ग वेगळे—आणि आम्हा पामरांचे मार्ग वेगळे.

* * *

खिलाडू वृत्तीचें सर्वांशीं वागणें आणि नवीन होतकरू कार्यकर्ते निर्माण करणें हीं पुढाऱ्यांचीं महत्त्वाचीं कामें आहेत. या बाबतींत जम्नादास मेथा, एस. सी. जोशी, एन्. एम्. जोशी, मद्रासचे गिरी आणि सगळे भाई पुढारी यांच्याबद्दल मला फार आदर वाटतो. 'हलो कोल्हटकर, ठीक आहेना?' असें म्हणून जम्नादास माझ्याशीं हस्तांदोलन करण्यास पुढें येतील तर 'काय कॉमरेड, करतां काय आजकाल?' असें म्हणून जोशीबुवा एक सिगारेट ओढून प्रसन्नपणें हंसतील. जोगळेकर किंवा निमकर भेटले तर आपलेपणानें पाठीवर इतक्या जोरानें थाप मारतील, कीं त्यांच्या या 'घोपट' मार्गी प्रेमाचें स्मरण कांहीं काल तरी इतरांना राहील. तात्यासाहेब केळकर कितीहि कामांत असले तरी, भेटीला आलेल्या मनुष्यास साधारणपणें विन्मुख पाठवायचे नाहींत. माझ्यासारख्या अगदीं सामान्य माणसाशीं वरील पुढाऱ्यांचें हें वर्तन असतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. याच्या उलट आमचे हिंदु-राष्ट्रपति, स्वातंत्र्यवीर वगैरे वगैरे सावरकर. दंतवैद्यांकडून पासपोर्ट घेऊन त्यांच्या शरीररक्षकाच्या 'पंजाब' प्रकरणांतून त्यांची भेट घेण्यांतच मनुष्य अर्धाअधिक निरुत्साही होतो. सुज्ञांस अधिक सांगणें नलगे.

* * *

गेल्या वर्षी नियतकालिकांच्या सृष्टींत बरीच घडामोड झाली. जोश्यांचें 'भारत' सुरू झाल्यावर कांहीं कालानंतर तटणिसांचें 'नागरिक' सुरू झालें. तटणिसांसारखा नामवंत, अनुभवी आणि खंदा संपादक असल्यावर नागरिक लोकप्रिय झाल्यास नवल नाहीं. त्या पत्राची धडाडी आणि ध्येयनिष्ठा लक्षांत घेतली म्हणजे या पत्राचा दरारा विविधवृत्ताइतका होण्यास वेळ लागणार नाहीं.

' सावधान ' साप्ताहिकानें कांहीं महिने आपलें तेजस्वी जीवन जगून तूर्त तरी विश्रांति घेतली आहे. उत्कृष्ट मराठी भाषा॰ वाचणारांची सावधानच्या विरहामुळें मुष्कील होत असेल! ताज्या बातम्यांसाठीं शिळीं पत्रें आणि लेखणीऐवजीं कात्री इतक्या भांडवलावर दैनिकें निघण्याचा चमत्कार लढाईपासून मुंबईंत दररोज घडूं लागला आहे. दारूबंदीपासून ' संध्याकाळ ' पत्र सुरू झालें. पुण्यांतील Servant of India बंद पडलें आणि आतां ' मराठा ' हें एकच 'इंग्रजी' पत्र पुण्यांत आहे. दा. न. शिखरे यांचें ' अग्रणी ' नांवाचें साप्ताहिक निघूं लागलें असून तें कीर्तीचें शिखर केव्हां तरी गांठील असें वाटतें. बाकी शिखऱ्यांनीं आपल्या पत्राला 'शिखरणी' हें नांव कां दिलें नाहीं याची पंचाईत कांहीं लोक करीत आहेत.

* * *

मामा वरेरकरांचें ' पूर्णिमा ' साप्ताहिक गेल्या महिन्यांत सुरू झालें. मामा जरी कॉंग्रेसभक्त असले तरी ' तुम लढो–हम कपडे समालते हैं ' अशा स्वरूपाची त्यांची देशसेवा असल्यानें त्यांची मजल तुरुंगाच्या दारांतसुद्धां आजवर गेली नाहीं. आजपर्यंतचे अंक पाहतां आणि मामांचें मराठी साहित्यांतील स्थान लक्षांत घेतां पूर्णिमा पत्र वाचनीय होण्यास हरकत नाहीं. सगळ्या अभिरुचींच्या वाचकांची सोय व्हावी म्हणूनच कदाचित् कांहीं शिवीगाळ आणि कांहीं निर्बुद्ध मजकूर अशी धोरणी व दूरदर्शीपणाची योजना मामांनीं केली असल्यास सांगवत नाहीं. ' चित्रां'तून काणेकर, रांगणेकर गेले असूनहि त्या पत्राचा दर्जा व लोकप्रियता कमी झाली नाहीं हें दत्तु बांदेकर यांना भूषणावह आहे. या निमित्तानें कां होईना, पण एक झांकलें माणिक प्रसिद्धीला आलें यांत शंका नाहीं. ' प्रमोद ' नें ' आशा ' पत्रांत कायाप्रवेश केला असून सध्यां काणेकर हे एकटेच

संपादक म्हणून काम करीत आहेत. महासभेची मुजोरी करायला अनंतराव गद्रे एक मुखपत्र काढणार असें ऐकून वाचकवर्ग हवाल-दील झाला आहे. ईश्वर गरीब बिचाऱ्या वाचकांचें रक्षण करो !

* * *

मुंबईतील चष्म्यांचे प्रसिद्ध व्यापारी व माझे स्नेहि अण्णासाहेब शिंदे यांनीं महाराष्ट्राची दृष्टि सुधारण्यासाठीं ' नयन ' या नांवाचें मासिक सुरू केलें आहे. असा प्रयत्न फार वर्षांपूर्वी 'ज्ञानांजन' काढून आजगांवकर यांनीं केला होता. पण जनतेचे डोळे उघडण्या-पूर्वींच या मासिकानें डोळे मिटले. परंतु अण्णांची दृष्टि आजगांवकरांप्रमाणें अंतश्चक्षूंकडे नसल्यानें ग्राहकांचा आजचा आश्रय असाच चालू राहिला तर अण्णांच्या ' शिंदेशाहीं'त 'नयना'ला दगाफटका होईल असें वाटत नाहीं. झारापकर संस्थेनें 'झारापकर' मासिक काढलें असून जाहिरातीच्या अडगळींतूनहि चांगला मजकूर वाचकांना आढळतो. 'किर्लोस्कर' मासिकाची निर्बुद्ध नक्कल करणें हें या मासिकाचें ध्येय असावें. कव्हरासाठीं तीन-रंगी चित्रांचा खर्च करूनहि उत्कृष्ट कलावंतांचीं चित्रें झारापकर मासिकावर कां येत नाहींत हें शंकरराव किर्लोस्करच जाणतात. पुण्यांत मनोहर केळकरांनीं ' वाङ्मयशोभा ' नांवाचें चिमुकलें पण उत्तम मासिक चालविलें आहे. कांहीं अंक पाहतां यांतील प्रत्येक पान वाचनीय आहे. पहिल्यापासून जोड अंकाचें दुखणें जडलेली 'संजीवनी'सद्धां खलास झाली आहे. सुदैव वाचकांचें !

* * *

माझ्यासारख्या भिकारी लोकांनीं मासिकें काढण्यापेक्षां धंदेवाल्या लोकांनीं असले धंदे करणें जास्त चांगलें. परंतु हें वेड फार पसरणार नाहीं याची मात्र काळजी घ्यायला हवी—नाहींतर

पुण्यांतील एखाद्या लाकडाच्या 'टालवाल्याला' स्वर्गाइतकें उच्च ध्येय समोर ठेवून 'ओंकारेश्वर' या नांवाचें मासिक काढण्याची लहर यावयाची. बाकी असें एखादें मासिक निघालें तर पारमार्थिक साहित्य-सेवकांची ओंकारेश्वरीं (म्हणजे त्या नांवाच्या मासिकांत) चांगली सोय होण्यास हरकत नाहीं. मटन-मार्तंड मुंज्यांच्या एखाद्या सात्त्विक शिष्यानें 'मुरगी' नांवाचें मासिक काढलें तर संस्कृतीच्या प्रत्येक प्रश्नावर 'हमारे मुरगीकू एकी टांग' या नांवाची लेखमाला लिहिण्यास कृष्णराव मराठ्यांना चांगलाच चेव येईल. वांद्र्याच्या एका खाटकानें 'बोकड' नांवाचें मासिक काढलें तर अण्णासाहेब भोपटकरांच्या पैलवानी शिष्यांना आपलेपणानें लिहिण्यास एक हक्काचें ठिकाण होईल. बोकड मासिकाचा स्त्री-विभाग महात्मा गांधींच्या शेळीकडे सोंपविला तर कुरूप देशसेविकांना साहित्यसेवा करायला एक नवें कुरण मोकळें होईल. अहिंसेचें तत्त्व प्रसृत करायला खाटकासारखा अधिकारी पुरुष शोधूनहि मिळणें कठीण आहे.

* * *

कांहीं दिवसांपूर्वी पुण्यांतील सरदार रास्त्यांचा लाडक्या मोराला देवाज्ञा झाल्याची 'त्रिकाळ' पत्रांतील 'सचौकट' बातमी वाचून मला फार वाईट वाटलें! सुप्रसिद्ध मयूर-सिंहासनाच्या मोरांशीं किंवा कुठल्याशा काळीं 'चोरावर मोर' झालेल्या मोराशीं आमच्या या हुतात्मा मोराचें नातें होतें कीं काय, या प्रश्नावर भारत इतिहास संशोधक मंडळ प्रकाश पाडण्यास पुढें येईल अशी मला आशा आहे. या मोराच्या अकालीं निधनाबद्दल त्याची प्रेयसी आज दुःखाश्रू गाळीत बसली असेल. सरस्वतीचा आणि मोराचा ऋणानुबंध लक्षांत घेतां, पुण्यांतील शारदामंदिर, मयूरमंडळ आणि

सरस्वती सिनेटोन या तीन संस्थांनीं दुखवट्याची सभा भरवायला हवी. दरम्यानच्या काळांत कुणीतरी कवडा आमच्या या कैलास-वासी ' मोरोपंतावर ' शोकरसप्रधान केकावली रचून मराठी वाच-कांना सादर करायला धांवून येईलच. जगरहाटीकडे लक्ष देऊन सरदार रास्त्यांनीं आलेल्या दारुण प्रसंगाला धैर्यानें तोंड द्यावें अशी माझी सरदारसाहेबांना नम्र विनंति आहे. रास्त्यांवर आलेल्या या प्रसंगांत उभा महाराष्ट्र सामील आहे हें रास्तच आहे. मृत मोराच्या आत्म्याला ईश्वर शांति देवो ! तथास्तु.

* * *

सिनेमा-सृष्टींत 'हंस'च्या 'ब्रह्मचारी' बोलपटानें खूपच पराक्रम केला. या बोलपटाचें श्रेय अत्रे, मीनाक्षी, दामुअण्णा, पांडुरंग नाईक आणि विनायक यांनाच आहे. इतकी उत्कृष्ट पटकथा खुद्द अत्रे सुद्धां यापुढें लिहूं शकतील कीं नाहीं कोण जाणे ! या चित्रांत मिनाक्षी पहिल्यानेंच पडद्यावर आली आणि आपल्या सहजसुंदर अभिनयानें तिनें अपूर्व कीर्ति आणि लोकप्रियता मिळविली. आपल्या सौंदर्याचा ' तोंडी ' पुरावा मीनाक्षीला देतां आला नाहीं तरी बुद्धिमत्ता, महत्त्वाकांक्षा, ध्येयनिष्ठा आणि ' कष्ट करा ' हा मंत्र अंमलांत आणण्याची तिची तयारी या सर्व गुणांनींच ही गुणी नटी आपलें मानाचें स्थान यापुढें कायम राखील. दामुअण्णा तर महाराष्ट्राचे अत्यंत लाडके विनोदी नट झाले आहेत. महाराष्ट्राचे चार्ली चॅपलिन म्हणून त्यांचा गौरव कुणीं केला तर त्यांत फारशी अतिशयोक्ति होईल असें मला वाटत नाहीं. मात्र दामुअण्णांसारखा मोहरा फालतु कामांत खर्ची घालूं नये, असें हंसचा ' सुखाचा शोध ' हा बोलपट पाहून वाटतें.

माझ्या ह्या सूचनेचा हंसचे चालक जरूर विचार करतील अशी मला आशा आहे.

* * *

'ब्रॅण्डीच्या बाटली'पेक्षां त्या बोलपटावरील सेन्सॉरच्या संस्कारामुळेंच तो बोलपट गाजला. कृष्णराव मराठ्यांची तकलीफ यापूर्वी साहित्यसंमेलनापुरतीच मर्यादित होती. पण या गृहस्थाचे पराक्रम बोलपट-सृष्टींतहि सुरू झाल्यानें मला जरा धास्तीच वाटूं लागली आहे. वास्तविक मराठ्यांनीं विनाकारण पावित्र्यविडंबनाचा आरोप ज्या भागांवर केला त्यांत कांहींच अर्थ नाहीं. कापलेल्या भागांत पावित्र्यविडंबन किंवा अश्लीलता कुठेंच नाहीं—फार काय, पण ब्रॅण्डीची बाटली या अत्यंत सामान्य चित्रांत कापलेला भागच चित्तवेधक आणि सात्त्विक आनंद देणारा असा होता. तो भाग कापून निर्बुद्ध सेन्सॉरनें कलेचा अपमान मात्र केला आहे. कृष्णरावांचा संचार सिनेमासृष्टींत असाच चालला तर मात्र आफत आहे खरी. शिवाजी आखाड्यांतील अत्र्यांच्या पंचवीस हजारांच्या प्रचंड सभेनें सेन्सॉर आणि कृष्णराव मराठे यांना उत्तर दिल्यावरहि कापलेला भाग पुन्हां दाखविण्याची परवानगी सरकारनें देऊं नये हा निव्वळ जुलूम आहे. सत्तेपुढें शहाणपण नाहीं हेंच खरें.

* * *

या दुर्दैवी घटनेंतूनच अत्रे-माटे वाद निर्माण झाला. मला प्रो. माट्यांबद्दल अत्यंत आदर असल्यानें त्यांनीं कृष्णरावांचें वकीलपत्र विनाकारण घेतलें असें मला वाटतें. या वादांत दोन्ही बाजूंचे गडी आपापल्या प्रामाणिक तत्त्वासाठीं लढत होते. परंतु हा वाद इतका रंगला नसता तरी चालण्यासारखें होतें. या निमित्तानें पुणेंकरांना दोन उत्कृष्ट वक्त्यांचीं भाषणें ऐकायला मिळालीं आणि

स. लि. ८८०



(हंशा आणि टाळ्यांसकट) सर्व 'रपोट' ज्ञानप्रकाशमध्यें आल्यानें तें पत्र कांहीं कालपर्यंत तरी वाचनीय झालें. अन्यांना पदवीधरांची विनंति, मास्यांना बिनपदवीधरांची विनंति वगैरे अस्सल पुणेरी गमती पाहिल्या म्हणजे असल्या गोष्टींत डॉ. र. पु. परांजपे भाग कसे घेऊं शकतात याचें नवल वाटतें. या एकंदर प्रकारावरून पुण्यांतील बेकारीची कल्पना येण्यास हरकत नाहीं. तरी पण क्षुल्लक गोष्टींना यापुढें तरी पुण्यांतील सुज्ञांनीं भलतेंच महत्त्व देऊन आपल्या वक्तृत्वाची आणि ज्ञानाची उधळपट्टी करूं नये असें मला वाटतें. याउपर त्यांची मर्जी.

* * *

गेल्या वर्षीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध झालीं असलीं तरी कागद नासण्यापलीकडे त्यांपैकीं बऱ्याच पुस्तकांची मजल गेली नाहीं. तरीपण फडक्यांची (मनोहरची) 'आकाशवाणी', टेंब्यांचें 'माझा संगीताचा व्यासंग', माडखोलकरांची 'कांता' कादंबरी, डॉ. माधवरावांचें 'नकुलालंकार', घाट्यांचें 'कांहीं म्हातारे आणि एक म्हातारी', गोपीनाथ तळवलकरांचें 'गृहरत्नें' आणि मोट्यांचें 'रणांगण' हीं पुस्तकें विशेष उल्लेखनीय आहेत. टेंब्यांच्या पुस्तकांत कांहीं बदसूर असल्याची तक्रार कांहीं वाचकांची असली तरी संगीताचें इतिहासवजा पुस्तक लिहिण्याची टेंब्यांची लागलेली तार खात्रीनें स्तुतीस पात्र आहे. घाट्यांचे सगळे म्हातारे अजून माझ्याकडे आले नसले तरी संजीवनीच्या पहिल्या जोड अंकाचे वेळीं मीं कांहीं म्हाताऱ्यांच्या तडाख्यांत सांपडलों असतां त्यांची जानपछान होण्यांत मला फार आनंद झाला होता. अशा तऱ्हेचें मराठींत हें एकच आणि अतएव अद्वितीय पुस्तक असल्याचें तें लिहिल्याबद्दल मीं घाट्यांचें अभि-

नंदन करतों. लेखकाच्या थोर दर्जाला साजेशी पुस्तकांची किंमत मात्र सामान्य वाचकांना जास्त आहे हें घाट्यांनीं लक्षांत ठेवावें.

* * *

वास्तविक स्वस्तिक प्रकाशन संस्थेचीं पुस्तकें नीटनेटकीं असून त्यांचें बाह्यांग साधारणपणें चांगलें असतें. परंतु गोपीनाथांच्या 'गृहरत्ना 'वर एखाद्या अंकलिपीचा साज प्रकाशनानें कां चढविला आहे हें मला तरी समजत नाहीं. रत्नांची पुरचुंडी घाणेरड्या कापडाची असते म्हणून कदाचित् साहित्य-सागरांतील या मोत्यांची वासलात प्रकाशकानें अशी लावली असल्यास सांगवत नाहीं. स्वस्तिक चिन्हांकित 'नाझी' अत्याचारापासून 'गृहरत्नां 'तील चिमुकले जीव बचावले असते तर या चिमण्या पुस्तकाकडे वाचकांचें जास्त लक्ष गेलें असतें. 'साभार परत' नांवाचें पुस्तक यशवंत गोपाळ जोशी हे लौकरच प्रसिद्ध करणार असून या अभिनव योजनेबद्दल वाचक त्यांची वाहवा करतील. त्या पुस्तकांतील गोष्टी संपादकांकडून 'साभार परत' कां जाव्यात याचें कोडें उलगडणें मात्र कठिण आहे. जोशीबुवांच्या कांहीं निवडक कथांचें भाषांतर गुजराथी भाषेंत झालें असून लेखकाची ही मुलुखगिरी स्पृहणीय आहे. त्यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' मराठी वाचकांप्रमाणें गुजराथी वाचकांनाहि आवडतील अशी माझी खात्री आहे.

* * *

मुंबई-पुण्यांत वेळोवेळीं भरणाऱ्या चित्रांच्या प्रदर्शनांवरून आमच्या लहानथोर कलावंतांनीं या कलेंत केलेली स्पृहणीय प्रगति लक्षांत येते. परंतु या कलेला राजाश्रय नाहीं आणि लोक गरीब झाल्यानें लोकाश्रयहि म्हणण्यासारखा नाहीं. अशा स्थितींत कलावंतांनीं आपला संसार कसा चालवावयाचा हा प्रश्न पुढें उभा राहतो.

सरकारनें आणि प्रत्येक मोठ्या म्युनिसिपालिटीनें चित्रें विकत घेऊन तीं सार्वजनिक संस्थांतून लावण्याची व्यवस्था केली तर बहुजन-समाजाची सौंदर्यदृष्टि सुधारून चित्रकारांना सुखानें चार घांस मिळण्याची सोय होईल. मुंबई सरकारनें चार-दोन लाख रुपये खर्च केले तर ते खासच सत्कारणीं लागतील. मुंबईच्या म्युनिसिपालिटीला पांच हजार रुपये तरी खर्च करण्यास हरकत नाहीं. पण या दृष्टीनें खुद्द कलावंतांकडूनसुद्धां व्हावा तसा प्रयत्न होत नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. रेडिओमुळें गायनकलेला सरकारची सक्रिय सहानुभूति मिळून कलावंतांना सुखानें जगण्याची सोय झाली आहे हें मनांत आणलें तर चित्रकलेनेंच काय पाप केलें हा प्रश्न उभा राहतो.

* * *

या सर्व गोष्टी बहुजनसमाजाची सौंदर्यदृष्टि सुधारण्यावरच अव-लंबून आहेत. ही दृष्टि सुधारण्यासाठीं रेल्वे स्टेशनवर उत्कृष्ट कला-वंतांचीं चित्रें व पुतळे ठेवण्याची परवानगी रेल्वेनें दिली तर सुंदर कलाकृति लोकांसमोर येतील आणि कांहीं कालानंतर परगांवच्या धनि-कांना त्या कलाकृति विकत घेण्याची इच्छा होईल. मुंबईतील बसेसमध्यें चित्रें टांगून त्या 'सचित्र' झाल्या तर लोकांची सौंदर्यदृष्टि खासच सुधारेल. तसेंच गोव्याच्या आगबोटींतहि कांहीं चित्रें लावणें अशक्य नाहीं. माझ्या या सूचनांचा विचार 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' करील अशी मला आशा आहे. पहिल्यानें चित्रकारांनीं आणि शिल्पकारांनीं आपल्या कलाकृति सार्वजनिक ठिकाणीं मोफत ठेव-ण्यास द्याव्यात. याचा परिणाम अखेरीला जनतेच्या पैशाचा ओघ कलावंतांकडे वळविण्यास होईल असें मला खात्रीनें वाटतें. महा-राष्ट्रांतील संस्थानिकांनींसुद्धां या बाबतींत जरा लक्ष द्यावें अशी

माझी त्यांना विनंति आहे. औन्धचे राजे बाळासाहेब पंत जर पुढाकार घेतील तर महाराष्ट्रांतील चित्रकला जगविण्याचें कार्य त्यांच्या हातून होईल अशी माझी खात्री आहे.

*    *    *

आजगांवकरांचा एकसष्टीचा समारंभहि गेल्या वर्षी थाटानें पार पडला. या बाबतींत आंबेडकर, तटणीस आणि बावडेकर यांनीं पुढाकार घेऊन विशेषतः बावडेकरांच्या अव्याहत खटपटीमुळें आजगांवकरांना दोन हजार रुपये देतां आले याबद्दल मी बावडे-करांचें अभिनंदन करतों. आजगांवकरांसारख्या सनातनी साहित्यि-काच्या गौरवाला आंबेडकरांचा विटाळ व्हावा हा योगहि मराठी साहित्यांत अपूर्व आहे. याच्या उलट आमच्या ब्राह्मणसभेनें अस्पृ-श्यांच्या बाबतींत स्वीकारलेल्या धोरणाचा जो परिणाम झाला आहे त्याकडेहि वाचकांनीं लक्ष द्यावें. अस्पृश्यांना ब्राह्मणसभेचा दरवाजा मोकळा होईपर्यंत प्रत्येकानें त्या सभेवर कडकडीत बहिष्कार घालावा व अशा रीतीनें त्या संस्थेच्या हटवादी कार्यकर्त्यांना वठणीवर आणावें अशी माझी सर्वांना प्रार्थना आहे. हें प्रकरण आतां निकराला आलें असून काण्यांसारख्या आमच्या वंद्य लोकांनीं अस्पृश्यांना न्याय मिळावा म्हणून खटपट•चालविली आहे. राजकीय दृष्टीनें आमचे प्राण चालले असले तरी सनातनी लोकांना त्याचें कांहींच सुतक नाहींसें दिसतें.

*    *    *

रेडिओवर अधिकारवाणीनें बोलण्याचा वास्तविक मला अधि-कार नाहीं. माझ्याकडे रेडिओ नाहीं आणि शेजाऱ्याचा रेडिओ (सुदैवानें) नादुरुस्त असल्यानें, बसल्या बैठकीला होणाऱ्या रेडिओच्या अत्याचारापासून मी या क्षणापर्यंत तरी बचावलों

आहे. (ईश्वरा, बिघडलेला रेडिओ दुरुस्त करून आणण्याची दुर्बुद्धि माझ्या शेजाऱ्याला देऊं नकोस. मी तुझे उपकार आजन्म विसरणार नाहीं.) तरीपण दर्दी लोकांकडून रेडिओला असलेलें दर्द मधून मधून कानावर येतेंच. कांहीं दिवसांपूर्वी संयुक्त प्रांतांतील हिंदी साहित्यसंमेलनांत रेडिओवर हिंदुस्थानीला देण्यांत येत असलेल्या महत्त्वाबद्दल जी तक्रार करण्यांत आली आहे ती अयुक्त नसल्यास रेडिओच्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं तिकडे लक्ष देण्यास हवें. संगीताच्या चहात्यांना सुद्धां उत्तम प्रतीचें संगीत पूर्वीप्रमाणें आकाशवाणीवर ऐकूं येत नाहीं असें माझ्या कानांवर आलें आहे. (म्हैसूरच्या युवराजांच्या पार्टीनें श्रोत्यांचा केलेला साग्र संगीत छळ यांत सामील आहे.) परंतु बुखारींनीं त्यांच्याविरुद्ध झालेली टीका पचविल्यामुळें, यापुढें तक्रार करूनहि फारसा उपयोग होईलसें वाटत नाहीं.

* * *

रेडिओचा उपयोग जाहिरातीसाठीं नाहीं या सर्वसाधारण नियमाचें पालन मात्र इतक्या निर्बुद्ध रीतीनें करण्यांत येतें, कीं त्याबद्दल थोडेसें लिहिलें तर मराठीचे प्रोग्राम-डायरेक्टर माझ्यावर रागावणार नाहींत अशी मला आशा वाटते. आजगांवकरांच्या रेडिओवरील आठवणींत केसरी, सुधारक, ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांचा उल्लेख वारंवार येतो. परंतु त्या पत्रांची जाहिरात होते, या खुळ्या कल्पनेनें त्यांचीं नांवें गाळण्यांत येतात. उपरोक्त पत्रांचे जनक इतके थोर होते, कीं त्यांच्या पुण्याईमुळें केसरी, ज्ञानप्रकाशचीं नांवें रेडिओवर आलीं तर रेडिओचाच उद्धार होईल. केसरी, ज्ञानप्रकाशला प्रसिद्धी देण्याची ऐट मुंबई रेडिओ करूं लागला तर तो प्रकार खासच हास्यास्पद होईल. कोणत्याहि

गोष्टीचा अतिरेक वाईट आहे, ही गोष्ट सूज्ञ डायरेक्टराला मीं सांगावी असें नाहीं. यापुढें हा प्रकार बंद होईल अशी मला आशा आहे. लहान मुलांचे कार्यक्रम अजूनहि 'तिंबूनानां'च्या हातांत असतील तर मला मुलांची कीव येते. या बाबतींत मीं दोन वेळां टीका केली असल्यानें इजा, बिजा आणि तिजा करण्याचा मोह मला आवरलाच पाहिजे.

* * *

लहान मुलांच्या कार्यक्रमावर मीं केलेल्या टीकेमुळें माझ्या हेतू-बद्दल कांहीं लोकांना शंका आली आहे असें माझ्या कानावर आलें आहे. परंतु मला 'तिंबूनाना'चा हेवा अगदींसुद्धां वाटत नाहीं ही गोष्ट त्यांनीं लक्षांत ठेवावी. लहान मुलांच्या कार्यक्रमाबद्दल रेडिओशीं ऐकण्यापलीकडे दुसरा कांहींएक संबंध नसलेल्या चारदोन लोकांनीं मजजवळ तक्रारी केल्या आहेत. रेडिओवर बोलून कीर्ति आणि पैसा मिळविण्याची माझी पात्रता नाहीं हें मला पूर्णपणें माहीत आहे. माझी मर्यादित बुद्धिमत्ता, माझ्यांत असलेला ज्ञानाचा अभाव आणि माझा तऱ्हेवाईक स्वभाव यांमुळें रेडिओशीं माझी पत्रिका जमणें शक्य नसल्यानें तें 'स्थळ' माझ्या आटोक्याबाहेर आहे मी जाणून आहें. उलट इतरांना चान्स मिळावा अशीच माझी प्रवृत्ति असते व त्या दिशेनें प्रोग्राम-डायरे-क्टरांना मी माझ्या दृष्टीनें विधायक सूचनाहि देत आलों आहें. माझ्या टीकेमध्यें अप्रामाणिकपणा किंवा हेवादावा अगदीं नसतो. माझ्या अज्ञानामुळें कदाचित् कठोर टीका होत असली तरी अज्ञान म्हणजे दुष्टपणा नाहीं, हें मी येथें नम्रपणें सांगण्याची परवानगी घेतों.

* * *

मुंबई रेडिओचे मराठी डायरेक्टर मर्ढेकर हे असून ते बुद्धिमान्, विद्वान्, रसिक आणि कार्यदक्ष आहेत. मला समजणार नाहीं असा त्यांनीं कलेवर इंग्रजी प्रबंध लिहिला असून तो एका विलायती प्रकाशकानें प्रसिद्ध केला आहे. प्रो. रानड्यांच्या 'उत्तर वायू'च्या थंड सहवासानें कुडकुडणारा त्यांच्या कवितांचा इवलासा संग्रहहि प्रसिद्ध झालेला आहे. इतका लायक मनुष्य प्रोग्राम-डायरेक्टर असूनहि सर्वांना रुचतील असे कार्यक्रम त्यांना करतां येत नाहींत हा त्यांचा दोष नव्हे. त्यांच्या खुर्चीवर कुणीहि बसला तर त्याची हीच पंचाईत होईल. कामाचा जड बोजा हेंच कारण मुख्य असावें. त्यांच्या माझ्या दहापांच मुलाखती होऊन सुद्धां मर्ढेकर प्रसन्नपणानें हंसल्याचें मला स्मरत नाहीं—इतका कामाचा ताण असल्यावर कुणालाहि हंसणें सुचणार नाहीं. त्यांना कमींत कमी दोन रसिक आणि विनोदबुद्धि असलेले मदतनीस सरकारनें द्यावेत अशी माझी सूचना आहे. हिंदी कार्यक्रम मुंबईहून न करतां उत्तर हिंदुस्थानांतून केले तर हा जादा खर्च भरून येईल. तसेंच प्रथितयश लेखकांची कोंडी फोडून पलीकडे गेल्यास मर्ढेकरांना खासच पश्चात्ताप होणार नाहीं.

*　　　*　　　*

लढाईमुळें यंदा M. C. C. च्या क्रिकेट उत्सवाला मुंबई मुकली असली तरी लवकरच पंचरंगी सामने सुरू होणार आहेत. क्रिकेटचें नांव काढतांच मला लक्ष्मीदास रावजी तेरसी यांची आठवण होते. कॉंग्रेसमध्यें गुरुबाजी बोकाळलेली पाहून लक्ष्मीदासांनीं कॉंग्रेसची रजा घेतली. लक्ष्मीदास म्हणजे उत्साहमूर्ति, त्यागमूर्ति, विनोदमूर्ति. निष्कपट आणि बालकाला साजेशी वृत्ति त्यांच्यांत मरेपर्यंत होती. मरतांनासुद्धां त्यांची खिलाडु वृत्ति दृष्टीस पडली.

ते मृत्युपंथाला लागलेले पाहून डॉक्टर लोक सचिंत झाले. 'पण डॉक्टर, मला खरं सांगा,—मी भीत नाहीं—पण मृत्यु मला लवकरच क्लीन बोल्ड करणार ना?' असे लक्ष्मीदासांचे उद्गार ऐकून भोंवतालचे सर्व लोक थक्क झाले. हिंदुमुसलमानांच्या दंग्यांत हिंदूंना त्यांनीं केलेली मदत हिंदुसमाज कधींच विसरणार नाहीं. लक्ष्मीदास नगरपिते असतांना, त्यांनीं प्रेमळ पित्याप्रमाणें मुंबई-करांची वास्तपुस्त केली. हा थोर गृहस्थ देवाघरीं गेल्यापासून प्रत्येकाला चुकल्याचुकल्यासारखें वाटतें आहे. लक्ष्मीदासांच्या पवित्र स्मृतीला मी आज अत्यंत आदरानें अश्रूंची तिलांजलि देत आहें.

* * *

गेल्या सप्टेंबर महिन्यांत युरोपांत महायुद्ध सुरू झालें. एकाच पिढींतील हें दुसरें महायुद्ध होय. पहिल्या महायुद्धाच्या घोर परिणामापासून जग अजून पुरतें सावरलेंसुद्धां नव्हतें. एका माणसाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेला लाखों, कोट्यवधि निरपराध तरुण मृत्यु-मुखांत जाण्यास आज सज्ज आहेत. एका तोफेनें नुसती जांभई दिली तरी शेंकडों लोक पटापट देवाघरीं घाईघाईनें जातात. प्रत्येक क्षणाला वृद्ध मातेचा मुलगा, तरुण पत्नीचा पति आणि कोमल आणि अजाण अपत्याचा पिता स्वर्गाच्या वाटेवर प्रस्थान ठेवीत असेल. एकाच माणसाच्या लहरीसाठीं मानवसंहार कां व्हावा हा प्रश्न या लढाईनें कायमचा सुटला तरी जगावर उपकार होतील. चीन-जपानचें युद्ध आणि युरोपांतील महायुद्ध यांचा विचार केला तर पूर्व-पश्चिमेच्या संस्कृतीमध्यें कांहींतरी बिघाड झाला आहे कीं काय असें वाटायला लागतें. महात्मा गांधींचें अहिंसेचें तत्त्व सगळ्या जगांत प्रसृत झालें तरच भावी मानवजातीचा तरणोपाय आहे.

परंतु कॉंग्रेसशिवाय अहिंसेचें तत्त्व कुणाला पटेलसें दिसत नाहीं. आज खुद्द हिंदुस्थानांतच त्या तत्त्वाची चेष्टा होते आहे.

* * *

महायुद्धांत इंग्लंडच्या हेतूचा आणि हिंदुस्थानच्या मदतीचा प्रश्न पुढें आला आणि राजीनामे देण्यापर्यंत कॉंग्रेसची मजल कशी गेली हा इतिहास ताजा असल्यानें तो येथें देण्याची आवश्यकता नाहीं. कॉंग्रेसचें धोरण बरोबर आहे हें आज सांगणें कठीण आहे. भावी इतिहासच या प्रश्नावर अधिकारवाणीनें निर्णय देईल. परंतु 'हिंदुस्थानांत आपापसांत तीव्र मतभेद असल्यानें तावडतोब वसाहतीचा दर्जा देणें चुकीचें आहे' हा ब्रिटिश मुत्सद्यांचा युक्तिवाद मात्र घातुक आहे. आजचे आपसांतील तंटे कोणत्या भेदनीतीचीं कटु फळें आहेत हें कोणाला सांगायला हवें असें नाहीं. या निमित्तानें तरी दुर्दैवी भारतांतील सर्व लोक एक होतील अशी माझी खात्री आहे. इंग्लंडच्या अडचणींचा हिंदुस्थाननें फायदा घेऊं नये ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच आपसांतील झगड्यांचा फायदा वसाहतींचा दर्जा देण्यास दिरंगाई करण्यांत इंग्लंडनें घेऊं नये ही गोष्टहि खरी आहे. इंग्लंडला आजच्या अडचणींत हिंदुस्थानचें साहाय्य मिळेल यांत शंका नाहीं. अजूनहि इंग्लंडनें आपली चूक दुरुस्त करून निश्चित अशी नवी घोषणा करावी.

* * *

कॉंग्रेसला टक्कर देऊन तिचा वरचढपणा कमी व्हावा असें इतर पक्षांना वाटत असेल तर कॉंग्रेसला नुसत्या शिव्या देऊन हें काम पार पडणार नाहीं, हें इतर पक्षांनीं आतां तरी ओळखायला हवें. कांहीं अपवाद सोडले तर गेल्या वर्षी महाराष्ट्रांत तरी कॉंग्रेस इतक्या शिव्या दुसऱ्या कोणत्याहि पक्षानें पचविल्या नाहींत. त्यामुळें

गांधीवाद थोडासा खिळखिळा होण्यापलीकडे दुसरें कांहींएक झालें नाहीं. कॉंग्रेसला वठणीवर आणण्यास दोन उपाय आहेत. एक म्हणजे सर्वांनीं कॉंग्रेसमध्यें जाऊन अरेरावी लोकांना हांकून देणें आणि दुसरा म्हणजे इतर सर्व लहानमोठ्या पक्षांनीं एक होऊन मतदार आपल्याकडे खेंचून घेणें, हे होत. या कामीं आज लोकप्रिय नसलेला प्रागतिक पक्ष वगळण्यासारखा नाहीं. कॉंग्रेसमध्यें आज ज्या तोडीचे बुद्धिमान् आणि अभ्यासी लोक आहेत त्या तोडीचे लोक फक्त प्रागतिकांमध्येंच आहेत हें कुणालाहि कबूल करावें लागेल. आज त्या पक्षाचें हंसें होत असलें तरी त्यांच्या प्रामाणिक मदतीनें रडण्याची पाळी कुणावरहि येणार नाहीं हें इतर पक्षांच्या पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

*　　　*　　　*

सावरकर आणि आंबेडकर यांचें लक्ष भरीव कार्यक्रमाकडे नसेल असें मला वाटत नाहीं. अंदमानचें काळें पाणी भाविक भक्तांना पाजून त्यांची पराक्रमश्रवणाची तहान सावरकरांनीं आतांपर्यंत शमविली असल्यानें 'पुढें काय' हा प्रश्न त्यांच्या समोरहि आज असेलच. धर्मांतराची धमकी आंबेडकरांनीं अधूनमधून दिली नाहीं तर मुसलमानांच्या आहारीं जाणारी कॉंग्रेस अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे द्यावें तितकें लक्ष देणार नाहीं असें त्यांना वाटणें शक्य आहे. परंतु आपला स्वार्थ साधण्यासाठीं आंबेडकर देशद्रोही होऊन पारतंत्र्याचे पाश राहूं देण्यांत धन्य मानतील असें कुणींहि समजूं नये. देशसेवेची सोल एजंन्सी फक्त कॉंग्रेसलाच आहे असें मानण्याचें कारण नाहीं. आंबेडकरांचें ज्ञान, राजकारणाचा त्यांचा अभ्यास, प्रामाणिक कार्यतत्परता, बाणेदार स्वभाव, सार्वजनिक धकाधकींत दिसून येणारी त्यांची निर्भय वृत्ति यांकडे लक्ष दिलें तर बाबासाहेब

देशाशीं कधींहि बेमान होणार नाहींत हें त्यांच्या शत्रूलाहि कबूल केलें पाहिजे. फार काय--पण इंग्लंडला एकमुखी मागणी सादर करण्यांत बाबासाहेब यांनींच पुढाकार घेऊन आंवळ्यांची मोट बांधण्यास लागावें.

*　　　*　　　*

महायुद्धाचा फायदा घेऊन दुकानदारांनीं नफेबाजी करण्यास सुरुवात केली. त्यांतल्या त्यांत औषधें विकणाऱ्यांनीं तर माणुसकीच सोडली. मुंबईत बेकारी वाढली आणि लोक दीनवाणे होऊन अन्नुनें दिवस कसे काढतां येतील या फिकीरींत पडले. गेल्या वर्षी मुंबई इलाख्यांत वेड्यांची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे असा सरकारी अहवाल कांहीं दिवसांपूर्वी माझ्या वाचनांत आला. काव्याचा प्रसार हें वेड वाढण्यास कारण आहे कीं नाहीं हें मला ठाऊक नाहीं. पण समाजाची वाढती बेकारी आणि दैन्य यांमुळें शाहण्यांनाहि वेड लागणें शक्य आहे. मी पुष्कळ वेळां माझ्या बिल्डिंगच्या दारांत रस्त्याकडे पाहत असतों. तोंडावर आनंद आणि प्रसन्नपणा असणारे फार थोडे लोक मला दिसतात. स्वतःशीं बडबड आणि हातवारे करणारे कितीतरी दुर्दैवी लोक मुंबईत आहेत! आत्महत्येचें प्रमाणहि वाढत्या प्रमाणांत असावें असें समजण्यास हरकत नाहीं. लढाईमुळें जगणें इतकें अशक्य झालें आहे, कीं माझी जमासुद्धां वरील दुर्दैवी लोकांत होईल कीं काय अशी मला भीति वाटते. समाजाची सहानुभूति आणि मदत मिळणें आज दुरापास्त झालें आहे.

*　　　*　　　*

त्यांतल्या त्यांत मला माझ्या तरुण बंधुभगिनींबद्दल सहानुभूति वाटते आहे. सर्व बिचारे कॉलेजमध्यें शिकतात, ज्ञानसंपन्न होतात,

आणि ...... आयुष्याच्या उंबरठ्यावर निराशेनें उभे राहून भीषण भविष्य कालाकडे सभय दृष्टिक्षेप करतात. माझ्या-सारख्याच्या आयुष्याला किंमत नाहीं—आयुष्याशीं झगडून अपयश मिळालेल्या माझ्यासारख्या माणसाला जगणें–मरणें सारखेंच आहे. पण तरुण पिढी! कोण त्यांचा प्रश्न सोडविणार? त्यांचा त्यांनाच तो सोडवायला हवा. तरुणतरुणींकडे समाज संशयानें पाहत आहे—पण त्यांना मदतीसाठीं सहानुभूतीनें हात पुढें करणारा एकहि महात्मा पुढें येत नाहीं. महाराष्ट्रांत एकमेकांबद्दल प्रेम, विश्वास, आपलेपणा नाहीं. शंकरराव देवांवर उधळून वायां गेलेलीं अंडीं फेंकणाऱ्या तरुणांनीं खाऊन पचविलीं असतीं तर तीं त्यांच्या अंगीं तरी लागलीं असतीं. निदान साधेपणा आणि फालतु खर्चाला पायबंद या गोष्टी तरुण पिढीनें केल्या तरी त्यांचा पुष्कळ फायदा होईल. तसेंच दिवाळीच्या दिवसांत वहीपूजनाच्या मंगल दिवशीं प्रत्येक अर्थानें जमाखर्च ठेवण्याचें तरुण पिढीनें ठरवावें.

* * *

काळ कठीण असला तरी तरुण पिढीनें गोंधळून जाण्यांत अर्थ नाहीं. राजकीय परिस्थिति बदलून गुलामगिरी नष्ट होण्याचीं सुचिन्हें आज दिसत आहेत. भावी काल तरुण पिढीचा आहे. विनोदबुद्धि जागृत ठेवून येणाऱ्या आपत्तीला हंसतमुखानें तोंड द्यायला तरुण पिढी शिकली तर तिचें उज्ज्वल भविष्य कुठेंहि जाणार नाहीं. तरुण-तरुणींबद्दल जुनी पिढी हेटाळणीनें बोलत असली तरी मला आजच्या तरुण-तरुणींबद्दल अभिमान वाटतो. त्यांच्यांत अभिमान आहे; चारित्र्य आहे; देशासाठीं कांहींतरी करावें म्हणून तळमळ आहे. एक गोष्ट मात्र मी तरुण पिढीला

सांगतों. आणि ती हीच, कीं कोणत्याहि माणसाला आपली बुद्धिमत्ता गहाण देऊं नका. तुमच्या बुद्धीच्या भांडवलावर तोतये पुढाऱ्यांना देशभक्तीचा व्यापार करण्याची केव्हांहि संधि देऊं नका. आयुष्याचा आणि पैशाचा हिशेब ठेवण्यास तुम्हीं शिकलांत तर माझ्याप्रमाणें 'हड हड' करून घेण्याचा प्रसंग तुम्हांवर कधींहि येणार नाहीं. योग्य वेळीं आपला आयुष्याचा जोडीदार शोधून सुखानें राहण्याचा प्रयत्न करा. समाजाच्या सहानुभूतीची कधींहि अपेक्षा करूं नका.

* * *

समाजांत व्याख्यान मिळतें, उपदेश मिळतो, पण सहानुभूति मिळत नाहीं. आयुःपथावर मैलांचे चाळीस दगड ओलांडून मी आज हें कटुसत्य शिकलों आहें. तरीपण मी उमेद सोडली नाहीं. केव्हांतरी 'मूर्खपणाच्या' महत्त्वाकांक्षा सफल होतील असा अजूनहि मला विश्वास वाटतो. तरुण बंधुभगिनींनो, भावी कालाचे तुम्ही आधारस्तंभ आहांत. माझ्यासारख्याचा आदर्श, टाळण्यासाठीं स्वतः पुढें ठेवा आणि आपल्या दुर्दैवी देशाला पारतंत्र्यांतून बाहेर पडायला शक्य ती मदत करा. भाऊबीजेच्या दिवशीं वाचक-भगिनींनासुद्धां माझ्यासारखा गरीब भाऊ दुसरी कोणती ओंवाळणी घालणार ? पुढल्या दिवाळीला जगलों वांचलों तर, यापेक्षां आनंद-दायी आढावा घेण्याचें भाग्य मला मिळालें तर मला कितीतरी आनंद होईल. तरुण वाचक बंधुभगिनींनो, ही दिवाळी तुम्हांला अत्यंत आनंदाची जावो, अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी हें कंटाळवाणें चऱ्हाट बंद करतों.

ऑक्टोबर १९३९

## गाय आणि घड्याळ

कांहीं दिवसांपूर्वी अमेरिकेंतील एका गाईच्या पोटांत एक चालू असलेलें घड्याळ सांपडलें. सात वर्षांपूर्वी त्या कैलासवासी गाईनें आपल्या श्रमजीवी शेतकरी धन्याचें जाकीट बेशरमपणानें खाऊन त्यांतील पैशासकट एखाद्या इरसाल फंडगुंडाप्रमाणें तिनें तें पचविलें. जाकिटांतील घड्याळ तिला आत्मसात् करतां आलें नाहीं, यावरून कालावर मात करणें कुणालाहि शक्य नसतें हें सिद्ध होतें. पोटांतील घड्याळामुळें त्या दिवंगत गोमातेचीं सर्व कार्यें अगदीं घड्याळा-प्रमाणें वक्तशीर होत असलीं पाहिजेत यांत शंका नाहीं. आपल्या नाजुक मनगटावर सोन्याचीं इवलींशीं घड्याळें अलंकार म्हणून वापरणाऱ्या माझ्या सुशिक्षित भगिनींनीं यावरून योग्य तो बोध घेतला तर त्यांचा आणि इतरांचा वेळ वांचेल. बाकी आज-कालच्या पुरोगामी जमान्यांत घड्याळाचा उपयोग वेळ सत्कारणीं लावण्यापेक्षां तो फुकट घालविण्याकडेच जास्त होतो असें मला वाटतें. अमेरिकेंतील गाईवरून कुणाच्या पोटांत काय असेल हें सांगणें मात्र अशक्य आहे !

## प्रणयाचा पथ

सीलोनमध्यें ९२ वर्षांचा एक बठलेला प्रेमवीर ७० वर्षांच्या बाईबरोबर पळून गेल्याची बातमी वाचून अनेक अधीर तरुण-तरुणींना धीर आला असेल. प्रेमांध झालेल्या या नवरदेवाला वयोमानानें आलेल्या अंधत्वामुळेंहि आपल्या समोरचें सत्तर वर्षांचें जुनेंपुराणें संकट दिसलें नसेल. आयु:पथावर मोठ्या कष्टानें चाल-णारा हा थकलेला रसिक प्रवासी, प्रेमपथावर मात्र आपल्या प्रेयसीबरोबर ' पळून ' जाण्याइतका उत्साही असूं शकतो, हें पाहून पुण्यांतील पेन्शनरांना हायसें वाटेल. प्रेमानें बेदम झालेल्या अनेक रमणी-

वल्लभांना ध्येयमार्गावर चालण्याचा आतां दम येईल अशी मला आशा वाटते. गेल्या पिढींतील या दोन प्रेमी जीवांची प्रथम भेट झाली असतां फडक्यांच्या कादंबरींतील नायिकेप्रमाणें लाजलेल्या या म्हातारीचा एखादा ' पोट्र ' प्रसिद्ध झाला असता तर प्रणय-सृष्टींत एका अपूर्व नवलाईची भर पडली असती. एकंदरीनें, गेल्या पिढींतील माणसें कर्तबगार आणि ' ह्रीं ' असतात हेंच खरें. प्रेमांत पडणें हें अपघाताप्रमाणें अनपेक्षितपणानें केव्हांहि घडणें शक्य असल्यानें सुज्ञ आणि दूरदर्शी अविवाहित तरुणांनीं सावध असावें हें बरें.

## पुणेंकरांवर अत्याचार

कॉमनवेल्थ इन्शुरन्स कंपनीची पुण्यांतील सुंदर इमारत पाहून पुणेंकरांना रामभाऊ अभ्यंकरांचा मोठा राग आला असेल. वास्तविक इतकी सुंदर कलाकृति उघड्या डोळ्यांनीं पाहण्याची पुणेंकरांना संवय नाहीं म्हणून तरी, भर रस्त्यांत रामभाऊंनीं हा अत्याचार करायला नको होता. पुण्यांतील घरें साधारण बांधण्यासारखीं वाटत असलीं तरीं बरींचशीं घरें जमिनींतून उगवल्यासारखीं दिसतात. आणि म्युनिसिपालिटीनें अशांना घर नंबर बहाल केल्यामुळें त्यांना ' घरें ' म्हणणें क्रमप्राप्त होतें. प्रत्येक घरांतील अंतरंगांत डोकावणें शक्य नसलें तरी बाह्यांगावरील भयंकर जाहिराती प्रत्येकाच्या डोळ्यांत सारख्या खुपत असतात. कॉमनवेल्थ बिल्डिंगवरील घड्याळामुळें चकाट्या पिटायला किती वेळ शिल्लक आहे हें निरुद्योगी पुणेंकरांना समजतें ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होय. एखाद्या सुंदर बोलपटाप्रमाणें ही इमारत अश्लील आहे कीं नाहीं याचा विचार कृष्णराव मराठे करीत असतीलच ! रामभाऊंचा हा पहिला अपराध पुणेंकरांनीं पोटांत घालावा अशी माझी त्यांना प्रार्थना आहे. जानेवारी १९४०

## वृद्धांचें आरोग्य

पुणें येथील आटवले या नांवाच्या एका सदाशिवपेठी वृद्धानें ता. १९ जानेवारीच्या 'केशरी' पत्रांत 'वृद्धांचें आरोग्य' या नांवाचा लेख लिहून पन्नाशीची झुळुक लागलेल्या लोकांवर उपकार केले आहेत. जनाब जीनांप्रमाणें आठवल्यांनीं तमाम वृद्धांचें आरोग्य चौदा चौकडींत सुरक्षित बसविलें आहे. प्रातःकालीं चार वाजायच्या 'अमृतकाळीं' उठून वृद्धांनीं आपली दिनचर्या सुरू करावी. लंगोट कसून (अस्सं!) व्यायाम करावा, फिरायला जावें; (मात्र असें करतांना, मऊ बिछान्यांत साखरझोपेंत असणाऱ्या तरुण पिढीची झोंप मोडणार नाहीं अशी दक्षता वृद्धांनीं जरूर घ्यावी.) चहा, कॉफी, विडी वगैरेंचें सेवन करूं नये इतकेंच नव्हे, तर 'असल्या' पदार्थांची तोंडओळख असलेल्या लोकांचें तोंडहि पाहूं नये, असें आठवल्यांना वाटतें. शक्य तर वृद्धांनीं महिन्यांतून तीन-चार दिवस बाहेरगांवीं जावें, असें आठवल्यांना वाटत असलें तरी यापेक्षांहि जास्त दिवस त्यांनीं बाहेरगांवीं जाण्यास हरकत नाहीं असें घरांतील तरुणतरुणींना वाटेल. वृद्धांनीं काय वाचावें याची शिफारस आठवल्यांनीं केलेली नसली तरी त्यांनीं केसरी, दीनबंधु, पुरुषार्थ वगैरे वाचण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें. पोथीच्या आंत दडवून 'समाजस्वास्थ्या' चा अंकहि डोळ्याखालून घालावा. नवयुग, चित्रा वगैरे चावट पत्रें वर्ज्य समजावींत.

## तत्त्व मान्य—तपशील अमान्य

पन्नाशीच्या जवळपास मी केव्हां तरी येणार असल्यानें आठवल्यांचा लेख मीं मोठ्या आस्थेनें वाचला. वृद्धांच्या तन्दुरुस्तीचें आठवल्यांचें तत्त्व मला मान्य असलें तरी तपशील मात्र मला मान्य नाहीं. व्यायाम करावा असें मला वाटतें--पण

'साष्टांग नमस्कारां' तील रावबहादुरांप्रमाणें मऊ बिछान्यावर पडल्या पडल्या व्यायाम करण्याची वृद्धांना सवड असावी असें मला वाटतें. तसेंच चहा, कॉफी, विडी वगैरेचें सेवन करणाऱ्यांची संगत सोडावी असें ठरविलें तर आजच्या पुरोगामी जमान्यांत एकान्त-वासांतच उभें आयुष्य घालविण्याची प्रत्येकावर पाळी येईल. जागरण करूं नये, खमंग पदार्थ खाऊं नये, चहा–सिगारेट वर्ज्य करावीं, हें करूं नये आणि तें करूं नये–मग जगायचें तरी कशाला ? नशीब वृद्धांचें कीं रस्त्यानें जातांना तरुण आणि सुंदर मुलींकडे पाहूं नये असें आठवल्यांनीं फर्माविलें नाहीं. आपल्याला हें जमायचें नाहीं. देवा ! मग त्यापायीं लवकर मरण आलें तरी बेहेत्तर ! आपल्या ओळखीच्या वृद्धांना आठवल्यांनीं प्रामाणिकपणानें त्यांच्या लेखांवर मतें मागितलीं तर बस्ती आणि उपासकार किनरे सोडून सर्व लोक माझ्याचप्रमाणें मतें देतील अशी माझी खात्री आहे. वृद्ध लोक रसिक नसतात असें आठवल्यांनीं गृहीत धरलेलें दिसतें. मामुली म्हाताऱ्याचा हा अपमान होय !

**प्रो. दाते**

ना. म. संत आणि इंदिरा संत या दंपतीकडे मी कधींकधीं जातों. परवां मी तेथें गेलों असतां प्रो. दाते या नांवाच्या एका गृहस्थाची माझी ओळख झाली. प्रो. दाते कुत्र्यांना शिकवून तयार करतात आणि या निमित्तानें त्यांनीं चीन, जपान, सयाम वगैरे देशांत प्रवासहि केला आहे असें समजतें. प्रो. दात्यांना कांहीं श्रीमंत लोकांच्या कुत्र्यांच्या 'शिकविण्या' मिळाल्या असून, श्रीमंतांच्या मुलांना शिकविण्या-पेक्षां हें काम त्यांना सोपें जाईल अशी माझी खात्री आहे. अशानें श्रीमंतांच्या मुलांपेक्षा त्यांचे कुत्रे जास्त शहाणे होतील हा सुद्धां कांहीं थोडा फायदा नाहीं. इंदिरा सन्तांच्या भगिनी कु. कमल

दीक्षित यांचा एक छोटा कुत्रा आहे. ( Lucky dog, indeed ! ) त्याची शिकवणी दात्यांना मिळाली तर त्यांच्या कर्तबगारीची प्रत्यक्ष माहिती मला मिळेल आणि 'कुत्रे लोक' काय चमत्कार करतात हें मला समजून येईल. मात्र या कुत्र्याला शिकवितांना तो कविता करून काव्यगायन करणार नाहीं ही खबरदारी मात्र दात्यांनीं ध्यावी असें मला वाटतें. माणसाच्या काव्यगायनानें महाराष्ट्राला आधींच इतकी तकलीफ झाली आहे, कीं त्यांत आणखी भर नको असें मला वाटतें !

## बिचारे कुत्रे !

एकंदर प्रकारावरून मला कुत्र्यांची कींव येऊं लागली आहे. आज ते भाग्यवान् प्राणी अज्ञानांत असल्यानें किती तरी सुखी आहेत ! पण ज्ञानाचें फळ त्यांनीं एकदां चाखलें तर दिगंबरवृत्तीनें राहण्याची त्यांना लाज वाटून 'तैयार' कपड्यांच्या दुकानांत जाऊन मनपसंत कपडे विकत घेण्याची त्यांना इच्छा होईल. शिक्षणानें एखाद्या कॉलेज कुमाराप्रमाणें कुत्र्यांना सिगारेट फुंकायची जरूर वाटून स्त्रीदाक्षिण्य त्यांच्यांत येईल. रोज कांहींतरी वाचल्याशिवाय त्यांना वांचणेंहि अशक्य होईल. कांहीं 'लोक' कॉंग्रेसचे सभासद होतील तर शीख शरीररक्षकाला चुकवून कांहींना तात्याराव सावरकरांपुढें शेपूट हलवून हिंदुमहासभेंत जाण्याची लहर येईल. केवळ शिक्षण मिळाल्याच्या सबबीवर त्यांच्यावर विवाहसंस्था लादण्यांत येऊन आजच्या स्वच्छंदी व सुखी आयुष्याला ते कायमचे मुकतील. शिक्षणानें ते माणसाप्रमाणें बेइमान होऊन आपल्या अन्नदात्यालाहि ओळखणार नाहींत. तोंडांत सिगारेट, हातांत काठी, काखोटीला टाइम्सचा अंक आणि बरोबर एखादी नवमतवादी स्वजातीय मैत्रीण

अशा थाटांत सुशिक्षित कुत्रे या पुण्यांत हिंडायला लागले तर काय अनर्थ होईल हें सांगतां येणें कठीण आहे.

## ‘ सहज कशी खेळविते ललना ’

माझ्या एका मित्राचें बरेंच दिवसांत पत्र नसल्यानें मला साऽऽरखी हुरहुर लागली होती—नाहीं नाहीं ते विचार मनांत येत. अखेरीला माझी भीति खरी ठरली आणि व्हायचें तें झालेंच——माझ्या मित्राचा प्रीतिविवाह ठरल्याची वार्ता माझ्या कानांवर आली. माझ्या मित्रासारख्या कसलेल्या ब्रह्मचाऱ्यावर असला प्रसंग येणें म्हणजे जरा अप्रासंगिकच वाटतें. ज्याचा मनोदुर्ग मोठमोठ्या संकटांतहि हादरला नाहीं तो एका तरुणीच्या नुसत्या भ्रुकुटीभंगानें भंगून जमीनदोस्त झाला. एरव्ही प्रशान्त असणारा त्याचा भावनासागर एका रमणीच्या रमणीय वदनचंद्राच्या दर्शनानें वरखाली होऊन तो बेछूट गडी बेचैन झाला. स्वतःच्या स्वातंत्र्याला सत्यसृष्टींत रात्रंदिवस जपणारा माझा मित्र, प्रणयसृष्टींत मात्र प्रेयसीच्या कोमल करपाशांत परतंत्र म्हणून राहायला तयार होतो हें पाहून प्रेमाचें तंत्र कांहीं न्यारेंच असतें असें वाटायला लागतें. यावरून प्रेम किंवा विवाह तोंड देण्याइतकी इष्टापत्ति असली तरी मामुली ब्रह्मचारी प्रेमवीर केव्हां होईल याचा नेम नसल्यानें तरुणांनीं जरा सावध असावें हें उत्तम.

## वालचंद हिराचंद यांचा योग्य गौरव

कांहीं दिवसांपूर्वी देवकरण नानजी बँकेचे ‘ प्राण ’ शेठ प्राणलाल यांनीं मुंबईच्या विलिंग्डन क्लबमध्यें वालचंद हिराचंद यांना एक मेजवानी दिली. उद्योगधंद्यांत आघाडीवर असलेल्या सोलापूरकडील ‘ चंद ’ मंडळीपैकीं वालचंद हिराचंद यांनीं नॅशनल शिपिंगच्या दृष्टीनें जी उज्ज्वल कामगिरी आतांपर्यंत केली आहे

तिचा गौरव करण्यासाठीं वरील मेजवानी होती. गेल्या ऑगस्ट-पासून मुंबईमधील सर्व खाने 'कोरडे' असले तरी विलिंग्डन क्लब-मध्यें जमलेल्या थोर लोकांची नॅशनल शिपिंगबद्दल असलेली सहानुभूति कोरडी नव्हती असें त्या प्रसंगीं झालेल्या भाषणांवरून कळून येईल. हिंदुस्थानच्या किनाऱ्याचा सर्व दर्यावर्दी व्यापार हिंदी बोटींसाठींच असावा आणि आमच्या बोटींना जगांतील कोणत्याहि समुद्रांत केव्हांहि मज्जाव नसावा अशी स्वाभिमानी हिंदी लोकांची न्याय्य मागणी असून त्या दिशेनें वालचंद आणि सिंद्या कंपनी यांच्या प्रयत्नांना खासच यश येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. बोटी बांधण्याचा पूर्वकालीन तरता व्यापार, सर-कारच्या विशिष्ट धोरणामुळें मध्यंतरींच्या काळांत बुडाला ही गोष्ट लक्षांत आणून सिंद्या कंपनी कलकत्त्याला लवकरच उत्कृष्ट बोटी बांधण्याचा कारखाना काढणार आहे हें ऐकून राष्ट्रीय वृत्तीच्या प्रत्येक हिंदी माणसाला अभिमान वाटेल अशी माझी खात्री आहे.

### 'झेंडा ऊंचा रहे हमारा..."

सिंद्या कंपनीच्या राष्ट्रीय धोरणाला अनुसरून कोंकण-गोवा लाइनवर असलेली B. S. N. कंपनी सिंद्या कंपनीकडे आल्यानें, गेल्या महिन्यापासून निदान कोंकण लाइनवर तरी संपूर्ण स्वदेशी बोट कंपन्यांचा कारभार सुरू झाला आहे. B. S. N. कंपनीच्या परदेशी एजंटांना नॅशनल शिपिंगबद्दल आपलेपणा वाटण्याचें कारण नसल्यानें, देशी कंपन्यांना किती त्रास झाला याचा दुर्दैवी इति-हास आज तरी उकरून काढण्याचें कारण नाहीं. परंतु या घटनेचें हिंदी नॅशनल शिपिंगच्या दृष्टीनें अतिशय महत्त्व असल्यानें ता. १९ डिसेंबरला वालचंद यांना सुखाची झोप आली असेल. कोंकणच्या वाहतुकींत आतां स्पर्धा नसल्यानें उतारूंच्या सुखसोयींकडे सिंद्या

कंपनीचें दुर्लक्ष होईल अशी भीति कांहीं लोकांना वाटणें साहजिक आहे. परंतु सिंद्याचें मला जें धोरण माहीत आहे त्यावरून उतारूंबद्दल बेफिकीर वृत्ति असण्याइतकी सिंद्या कंपनी बेइमान खासच नाहीं अशी माझी खात्री आहे. सिंद्या कंपनीच्या नव्या इमारतीवर डौलानें आणि अभिमानानें फडफडणारीं निशाणें पाहिलीं म्हणजे जमिनीप्रमाणें विशाल सागरावरहि 'झेंडा ऊंचा रहे हमारा' असेंच सर्वांना वाटल्याशिवाय राहणार नाहीं. वालचंद यांचीं सर्व सुखस्वप्नें जनतेच्या सहानुभूतीनें सत्यसृष्टींत उतरावींत अशी माझी ईश्वराला प्रार्थना आहे.

### फडक्यांचीं पत्रें आणि द्राक्षें

'अग्रणी'च्या एका अंकांत, देवरुखवासी रा. न. कीर्तने, M. A. यांनी जिवाचें रान करून प्रो. फडक्यांची स्तुति करण्याच्या नांवाखालीं स्वतःची जी मजेदार 'पब्लिक शिट्टी' वाजविली आहे तें पाहून मला मजा वाटली. अप्पांच्या स्तुतीची धूळ वाचकांच्या डोळ्यांत टाकून त्यांची नजरबंदी होईल असें कीर्तन्यांनीं उगीच समजूं नये. फडक्यांचें कीर्तन सुरू करून स्वतःचें आख्यान हळूच लावायचें हें कीर्तन्यांचें धोरण जरा गफलतीनेंच चाललें आहे. फडके स्तुतिप्रिय नाहींत (असें म्हणतात) आणि मुंबई-पुण्याला फेरी मारणाऱ्या इतर कांहीं 'कलदार' कलावंतांप्रमाणें त्यांची जाहिरात करीत वाऱ्यासारखे भिराभिरणारे डौलदार फेरीवालेहि फडक्यांच्या संग्रहीं नाहींत आणि म्हणूनच मला त्यांच्याबद्दल थोडासा आदर वाटतो. कीर्तन्यांनीं प्रसिद्ध केलेल्या फडक्यांच्या पत्रांच्या द्राक्षांची किंमत गुणापेक्षां वजनावरच ठरण्याचा जास्त संभव असल्यानें, अशीं द्राक्षें बाजारांत आणूं नयेत हें उत्तम. फडक्यांचा आणि माझा पत्रव्यवहार नसल्यानें, त्यांच्या पत्रांचीं

द्राक्षें मला तरी आंबट आहेत असें कुणीं समजूं नये. मनांत आणल्यास कीर्तनें आणि मा. का. प्रमाणें मी सुद्धां फडक्यांना पत्रांनीं बेजार करूं शकेन.

## सुशिक्षितांना विनंति

गेला स्वातंत्र्य-दिन तरुण पिढीनें मोठ्या उत्साहानें पार पाडला, याबद्दल कुणालाहि समाधान वाटेल. परंतु एक महिन्यापूर्वी मला जो एक अनुभव आला तो पाहून मीं माझ्या सुशिक्षित बंधु-भगिनींना एखादीं विनंति केली तर माझ्यावर त्यांचा रोष होणार नाहीं अशी मला आशा आहे. त्या दिवशीं मीं येथील डेक्कन टॉकीजमध्यें न्यू थिएटर्सचा 'प्रेसिडेन्ट' हा बोलपट पाहायला गेलों होतों. माझ्यासमोर कांहीं मुलें-मुलीं असून त्यांच्या नाजुक प्रकृतिमानावरून त्यांची जमा सुशिक्षित लोकांत करायला हरकत नाहीं. बोलपट संपल्यावर 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत चालू असतां ती सुशिक्षित मंडळी बाहेर सटकली हें पाहून मला जरा वाईट वाटलें. प्रत्येक हिंदी माणसानें राष्ट्रगीताला उभें राहून आदर दाखवावा असें मला वाटतें. या प्रश्नाचा संबंध बुद्धीपेक्षां भावनेशींच असल्यानें राष्ट्रगीताबद्दल मतभेद असूनहि सुशिक्षित तरुण-तरुणींनीं शिस्तपालन केलें तर त्यांत फारसें बिघडेल असें मला वाटत नाहीं. God Save The King हें इंग्लंडचें राष्ट्रगीत चालू असतां लष्करी शिस्तीनें प्रत्येक इंग्रजी स्त्री-पुरुष त्या गीताला जो मान देतो तोच मान आम्हीं आमच्या 'वंदे मातरम्'ला द्यावयास हवा.

## पर्वतीवरून पुणें

कांहीं दिवसांपूर्वी पुण्यांतील पर्वती पाहण्याचा योग मला आला. हिंवाळ्याच्या दिवसांत धुक्यामुळें पर्वतीवरून पुण्याचें फारच मनोरम

दृश्य दिसतें. आसमंतात् पसरलेलें धुकें कांहीं वेळेला शांत सागराप्रमाणें दिसून पुणेंकरांच्या माफक महत्त्वाकांक्षेला शोभणारे कांहीं उंच मनोरे समुद्रांतील दीपस्तंभाप्रमाणें धुक्यांतून डोकें वर काढून, बेसावध पांथस्थाला साळसूद पुण्याबद्दल धोक्याची सूचना देतांना दिसतात. कांहीं वेळेला विरळ झालेलें धुकें दिवसभर चळवळ करून थकलेल्या इतिहासप्रसिद्ध पुण्यनगरीच्या पापापुण्यावर निष्कलंक पांघरुणासारखें दिसतें. निसर्गाची ही प्रेमाची पाखर पुण्यावर असतांना, पूर्वजांचे पराक्रम उशाला घेऊन शांतपणें झोपलेलें आजचें पुणें क्षितिजावर असलेल्या दूरस्थ डोंगराप्रमाणें कांहीं वेळ तरी साजरें दिसतें याबद्दल मामुली पुणेकराला अभिमान वाटायला हरकत नाहीं. कांहीं वेळानें सूर्योदय होऊन धुकें नाहींसें होतें आणि समोर ठाकलेलें 'तें' पुणें पाहून, काव्यमय कल्पनेंत विहार करणारा बेभान रसिक निरीक्षक आतां आपल्याला त्याच पुण्यांत परत जायचें या धसक्यानें भानावर येतो.

## ' लग्ना अजुनि लहान ! '

कांहीं दिवसांपूर्वी, पाऊणशें वर्षांच्या एका पेन्शनरानें शुद्धि केलेल्या एका मुसलमान स्त्रीशीं शादी लावल्याची बातमी ता. ८ च्या 'काळ' पत्रांत आली आहे. शुद्धि करून पावन झालेल्या यवनीबरोबर या वयांत विवाह करणारा पेन्श'नर' स्वतः पूर्णपणें शुद्धींत नसावा असें मला वाटतें. या गृह्यसंस्कारामुळें त्या नवपरिणीत वधूच्या कपाळावर सौभाग्याचा मंगल कुंकुमतिलक दिसत असला तरी तिच्या कपाळीं संसारसुख किती असेल याची कल्पना मात्र तिच्या पराक्रमी पतीशिवाय इतरांना असणें अर्थातच शक्य नाहीं. दंतविहीन तोंडाच्या बोळक्यांतून उपरोक्त रसिक पतिदेवानें काढलेले प्रेमाचे गोड बोल ऐकून त्या पतिव्रतेला काय वाटत असेल याची कल्पनाच करवत

नाहीं ! त्यांच्या विवाहाच्या 'मंगल' प्रसंगीं दातांची कवळी, चष्मा, रबरी पिशवी ( म्हणजे 'टोपी' नव्हे; आपली शेकायची पिशवी असते ना ? हं ऽ ती! ), च्यवनप्राशसारखीं औषधें वगैरे वस्तु भेटीदाखल आल्या असतील. पुरुषांचें शरीर थकलें तरी त्यांचें मन ताजेंतवानें असतें हा स्त्रीजातीचा आमच्यावरील आरोप एकंदरीनें अगदींच अस्थानीं नाहीं हें मात्र खरें !

## ती पहांट !

कांहीं दिवसांपूर्वी रात्रीच्या गाडीनें मुंबईला जाण्यासाठीं मी पुण्याहून निघालों. सकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास परिचित अशा कोंबड्याच्या ओरडण्यानें मी भायखळा स्टेशनवर गाढ झोंपेंतून जागा झालों. एका बांबूच्या पार्सलांत कांहीं कोंबड्या मुंबईला माझ्याप्रमाणेंच आल्या होत्या. त्यांच्या आयुष्यांतील हा प्रवास बहुधा अखेरचाच असावा—माझ्याप्रमाणें त्यांच्याजवळ परतीचें तिकीट खासच नव्हतें. लवकरच काळझोप घेणाऱ्या त्या कोंबड्या अलम दुनियेला मात्र झोंपेंतून जागें करण्याचा प्रयत्न करीत असतांना पाहून मला त्यांच्या कर्तव्यदक्षतेबद्दल आदर वाटला. पण प्रातः-कालच्या त्या प्रसन्न वेळीं उच्च आवाजांत जगाचा अखेरचा निरोप घेतांना मला त्यांत करुणरस आढळला. जीवनाच्या अखेरच्या घटकेंतहि त्यांनीं आपलें कर्तव्य सोडलें नाहीं. अशा त्यागवृत्तीच्या प्राण्यांना मांसाहारी लोकांनीं खरोखरीच क्षमा करायला हवी असें मला वाटलें. उंच मान करून निराशेनें ओरडणाऱ्या त्या मुक्या प्राण्यांची मुंडी मुरगळून कोट्यवधि मटनमार्तंडांना त्यांच्या सेवनानें होणारा आनंद लक्षांत आणला म्हणजे त्यांचें तरी जीवन जगण्या-साठीं नाहीं असेंच जगाला वाटतें.

## एक प्लेट वाघ

जग हें गरिबांना जगण्यासाठीं नाहीं असाच पदोपदीं अनुभव प्रत्येकाला येतो. गरीब शेळी जिवानिशीं प्रत्यहीं जात असली तरी खाणारा तिला वातड म्हणतोच. निसर्गाच्या सान्निध्यांत—रम्य वनांत एखाद्या हरणाचें गरीब बिचारें पाडस बंदुकीच्या गोळीला बळी पडून शिकाऱ्याच्या पोटांत ठाव घेतांना दिसतें. जिव्हालौल्यासाठीं गरीब प्राण्यांना मनुष्य मारतांना दिसला तरी, त्यासाठीं जबरदस्त प्राण्यांच्या वाटेस जाण्याची मात्र त्याची सहसा तयारी नसल्यानें 'एक प्लेट वाघ' असे शब्द हॉटेलांतून कधींहि ऐकूं येत नाहींत. एखाद्या तरुणीला सिंहकटी म्हणण्यापलीकडे शूर कवीसुद्धां सिंहाशीं फारशी लगट करीत नाहीं आणि रमणीच्या वेणीला नागिणीची उपमा देणारा एखादा 'धाडसी' लेखक नागपंचमीच्या दिवशीं-सुद्धां नागाला लांबून दूध पाजण्याचेंहि धाडस करतांना दिसत नाहीं! गरीब जनावरें खाऊन अंगांत खरोखरीच ताकद येते कीं काय हा प्रश्न माझ्या आटोक्याबाहेरचा असल्यानें मी तो तज्ज्ञांवर सोंपवून मोकळा होतों. मात्र त्या दिवशीं भायखळा स्टेशनवर ऐकलेला कोंबड्यांचा केविलवाणा स्वर माझ्या कानांत अजूनहि घुमतो आहे.

फेब्रुवारी १९४०

## बहिर्दिशा-निवृत्त-मंडळ

परदेशांतून जाऊन आलेल्या लोकांचें संमेलन या पुण्यांत दर-वर्षी भरतें असें म्हणतात. परदेशगमन हें या दिवसांत तरी पराक्रमाच्या कक्षेंत राहिलें नाहीं हें प्रत्येक मनुष्य जाणून आहे. भरपूर माया असल्यावर वाट्टेल तो 'मायाळु' मूर्ख आदमीसुद्धां परदेशांत जाऊं शकतो याची जाणीव बहिर्दिशा-निवृत्त-मंडळांतील कांहीं

मंडळींना स्वानुभवावरूनहि असायला हरकत नाहीं. परदेशांतून जाऊन आलेले कांहीं बेवकूब तरुण तर इतके उन्मत्त होतात कीं, हीं पराक्रमशून्य बाळें परदेशाला कां गेलीं याचें नवल वाटतें. "D......d this India, these rotten Indians, I wish I had never come back here." अशीं या 'सुशिक्षित' तरुणांचीं मुक्ताफळें ऐकलीं म्हणजे हे सर्व 'तेजस्वी' कुपदीपक परदेशांतच आजन्म कां भडकत राहिले नाहींत याचें वाईट वाटतें. गरिबींतून वर आलेल्या अनाथ-विद्यार्थि-गृह छापाच्या जातीप्रमाणेंच बहिर्दिशा-निवृत्त-मंडळींची एक मूर्ख जात नवीनच निर्माण झाली आहे, हें मात्र खरें. पैसे खर्च करून हिंदी मूर्खपणाचें परदेशांतील प्रदर्शन थांबविलें तर हिंदी अब्रू आणि पैसा सुरक्षित राहील.

'बॅल-बॅलंटाइन...'

आमचे कांहीं तरुण परदेशी संस्कृतीच्या प्रवाहांत इतके वाहवत जातात कीं, विलायतेचें पाणी चार-दोन आठवडे पिऊन ते आपली मातृभाषाहि विसरतात. मागें मीं एक सत्यकथा कुठें तरी वाचली होती व वाचकांना खात्रीनें ती मजेदार वाटेल अशी आशा आहे. एक शहाणा परदेशांत अक्षरशः तीन वार राहूनहि त्याच्या अंगांत तेथील वारें शिरलें आणि परत आल्यावर स्वतःच्या पत्नीबद्दल 'How is Bal-Balantine?' (म्हणजे, बाळ-बाळंतीण कशी आहे?) असा प्रश्न त्या प्रतापी भाषाभास्करानें आपल्या मातोश्रीला केला. The Molokarine problem is bad in your India. (म्हणजे, तुमच्या हिंदुस्थानांत मोलकरणीचा प्रश्न फार बिकट आहे.) मातृभाषेशीं आणि मातृभूमीशीं बेइमान होणाऱ्या असल्या आचरट

वाळांची बेछूट-बेजबाबदार बडबड ऐकली म्हणजे परदेशांतून परत आलेल्या० असल्या दिवट्या चिरंजीवांबद्दल समाजाला वाटत असलेला तिरस्कार खासच अस्थानीं नाहीं असें वाटूं लागतें. आमचे मा. का. विलायतेला जाऊन आले तर...तर काय चमत्कार होईल हें सांगवत नाहीं.

## जुलमांचा रामराम

आयुष्याचीं वांया गेलेलीं वर्षें जमेस धरून भोपटकरांच्या छोट्या पातीला येत्या मे महिन्यांत साठ वर्षें पूर्ण होणार म्हणून त्यांच्या कांहीं पहिलवानी भगतांनीं लखुअण्णांचा एकसष्टीचा उरूस साजरा करण्याचा चंग बांधला आहे. अण्णा जोर-बैठका काढतात, दांडपट्टा खेळतात, मल्लखांब करतात आणि शिवा-कुशासारखी जड ' जोडी ' सुद्धां फिरवितात. धोपटमार्गी भोपटकरांचा हा खाक्या पाहिला म्हणजे शरीरापलीकडे त्यांच्या हातून इतर भरीव कामगिरी फारशी झाली नाहीं याबद्दल कुणालाहि आश्चर्य करण्याचें कारण नाहीं. सार्वजनिक भाषणाचे वेळीं सदभिरुचीपेक्षां आचरट विनोदावरच अण्णांची सारी मदार असल्यानें–' चल मदारी ' थाटानें होणारीं त्यांचीं भाषणें पाहिलीं म्हणजे हा भला गृहस्थ साठीजवळ आज अनेक वर्षें रेंगाळतो आहे अशी अनेकांची कल्पना आहे. अण्णांना देण्यांत येणाऱ्या थैलीसाठीं कुशाभाऊ आणि शिवा दामले हे लाठी घेऊन हिंडत असले तर भरपूर गल्ला जमण्यास अडचण पडणार नाहीं हें खरें असलें तरी अण्णांच्या स्वभावांत त्यांच्या चाहत्यांना दिसत असलेला विनय लक्षांत घेऊन मे महिन्यांत होणारा त्यांचा ' विनयभंग ' भोपटकरांना तापदायक होईल असें मला वाटतें.

## शतायुषी भव

'आज पांढरें तर उद्यां भगवें, अशा रंगीबेरंगी राजकारणांत अण्णांनीं भाग घेतलेला असला तरी आपल्या प्रामाणिक मताप्रमाणें त्यांनीं देहदंड सोसला आहे, स्वार्थत्याग केला आहे म्हणून मला त्यांच्याविषयीं आदर वाटतो. अण्णांची खिलाडू वृत्ति लक्षांत घेतली तर तात्या सावरकरांपेक्षांहि ते सार्वजनिक जीवनांत एका दृष्टीनें सरसच वाटतात. त्यांच्याजवळ शरीररक्षक नाहीं आणि सदासर्वदा स्तुति करणारा निर्बुद्ध भाऊहि नाहीं. अण्णांची एकसष्टी होऊं नये या मताचा मी नाहीं. पण अण्णांबद्दल आदर दाखवायला थैलीची जी कल्पना निघाली आहे तिला माझा विरोध आहे. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिति आज समाधानकारक नाहीं हें अण्णासाहेबांना मीं सांगायला हवें असें नाहीं. माझी तरी अशी खात्री आहे कीं, अण्णांच्या निरुद्योगी पहिलवानी चाहत्यांची थैली जमविण्याची उठाठेव त्यांनाहि मान्य नसेल. अण्णांनीं मे महिन्यांत नुसता कोरडा सत्कार स्वीकारला तर त्यांच्याविषयीं जनतेचा आदर खात्रीनें वाढेल असें मला वाटतें. पण एकंदरीनें महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांना इतका दांडगा सत्कारगंड झाला आहे कीं, ' लोक हो, माझा सत्कार करूं नका ' असें काकुळतीनें सांगणारा एकहि थोर पुरुष अजून सांपडत नाहीं.

## आस्ते कदम

कांहीं दिवसांपूर्वी येथें एका दंतालयाचें (इति तात्याराव) उद्घाटन झालें. त्या वेळीं अनायासें बरीचशी मंडळी जमली आहेत असा मोका साधून पुण्यनगरींतील ' झारा–पकर ' मासिकाचे व्यवस्थापक श्री. कदम यांनीं एक भयंकर भाषण केल्याची वार्ता माझ्या कानांवर नुकतीच आली आहे. Suspicious occasion-ला

हजर असणारे ओतुरकर, प्रख्यात साहित्यिक य. गो. जोशी आणि ‘ मराठा ’ पत्राचे संपादक केतकर इत्यादि लोकांचे त्या प्रसंगीं भाषणश्रवणानें जे कांहीं हाल झाले असतील त्याची कल्पनाच मला करतां येत नाहीं. वास्तविक आपल्या भाषणाचें मोजमाप घेऊन कदम यांनीं आपलें वक्तव्य करायला हवें होतें. परंतु ‘ मूहमें आया तो बक दिया ’ या न्यायानें त्यांनीं उपस्थित असलेल्या लोकांकडे सहानभूतीनें न पाहतां त्यांचे जवळ जवळ पंधरा-वीस मिनिटेंपर्यंत चांगलेच हाल केले. झारा–पकरच्या निर्बुद्ध वातावरणाचा लेखी ( याने छापील ) पुरावा दर महिन्याला जनतेसमोर सादर होत असतांना अशा रीतीनें तोंडी पुरावा देण्याची जरूर श्री. कदम यांना कां वाटावी हें मला समजत नाहीं. झालें तें झालें–पण यापुढें तरी श्री. कदम यांनीं सार्वजनिक प्रसंगीं आस्ते कदम जावें हें बरें.

## अत्र्यांचा पुनर्जन्म

गेल्या बुधवारीं मोटारीच्या अपघातानें अत्र्यांना नाशकांत मृत्यु आल्याची बातमी या पुण्यांत एकाएकीं चितेसारखी पेटली. टापशी बांधण्याशिवाय ज्यांच्या डोक्यांचा फारसा उपयोग नाहीं अशा निर्ढावलेल्या ओंकारेश्वरी वृत्तीच्या अनेक वीरांचे हात उपरण्याकडे त्या दिवशीं वळले असतील. मृत्युलेख लिहिण्यास भरपूर वेळ मिळाल्याबद्दल अनेक पत्र-पंडितांनीं बेछूट अत्र्यांनीं ‘ ही ’ गोष्ट तरी वेळेवर केली, म्हणून गेल्या बुधवारीं त्यांना मनांतल्या मनांत दुवा दिला असेल. आपल्याला आतां सुट्टी मिळेल या ‘ आनंदांत ’ अनेक आबालवृद्ध असतील. ‘ कैलासवासी ’ अत्र्यांच्या अब्रूचा चिवडा करण्यासाठीं त्यांच्या अनेक मित्रांनीं चंग बांधला असेल, सभा करण्यास चटावलेल्या पुण्यांतील अनेक लहानथोर संस्थांना या वार्तेनें एक कार्य-

क्रम मिळाल्याबद्दल धीर आला असेल—वक्त्यांच्या जिव्हा आणि लेखकांच्या द्विजिव्ह लेखण्या सज्ज होऊन बसल्या असतील. या दुर्दैवी बातमीनें पुण्यांतील जनतेच्या मनाची 'इतकी पकड घेतली होती कीं, नवयुगांतील या शूर शिलेदारानें 'मी उभा आहें' असें बुधवार चौकांत ठणकावून सांगितलें असतें तरी त्याच्यावर कुणाचाहि विश्वास बसला नसता आणि कदाचित् त्यांची निराशाहि झाली असती.

## अत्र्यांची लोकप्रियता

त्या दिवशीं एक गोष्ट मात्र मला स्पष्टपणें आढळली. अत्र्यांवर पुणेंकरांचें किती गाढ प्रेम आहे आणि त्यांच्या दोषांसकट ते नव्या पिढीला किती हवेसे वाटतात याचा प्रत्यक्ष पुरावा मला त्या दिवशीं मिळाला. खऱ्या दुःखानें होरपळलेले अत्र्यांचे अनेक तरुण चाहते मला त्या दिवशीं भेटले—आपला भाऊ गेल्याचें दुःख त्या सर्वांच्या चेहऱ्यांवर स्पष्ट दिसत होतें. अत्रे तरुण-तरुणींचे आहेत, अत्रे नव्या पिढीचे आहेत, अत्रे नवजवानांचे सेनानी आहेत, ही गोष्ट गेल्या बुधवारीं कुणालाहि पटली असती. अत्रे अपघातानें जगतात तसे ते अपघातानें खलास झाले याबद्दल सर्वांना हळहळ वाटत होती. कुणाला जेवण सुचलें नाहीं, कीं चैन पडलें नाहीं. नयनांत येणाऱ्या अश्रूंना रुमालानें टिपीत कांहीं तरुण माझ्याशीं बोलत होते. गडकऱ्यांप्रमाणें स्वतःच्या हयातींत स्वतःचा मृत्युलेख वाचण्याचें भाग्य अत्र्यांच्या कपाळीं नसलें तरी त्याच्या खालोखाल स्वतःच्या मृत्यूची बातमी ऐकण्याचा जिवंत आनंद मात्र गडकऱ्यांच्या या कट्टया अभिमानी शिष्यवरास अनुभवतां आला. अवखळ अत्र्यांचें जीवनाचें कार्य अजून झालें नाहीं म्हणूनच ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो अशी माझी प्रार्थना आहे.

मार्च १९४०

## बच्चा-ई-प्रेमवीर

कांहीं दिवसांपूर्वीं उत्तर हिंदुस्थानांतील एका खेड्यांत अठरा वर्षांच्या एका तरुणाचें प्रेम एका मुलीवर बसलें. नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें तो चैनी तरुण बेचैन होऊन शिक्षणाच्या पाठाऐवजीं त्याचा वेळ प्रेमपाठांत जाऊं लागला आणि विद्येची आणि त्याची फारशी तोंडओळख होणेंसुद्धां मुष्किलीचें झालें. प्रणयसृष्टींतील स्वतःच्या पराक्रमापुढें त्याला इतिहासांतील थोर पुरुषांच्या पराक्रमाची फारशी किंमत वाटेनाशी झाली. आपल्या प्रीतिदेवतेच्या भावनासागरासारखा भूगोलांत एकहि समुद्र नसल्याची त्याची खात्री झाली. प्रणयाचें ' एकलें बीज ' त्याच्या पूर्ण परिचयाचें असल्यानें बीजगणिताच्या खडकाळ मार्गावर त्याचें पाऊल कधींहि पडलें नाहीं. चालतें बोलतें, जिवन्त काव्य सदैव दृष्टीसमोर आल्यावर शाळेंतील काव्याच्या तासाला हजर राहण्याइतका तो खासच अरसिक नव्हता. आपल्या वल्लभेचे हरिणीसारखे डोळे, तिची सिंहकटी, कोकिळेसारखा तिचा कर्णमधुर स्वर, नागिणीसारखी पाठीवर स्वच्छंदानें वळवळणारी तिची वेणी, केतकीसारखा रंग आणि गालांवरील गुलाब इत्यादि सामग्रीवर त्यानें प्राणिशास्त्र आणि वनस्पतिशास्त्र यांचा अभ्यास चालविला. इतक्या तयारीवर त्या तरुणाचे परीक्षेचे पेपर प्रेमाइतकेच निष्कलंक जात असत हें ओघानें येतेंच.

## अभिनव सत्याग्रह

सत्यसृष्टींत पोट भरण्यासाठीं प्रणयसृष्टींतील प्रेमापेक्षां भाकरीची जरूर अधिक असते हें व्यवहारी तत्त्व मुलीच्या पालकाला स्वानुभवानें पटलें असल्यानें त्यानें त्यांच्या विवाहास परवानगी देण्याचें चक्क नाकारलें. ( मुलीचे खाष्ट पालक हे अस्सेच ! ) गोष्ट अशी निकराला आल्यावर त्या तरुणानें एक अभिनव सत्याग्रह करण्याचें

ठरविलें आणि एका भयंकर बादळी हवेंत ' स्वर्गीय प्रेम ' या नांवाचें एक पुस्तक घेऊन मशारनिल्हे प्रेमवीर एका वृक्षाच्या सर्वांत उंच अशा फांदीवर आसनस्थ झाला. स्वतःचा वंशवृक्ष वाढविणारा हा वीर आतां वृक्षावरून खालीं पडून ' स्वर्गीय प्रेमा'सकट स्वर्गाला जाण्याचा धोका पाहून लोक घाबरले. प्रेमानें घायाळ झालेलीं उपरोक्त दोन्ही पांखरें झाडावर नसल्यानें, एका दगडांत ' दोन पक्षी ' मारण्याचीहि सोय नव्हती. कन्येचें पाणिग्रहण करणाऱ्या या पाणीदार तरुणापुढें अखेरीला मुलीच्या बापानें पड खाल्ली आणि 'विवाहानंतर आपण पोटापाण्याचा उद्योग करूं,' या शर्तीवर त्यानें विवाहाची सशर्त परवानगी देऊन स्वर्गाच्या सीमेवर भिडलेल्या आपल्या जांवयास भूलोकावर आणलें. निराश झालेल्या रमणीवल्लभांना यापासून बराच बोध घेतां येण्यासारखा आहे. यावरून प्रेम म्हणजे पोरखेळ नाहीं असें म्हणण्याची कुणाचीहि प्राज्ञा नाहीं.

## होळी आणि शिमगा

सालाबादाप्रमाणें यंदाहि सनातनी लोकांनीं मोठ्या उत्साहानें शिमगा साजरा केला, हें पाहून पुण्यांतील संस्कृति-संरक्षक-मंडळाला हायसें वाटलें असेल. हातातोंडाशीं आलेल्या अनेक प्रश्नांपैकीं शिमग्याचा सण असल्यानें, समाजांतील सुधारक शिष्टांनीं शिमग्याविरुद्ध शंख कां करावा हेंच मला समजत नाहीं. या सणाच्या तालमी पुण्यांत एक महिनाभर तरी चालू होत्या आणि ड्रेनेज नसतें तर, धार्मिक वृत्तीच्या लोकांना शिमग्याच्या ' रंगीत ' तालमी करणें अशक्य नव्हतें. मुद्रणस्वातंत्र्याच्या अभावीं बिचाऱ्या सनातन्यांना शिमगावाङ्मय पिढ्यान् पिढ्या जिभेवर खेळवावें लागत असल्यानें कृष्णराव मराठ्यांनीं या बाबतींत लक्ष घातलें तर सनातनी समाज

तरी त्यांना खासच दुवा देईल. लोकांच्या जादा उत्साहाला रस्त्यांतील निरपराधी लोक बळी पडूं नयेत म्हणून आमच्या नगरपालिकेनें या मंगल सणाच्या दिवशीं दुपारीं जादा पाणी सोडलें नाहीं तर सनातन्यांच्या फाजील उत्साहावर पाणी पडून काम थोडें तरी आटोक्यांत येईल. शिमग्याच्या बाबतींत पत्रपंडित मात्र सुखी आहेत. बाराहि महिने त्यांचा चाललेला शिमगा पाहून कट्टर सनातन्यांनाहि त्यांचा हेवा वाटत असेल.

## ‘ णाणा आणि मणी ! ’

लहान मुलांसाठीं होणारे ‘ लेदिओ प्लोग्लाम ’ ( वाचक हो, आहे कीं नाहीं विनोद ? ) ऐकून हा आचरटपणा कधीं काळीं थांबेल असें मला वाटत नाहीं. या तद्दन निर्बुद्ध कार्यक्रमामुळें आनंदानें बेहोष झालेल्या ज्या मुलांचीं पत्रें वाऱ्यावर वाचलीं जातात त्यांचीं डोकीं त्यांच्या पालकांनीं वेळेवारी तपासून घ्यावींत अशी माझी त्यांना सूचना आहे. ‘ णाणांचा ’ अधूनमधून चालणारा ‘ विनोद ’, मुलांचा भरमसाट आरडाओरडा, त्यांचीं कौतुक करण्यांत येत असलेलीं बेसूर गाणीं आणि अशा रीतीनें एकंदरींत चाललेली गंमत-जंमत पाहिली म्हणजे गरीब बिचाऱ्या बालकांची कुणालाहि कींव येईल. शालेय कार्यक्रमांतहि ‘ नदी-किनारी’, ‘ बाजीराव-मस्तानी ’ वगैरे माफक शृंगाराच्या काव्यांची चर्चा झाली असें समजतें. यापुढें अशा कार्यक्रमांत संततिनियमनाची पुरोगामी चर्चा झाल्यास मुलें-मुली चांगलीं शहाणीं होतील. मुलांचे कार्यक्रम मनोरंजक करणें हें कठिण आहे हें मी जाणून आहें. निर्बुद्ध कार्यक्रम होणें अपरिहार्य असेल तर मात्र त्यांची सोल एजन्सी ‘ णाणा ’ कडे ठेवायला हरकत नाहीं—त्या कामासाठीं इतका अधिकारी पुरुष उभ्या महाराष्ट्रांत मिळणें शक्य नाहीं.

एकंदर प्रकारावरून लहान मुलांचे कार्यक्रम मर्ढेकर स्वतः ऐकत नसावेत असें मला वाटतें.

### रमणीचे अश्रु

असहायतेच्या पोटीं अश्रूंचा जन्म आहे असें म्हणतात. उसळलेल्या भावना हृदयांत मावेनाशा झाल्या म्हणजे अश्रुरूपानें त्या बाहेर पडतात—आणि मनाला हलकें वाटतें. अश्रूंनीं डबडबलेले रमणीचे नयन मोत्यांच्या शिंपल्याप्रमाणें भासतात. तरुणींच्या गालांवरून ओघळणारे अश्रु पाहिले म्हणजे पवित्र दंवबिंदूनीं न्हालेल्या गहिऱ्या गुलाबगेंदाची आठवण होते. कृष्ण केशकलापाच्या खालीं असलेल्या रमणीच्या ‘ पाणी ’दार डोळ्यांतून अश्रुपात सुरू झाला म्हणजे काळ्या मेघराशींतून पृथ्वीवर वेगानें येणाऱ्या पावसाच्या सरींची मला आठवण होते. जगांतील कांहीं अमानुष आणि अतिमानुष प्राणी सोडले, तर तरुणीच्या एका अश्रूनें कठोर पुरुषी मन एका क्षणांत विरघळून जातें. हृदयसागरांतून ओघळणारी ही तेजस्वी मौक्तिकमाला रमणीहृदयावर स्वैर सुटलेली पाहण्याचें भाग्य ज्यांना लाभत असेल ते पुरुष धन्य होत. अश्रूंनीं स्त्री जग जिंकते-शहाण्या आणि खंबीर माणसाला हतबल करण्याचें सामर्थ्य रमणीच्या एका अश्रुबिंदूत आहे. ‘ रुदन हेंचि आयुध अमुचें सर्वदा विजयी असे ’ असें अभिमानानें सांगण्याचा हक्क फक्त एकट्या तरुणींचाच आहे. रमणीच्या अश्रूंचें मोल अमोल आहे. तरुणीचा एक अश्रु म्हणजे मोठी शक्ति आहे.

### प्रीतीचा बळी

गेल्या महिन्यांत एका खेडयांतील पन्नास वर्षांच्या एका वयातीत माणसानें प्रेमनिराशेमुळें आत्महत्या केली. त्या वठलेल्या वृक्षावरील प्रीतीचा नाजुक वेल पाहून इतर गांवकऱ्यांना चमत्कारिक

वाटलें असेल. जीर्णोद्धारास आलेल्या एखाद्या पडक्या ओसाड देवळांतील नंदादीपाप्रमाणें त्या मृत मनुष्याच्या हृदयमंदिरांतील प्रीतीची अखंड तेवत असलेली ज्योत पाहून इतरेजनांच्या चेष्टेला खंड पडला नसावा. आपल्या प्रेयसीबरोबर प्रीतिचें आकंठ पान करीत शेषायुष्य कंठणें अशक्य आहे हें पाहूनच त्या बिचाऱ्याचे पंचप्राण कंठाशीं आले असतील आणि आयुष्यांत राम नाहीं असें पाहून त्यानें जगाला रामराम ठोकला असेल. प्रेमनिराशेचा मला अनुभव नसला तरी त्या स्थितीची मला कल्पना करतां येते. परंतु प्रेमभंगानंतर मरणाचा हा एकच मार्ग आहे असें मात्र मला वाटत नाहीं. आयुष्य ही ईश्वरानें विश्वासानें दिलेली ठेव आहे आणि प्रेमाप्रमाणें इतर कर्तव्यांची जाणीवहि प्रत्येकानें ठेवायला हवी असें मला वाटतें. सध्यांच्या संक्रमणावस्थेंत भावनांची गुंतागुंत प्रत्यहीं होण्याचा संभव असल्यानें त्रागा करण्याचें प्रत्येकानें मनांत आणलें तर कच्च्या दिलाच्या लोकांना जगणेंहि अशक्य होऊन जाईल. प्रीतिदेवतेची मानसपूजा करण्यानेंहि मनुष्याला आयुष्य सुसह्य करणें अशक्य नाहीं.

## स्त्री—न सुटणारें कोडें

स्त्रीप्रेमाचे नाजूक पाश आपल्याला न कळत घट्ट होत असतात. प्रीतीच्या सूक्ष्म पाळेंमुळें हृदयांत इतक्या बेमालूम रीतीनें खोल जातात, कीं भावनेच्या जीवनावर जगलेल्या आपल्या जीवनांतील हे पाश हृदयांतून समूळ उखडून टाकतांना हृदयाचे शतशः तुकडे होतात. स्त्री हें या जगांतील एक न सुटणारें कोडें आहे. तिच्या नयनांच्या तेजानें आपला आयुःपथ प्रकाशित होऊन योग्य असें मार्गदर्शन आपल्याला होतें; परंतु ऋणानुबंध तुटायची वेळ आली, कीं स्त्रीच्या नयनांतील तेंच तेज आपल्याला असह्य होऊन

आयुष्याचा उन्हाळा होतो. रमणीच्या सहानुभूतीच्या श्वासानें आपल्या तप्त हृदयावर फुंकर मारल्याचें सुख आपल्याला मिळतें. परंतु तिची लहर फिरली तर तीच सुखद श्वासलहरी वादळी वाऱ्याचें रूप धारण करून आपल्या सर्व आशा-आकांक्षा जमीन-दोस्त करण्यास समर्थ ठरते. प्रीतीच्या प्रशांत नीलाकाशांत चांदणी-प्रमाणें चमकणारी रमणी जरा जादा गरम झाली तर एका क्षणांत उल्का होऊन आपला कपाळमोक्ष करण्यास मागेंपुढें पाहत नाहीं. एकंदरीनें स्त्री हें न सुटणारें कोडें आहे. तें गोड कोडें सोडविण्याचा मोह प्रत्येक माणसाला कसा होतो हें सुद्धां कोडेंच आहे.

## चार पावसाळे आणि अक्कल

कांहीं दिवसापूर्वी एका मित्राशीं बोलतांना मी त्याच्यापेक्षां चार पावसाळे जास्त पाहिले आहेत या थोड्याशा भांडवलावर मीं माझा जादा शहाणपणा सिद्ध करून त्याला तात्पुरता तरी गप्प केलें. पावसाळ्याचा आणि अक्कलेचा संबंध कुणीं जोडला हें कळायला मार्ग नाहीं. परंतु आपलें अज्ञान झांकण्यासाठीं कुणी तरी धूर्त व्यवहारी माणसानें हें पर्जन्यास्त्र प्रतिपक्षावर केव्हां तरी सोडलें असावें आणि तेव्हांपासून पावसाळ्याचें आणि अकलेचें नातें जोडलें गेलें असावें असें मला वाटतें. चार पावसाळे पाहण्याच्या क्षुल्लक सबबीवर अक्षरशः चार पावसाळे पाहून विरलेली, पाणी गळणारी ‘ पाणीदार ’ छत्री नव्या छत्रीपेक्षां सरस ठरण्यास हरकत नाहीं. माझे जिवाभावाचे स्नेहीसोबतीसुद्धां माझ्यावर शहाणपणाचा आळ फारसे घेत नसले, तरी माझ्यापेक्षां चार पावसाळे जास्त पाहिलेल्या अनेक लोकांपेक्षां मला जास्त समजतें अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. पावसाचा आणि रसिकपणाचा फार निकटचा संबंध आहे

असें मी स्वानुभवानें म्हणूं शकतों. परंतु अकलेच्या कांद्याचें भरम-साट पीक फक्त पावसाळ्यांतच येतें असें मला अजूनहि वाटत नाहीं.

## पुण्यांतील चैत्र-वैशाख

पुण्यांतील लोकांना हे दोन महिने फार धामधुमीचे जतात. आर्यसंस्कृतीच्या तिजोरींत बंदोबस्तानें ठेवलेलीं रमणीरत्नें बाहेरची हवा खाऊन याच दोन महिन्यांत थोडींतरी तेजस्वी होतात. डांबरी रस्त्यांच्या कडेला चाललेली सुंदर स्त्रियांची रांग काळ्या पातळांच्या किनारीसारखी खुलून दिसते. वैशाखासारख्या घातकी महिन्यांतच गाफील तरुणांचीं लग्नें होऊन त्यांचें स्वातंत्र्य कायमचें नष्ट होतें. लग्नसराईंतील भर दुपारीं रस्त्यानें चाललेल्या स्त्रियांच्या मिरवणुकी पाहिल्या म्हणजे तावून सुलाखून निघणाऱ्या आर्यललनां-बद्दल कुणालाहि आदर वाटायला हरकत नाहीं. चैत्र-वैशाखाच्या मादक वसंतऋतूंत परप्रांतीय वक्त्यांना कंठ फुटून राजरोस मुजोरी करायला सुसंधि मिळते. परगांवचे हजारों लोक पुण्यांत दोन महिने वस्तीला येतात आणि अंजीर, दूध वगैरे महाग करून परत जातात. सुदैवानें येथील असख्य ढेकणांचा यामुळें भागाकार होत अस-ल्यानें येणाऱ्या पाहुण्यांचा गुणाकार सहन करूनहि पुणेंकरांना थोडी तरी झोप मिळण्याचा संभव याच दोन महिन्यांत असतो. पुण्यांतील अरुंद रस्त्यांतील वाढलेली रहदारी पाहून चैत्र-वैशाखाचे दोन महिने अक्षरशः धक्काधक्कीचे असतात असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति खात्रीनें होणार नाहीं.

एप्रिल १९४०

## तीन अलौकिक भाऊ

कांहीं दिवसांपूर्वी तीन भाऊ एकाच वेळीं हृदयक्रिया बंद पडून देवाघरीं गेले. पसतीस वर्षांपूर्वी ते तिघेहि मातेच्या उदरांतून एकाच

वेळीं जगांत आले. त्यांचे ऋणानुबंध इतके दृढ होते कीं, एकाचें डोकें दुखूं लागलें तर इतर दोघांच्या कपाळाला बाम चोळण्याची वेळ येई. एकाला आनंद झाला तर इतर दोघांची कळी खुलायची. एकानें 'नवाकाळ' वाचला तर दोघांना कसेंसेंच व्हायचें. एकानें लहान मुलांचा 'रेडिओ प्रोग्राम' चुकून ऐकला तर इतर दोघांना वेड लागण्याची पाळी येई. एकाच्या पायाला ठेंच लागली तर दुसऱ्या दोघांच्या पायाला पट्टी लावण्याची वेळ येई. त्यांचा इतिहास आज दुर्दैवानें उपलब्ध नसला तरी प्रणयाच्या बाबतींत मात्र प्रत्येक भावानें आपलें स्वतंत्र खातें ठेवलें असावें असें मला वाटतें. एका भावानें आपल्या प्रेयसीच्या अधरामृताचें प्राशन केलें तर त्यानें इतर दोघां भावांची प्रणयपिपासा तृप्त झाली असेल असें मला तरी वाटत नाहीं. असे हे अलौकिक भाऊ ज्या सोबतीनें या जगांत आले त्याच सोबतीनें त्यांनीं जगाला रामराम ठोकून अखेरचा निरोप घेतला. आजकालच्या पुरोगामी जमान्यांत प्रेमाचा भाव लक्षांत घेतां उपरोक्त तिघां भावांचें अजब प्रेम होतें यांत शंका नाहीं. तीन देहांत एकच प्राण वावरण्याचें असें उदाहरण माझ्या तरी ऐकण्यांत नाहीं. वरील बातमी नवाकाळ पत्रांत प्रसिद्ध झाली आहे.

## नाहींतर इतर भाऊ

पाश्चात्य संस्कृतीच्या रुळावर आमच्या समाजाची गाडी जाऊं लागल्यापासून, प्रेमापेक्षां त्याच्या अभावावरून 'प्रेमळ' नातेवाईक ओळखण्याची वहिवाट पडली आहे. कांहीं सख्ख्या भावांचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे एक सुखानें पोटभर जेवत असला तर दुसऱ्या भावाचें पोट अपचनानें दुखूं लागतें. एक भाऊ सुखी असला तर दुसरे दुःखीकष्टी होतात. एकाच्या अंगणांत गुलाब फुलला तर दुसऱ्याच्या अंगावर कांटा उभा राहतो. एक भाऊ स्वर्गसुखाचा

अनुभव घेत असला तर त्याचें सुख असह्य होऊन इतर भाऊ तडकाफडकीं स्वर्गातसुद्धां जाण्यास मागेपुढें पाहणार नाहींत. एखाद्या भावानें सुंदरसें घर बांधलें तर त्या 'घरंदाज' माणसाचे भाऊ त्या घराचे वासे मोजायला कमी करणार नाहींत. सध्यांच्या तीव्र जीवनकलहांत पाश्चात्य संस्कृतींतील गाळून न घेतलेलीं कांहीं प्रमेयें आमच्या सुखी व प्रेमळ कुटुंबपद्धतीला कितपत मानवतील हें सांगणें कठिण. आपल्या लोकांबद्दल वाटणारें प्रेम दिवसेंदिवस कमी होत असलेलें पाहून आमच्या सामाजिक जीवनाला कीड लागली आहे कीं काय अशी मला भीति वाटते. उपरोक्त तीन भावांचें प्रेम पाहिलें म्हणजे ते बिचारे पृथ्वीवर राहायला खरोखरीच योग्य नव्हतें असें वाटूं लागतें. स्वर्गीय प्रेमाला स्वर्गाइतकी सोयीची जागा सांपडणें शक्य आहे काय ?

'बालबोध-रंजन-रेकॉर्ड' (H. M. V.)

या नवीन रेकॉर्डस्‌मध्यें विनोदाच्या प्रांतांत 'बाळ' ओझरकर (वय अदमासें तीस वर्षें) रांगत रांगत गेल्याचें दिसतें. या बाळाचा 'इनोद' श्ली. बा. लानूदे (म्हणजे आपले श्री. बा. रानडे) यांच्या चालीवर असल्यानें ओझरकर फार्मसीमध्यें तैयार झालेली विनोदाची ही 'बाळ' गोळी लहान मुलांना पथ्यकर होईल असें मला वाटत नाहीं. तसेंच 'काकाजींचीं दहा मुलें' या-सारखी कविता रेकॉर्ड करून मृत्यूची भयानक कल्पना मुलांना दिली नसती तर जास्त चांगलें झालें असतें. आयुष्याच्या आरंभा-लाच या जीवांना आयुष्याच्या अंताची कल्पना देणें कांहीं मानस-शास्त्रज्ञांना पटली असली तरी टागोरांचें 'पोस्ट ऑफिस', 'We are not alone' यांतील अमल आणि मास्टर न्यूकम या बालकांवरून लहान मुलांना मृत्यूच्या कल्पनेपासून दूर ठेवणें जास्त

चांगलें असें माझ्या अल्पमतीला वाटतें. महाकवि शेले यांस लहानपणापासून मृत्यूच्या कल्पनेनें कसें पछाडलें होतें हें जगजाहीर आहेच. फार काय, प्रेमळ आईनें सुद्धां मुलांना ‘ मेल्या ’ म्हणून शिवी हांसडूं नये असें मला वाटतें. माझी सूचना विचारार्ह नसल्यास ग्रामोफोन कंपनीनें ती विचारांत घेण्याचें कारण नाहीं. पण लहान मुलांसाठीं सुरू केलेली नवी प्रथा कंपनीनें चालू ठेवावी—आज ना उद्यां तींत कंपनीला यश खात्रीनें मिळेल.

### विद्यार्थी आणि खाणावळी

मुंबई इलाख्यांतील कॉलेज विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा अहवाल माझ्या वाचनांत आला. महाराष्ट्रांतील खाणावळींत हजारों विद्यार्थी आज पोट भरीत असल्यानें, एखादी ‘ पोट ’ कमिटी नेमून या अन्नछत्रांचा आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा कांहीं संबंध आहे कीं काय, याचा कानोसा सरकारनें घ्यावा, अशी माझी सूचना आहे. सकाळीं अकरा वाजतां आणि रात्रीं आठच्या सुमारास ज्या विद्यार्थ्यांच्या तोंडावर प्रेतकळा दिसत असेल ते सर्व खाणावळींतून जेवून आलेले आहेत, असें खुशाल समजावयाला हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील वाढत्या बेलगामी लोकसंख्येला वेळेवारी लगाम घालून आम्हांला आज उभे राहण्याइतकी जागा खाणावळींच्या कृपेनेंच मिळते आहे. बडे लाट, महात्मा गांधी, जनाब जिना आणि शीख शरीररक्षकासकट तात्या सावरकर यांना एखाद्या खाणावळींत डांबून ठेवलें तर सध्यांचा राजकीय पेंचप्रसंग सुटण्यास दोन दिवसहि लागणार नाहींत अशी माझी खात्री आहे.

### खाणावळी—( पुढें चालू )

या संस्थेंतलें ‘ तूप ’ इरसाल देशभक्ताप्रमाणें थंडीच्या कडाक्यांतहि थिजत नाहीं. कांहीं मालकांचा आपलेपणा आणि ‘ विनोद ’

त्यांच्या अन्नाइतकाच पचायला कठीण जातो; पण यांत खाणावळींच्या मालकांचा दोष नाहीं. मागें आणि पुढें पाट, दोन भाज्या, दोन चटण्या अशा थाटांत आम्हांला पैशाची चटणी करण्याची चटक लागलेली असल्यानें, मेजवान्या, 'चेंज' वगैरे धरून सतरा अठरा रुपयांत यापेक्षां जास्त करणें त्यांना धंदा म्हणून परवडणें शक्यच नाहीं. संस्थानिक, श्रीमंत (आणि मूर्ख) वर्ज्य केल्यास दोन भाज्या आणि साप्ताहिक मेजवान्यांचा थाट मामुली लोकांना माहीत नाहीं. तेव्हां गिऱ्हाइकांनीं हा सर्व फालतु थाट घालवून सकस, स्वच्छ आणि सात्त्विक आहार मिळावा म्हणून खटपट केली तर कमी पैसे घेऊनहि खाणावळवाले संतोषानें सहकार्य करतील. विद्यार्थिवर्ग सुजाण आहे आणि स्वतःच्या पालकांची परिस्थिति ते जाणतात. माझ्या विनंतीचा ते विचार करतील का?

## शाब्बास, 'महाराष्ट्र !'

यंदाची रणजी ट्रॉफी महाराष्ट्रानें जिंकल्याबद्दल मी त्या संघाचें आणि संघनायक प्रो. देवधरांचें अभिनंदन करतों. यू. पी. संघ थोडासा कमजोर असला तरी अनेक दमदार संघांना यशस्वी रीतीनें तोंड देऊन कठीण दिव्यांतून महाराष्ट्र संघ सन्मानपूर्वक अखेरपर्यंत आला ही गोष्टहि दृष्टीआड करून चालणार नाहीं. देवधरांच्या आजपर्यंतच्या यशोमंदिरावर परवांचा तेजस्वी सुवर्ण-कळस यापुढें शोभून दिसेल यांत शंका नाहीं. या अपूर्व यशांत संघांतील प्रत्येक गड्याचा वांटा असला तरी देवधर, हजारे, रांगणेकर, भांडारकर वगैरे खेळाडूंच्या खेळांत काव्य होतें यांत शंका नाहीं. संघाची एकजूट ( Team work ), त्यांचा आत्मविश्वास, कप्तानावरील त्यांची अढळ श्रद्धा आणि व्यक्तीपेक्षां संघाकडे

५९८८

पाहुण्याची प्रत्येक खेळाडूची वृत्ति पाहिली म्हणजे देवधरांच्या थोर व्यक्तित्वाबद्दल आदर वाटूं लागतो. हजारे, रांगणेकर, भांडारकर वगैरे नवजवानांनीं( Colts )क्रिकेटक्षेत्रांतील आपलें आसन वीस वर्षे तरी आतां स्थिर केलें आहे. पांचसहा तास साऽऽरखीं ( Non-stop ) स्त्रीच बोलूं शकते हा त्रिकालाबाधित नियम श्रोत्यांच्या लाडक्या ' बॉबीनें ' जमीनदोस्त केला ही गोष्ट सुद्धां कमी महत्त्वाची नाहीं.

## दंतवैद्यांचें हिंदुधर्म-प्रेम

दंतवैद्य सावरकरांचें हिंदुधर्मावरील प्रेम सिद्ध करणारी एक गोष्ट मला परवां समजली. कांहीं महिन्यांपूर्वी मशारनिल्हे दंतवैद्य नागपूर मेलनें ' विनायक-नगर'ला ( म्हंजे दादरला ) परत येत होते. त्यांच्या सामानांत अर्थात् एक पुष्पमाला होती हें सांगायला नकोच. एका यवनानें डब्यांत असलेल्या एका हिंदु स्त्रीचा थोडासा अपमान केला म्हणून एका तेजस्वी हिंदु तरुणानें त्याचा खरपूस समाचार घेतला. त्या मारामारींत दंतवैद्यांची बत्तिशी, उंदराच्या सांपळ्याप्रमाणें घट्ट बसली असल्यानें त्यांनीं एकदांहि तोंड उघडलें नाहीं. सर्व कांहीं ऑलवेल झाल्यावर, दंतवैद्यांनीं त्या तेजस्वी तरुणाचें अभिनंदन करून त्याला ती पुष्पमाला ( कदाचित् परत करण्याच्या बोलीनें ) अर्पण केली. प्रत्यक्ष मारामारीच्या प्रसंगीं, गप्प बसण्याचें प्रसंगावधान दंतवैद्यांच्या अंगांत असल्यानें त्यांच्यावर भीरुत्वाचा आरोप चावट लोक करतील अशी माझी खात्री आहे—पण बिचाऱ्या दंतवैद्यांचा स्वभावच असा आहे, कीं ते कुणाच्याहि अध्यात-मध्यांत पडत नाहींत. वाचक हो ! वरील गोष्ट दंतकथा आहे असें तुम्हांला वाटणार नाहीं अशी मला आशा आहे.

REFBK-0005979